सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, ५ फेब्रुवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३३६ । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



युगानुकूल समाजरचनेचा शोध घेणे ही केवळ बौद्धिक मंथनाने होणारी गोष्ट नव्हे. केवळ आयत्या मिळालेल्या रचनेत, प्रवाहित विचारधारांवर चर्चा करून स्वतंत्र झालेल्या राष्ट्राचे नवनिर्माण होणे असंभव आहे. त्यासाठी कौटुंबिक, व्यक्तिगत आणि सामूहिक आचरणाद्वारे दीर्घ आणि विविध प्रयोगांच्या अनुभवातून जाणे क्रमप्राप्त आहे. प्रत्यक्ष आचरणाच्या प्रयोगशाळेच्या भट्टीत तापूनच नवनिर्माणाचा साचा तयार होतो.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# मिनी मंत्रालयाचा प्रचार आज थांबणार

शनिवारी **मतदान** | सोमवारी **मतमोजणी**

### ▸ मतदारांच्या गाठीभेटींना येणार वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी जाहीर प्रचार उद्या दि. ५ फेब्रुवारी रोजी थांबणार आहे. मतदानाची प्रक्रिया जवळ आल्याने अधिकृत प्रचार सभा, रॅली आणि लाऊडस्पीकरवर निर्बंध असतील, परंतु मतदानापर्यंत इतर मार्गांनी प्रचार सुरूच राहू शकतो. शेवटच्या दिवशी गुरुवारी दिवसभर जाहीर सभा, कॉर्नर सभा चालणार आहेत. पुढील काळात मतदारांच्या गुप्त गाठीभेटींना वेग येणार आहे. शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७:३० ते संध्याकाळी ५:३० या वेळेत होईल. तर निकाल (मतमोजणी) सोमवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता सुरू होणार आहे.

जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये जिल्हा परिषदांच्या ६८ गटांसाठी तसेच पंचायत समितीच्या १३६ गणांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार असून, त्यासाठी जिल्हाभरात एकूण २ हजार ७५८ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. या निवडणुकीत जिल्ह्यातील २४ लाख ५९ हजार २२७ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. तर मतदान प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनाकडून १५ हजार २०० कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केल्या आहेत. मतदारांना सुरक्षित आणि निर्भय वातावरणात मतदान करता यावे, यासाठी प्रत्येक केंद्रावर तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यात सुमारे दीड हजारांहून अधिक पुरुष व महिला पोलीस तसेच होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत.

शांततेत मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. मतदानासाठी आयोगाने निवडणूक ओळखपत्र अनिवार्य केले असून, मतदारांनी मतदार ओळखपत्र, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, बँक पासबुक किंवा छायाचित्र असलेला कोणताही वैध पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रशासनाने सर्व मतदारांना निर्भयपणे व मोठ्या संख्येने मतदानात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतील जिल्हा परिषद गटाची मतपत्रिका पांढऱ्या रंगाची असून, पंचायत समिती गणाची मतपत्रिका गुलाबी रंगाची असणार आहे. दरम्यान, उमेदवारांची संख्या जास्त असल्यास दोन मतदान यंत्रांचा (बियू) वापर करण्यात येणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाने कळविली आहे. यासाठी करमाळा तालुक्यात २४४ मतदान केंद्र, माढा २६९, बार्शी २५६, उत्तर सोलापूर ९७, मोहोळ २२०, पंढरपूर ३०९, माळशिरस ३६३, सांगोला २७४, मंगळवेढा १८९, दक्षिण सोलापूर २४७ व अक्कलकोट २९०. अशा एकूण २७५८ मतदान केंद्रांची निर्मिती जिल्ह्यात केली असून, सर्वांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभाग दर्शवून मतदान करावे, असेही आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

शिवसेना शिंदे गटाकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी जिल्ह्यात प्रचारासाठी हजेरी लावली. बार्शी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथे त्यांची प्रचारसभा झाली. त्यांच्या सभांमुळे शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांमध्ये उत्साह संचारला आहे.

दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यात भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रचारात सक्रिय सहभाग घेत वातावरण तापवले. दुसरीकडे, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोपांची राळ उडाल्याने प्रचाराला अधिक धार आली आहे.

बार्शी तालुक्यात माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी प्रचारात उतरून पक्षाच्या उमेदवारांना बळ दिले. इतर सर्वच राजकीय पक्षांच्या तुलनेने काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे या प्रचारात फारशा सक्रिय दिसून न आल्याने काँग्रेस उमेदवारांना स्वतःच्या ताकदीवरच निवडणूक लढवावी लागत असल्याचे चित्र आहे.

**सत्तेसाठी पालकमंत्र्यांचा चंग!**

भाजपने महापालिका निवडणुकीप्रमाणेच साम, दाम, दंड या नीतीचा अवलंब करीत कोणत्याही परिस्थितीत ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या मिनी मंत्रालयाचा ताबा मिळविण्याचा चंग बांधला आहे. त्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे विशेष लक्ष असून त्यांच्या अनेक तालुक्यात प्रचारसभा होत आहेत. या प्रचारसभांतून ते विकासाची हमी देत आहेत.

# लोकसभेत 'पुस्तक युद्ध'

**●विरोधकांचा गदारोळ ●कामकाज स्थगित, धन्यवाद प्रस्तावावर चर्चा प्रभावित**

**नवी दिल्ली, ४ फेब्रुवारी**

लोकसभेत बुधवारी सलग तिसऱ्या दिवशीही प्रचंड गदारोळ झाला. या गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज तीनवेळा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले. यामुळे सलग तिसऱ्या दिवशीही राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही. बुधवारी लोकसभेत पुस्तक युद्धच रंगले होते.



राहुल गांधी सभागृहात अप्रकाशित पुस्तक घेऊन आले तर भाजपाचे निशिकांत दुबे यांनीही सभागृहात अनेक पुस्तके आणली होती. दोनवेळा स्थगित झाल्यानंतर लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजता सुरु होताच पिठासीन अध्यक्ष कृष्णप्रकाश तेन्नटी यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेसाठी तेलगू देसमचे हरीश बालयोगी यांचे नाव पुकारले, बालयोगी बोलायला उभे होताच काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी अध्यक्षांच्या आसनासमोर धाव घेत जोरदार घोषणाबाजी सुरु केली. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचे सदस्य प्रचंड आक्रमक होते. बालयोगी यांच्या भाषणानंतर तेन्नटी यांनी भाजपाचे निशिकांत दुबे यांचे नाव पुकारले. दुबे आपल्यासोबत अनेक पुस्तके घेऊन आले होते. सभागृहाला एकएक पुस्तक दाखवत दुबे यांनी या प्रकाशित पुस्तकातील मजकुराचा हवाला देत पंडित जवाहरलाल नेहरु, श्रीमती इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी यांच्यावर गंभीर स्वरुपाचे आरोप केले. त्यामुळे काँग्रेस आणि अन्य विरोधी सदस्य आणखी भडकले. संतप्त विरोधी पक्षांच्या सदस्यांनी लोकसभेच्या महासचिवांच्या टेबलजवळ धाव घेत कागदाचे तुकडे फाडत ते तेन्नटी यांच्या आसनाच्या दिशेने भिरकावण्याचा प्रयत्न केला.

# तीन महिन्यांचे साडेचार हजार लवकरच थेट खात्यात येणार

**मुंबई, ४ फेब्रुवारी**

ई-केवायसीमुळे ज्यांचे पैसे थकले आहेत, अशा महिलांना तीन महिन्यांचे साडेचार हजार रुपये लवकरच खात्यात जमा होणार असल्याची माहिती आहे.

राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे गेल्या काही महिन्यांपासून पैसे न मिळाल्याने त्रस्त झालेल्या महिलांना दिलासा मिळणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात आचारसंहिता लागू होती. नंतर महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका लागल्याने पैसे जमा करण्याचा निर्णय लांबला. पण, जिल्हा परिषदेच्या निवडणुका संपल्यानंतर तीन महिन्यांचे पैसे एकत्र देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. दरम्यान, ई- केवायसी न केल्याने काही महिलांना पैसे मिळाले नव्हते. यामुळे संतप्त झालेल्या लाडक्या बहिणींनी काही ठिकाणी आंदोलनही केले. तसेच, पारदर्शकता यावी आणि खऱ्या लाभार्थ्यांना लाभ मिळावा म्हणून घरोघरी जावून पडताळणी करण्याचे आदेशही महिला व बालकल्याण विभागाने दिले होते. सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर राज्य सरकारने आता थकलेले पैसे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. २१०० रुपयांचा निर्णय लवकरच होण्याची शक्यता निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार भविष्यात या योजनेतील मासिक हप्ता १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याची शक्यता असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासंदर्भात नुकतेच संकेत दिले आहेत.

# पुणे-मुंबई एक्सप्रेस-वे ठप्प





**आडोशी बोगद्याजवळ ज्वलनशील गॅसचा टँकर उलटल्याने गॅस गळती सुरू झाली. हा अपघात मंगळवारी घडला. टँकरमधून प्रोफिलिन गॅस सतत गळत आहे. सुरक्षेच्या कारणास्तव मुंबईकडे जाणारा मार्ग पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. त्यामुळे तब्बल २५ तास वाहनचालक अडकून होते. वाहनांची तब्बल २५ किलो मीटरपर्यंत लांब रांग लागली होती. अखेर बुधवारी सायंकाळी गॅस गळती थांबविण्यात यश आले.**

# शरद पवारांकडून थरथरत्या हातांनी अजित पवारांच्या प्रतिमेला मानवंदना

### सहयोग बंगल्यात पवार कुटुंब एकत्र; अजित पवारांचे स्मारक उभारणार

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.४ फेब्रुवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाले. अजित पवारांचं अपघाती निधन झाले असले तरीही आजही महाराष्ट्रातील जनतेला यावर विश्वास बसत नाहीय. अजित पवारांचे काका आणि देशाचे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी आज अजित पवारांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली.

या भेटीदरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अजित पवारांची बंधू श्रीनिवास पवार, भगिनी तसेच आमदार रोहित पवार, पार्थ पवार, जय पवार आणि प्रतिभा पवार उपस्थित होते. संपूर्ण पवार कुटुंबाने आज सांत्वन भेटीला आलेल्या कार्यकर्त्यांचीही आज भेट घेतली.



बुधवारी सायंकाळपासून सहयोग बंगल्यावर पवार कुटुंब एकत्र आले आहे. अजित पवारांचे स्मारक विद्या प्रतिष्ठान येथे बनवण्यासंदर्भात ही बैठक असल्याचे सांगण्यात आले. शरद पवार आज खूप वर्षांनी सहयोग सोसायटी येथे दाखल झाले. अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या शपथविधीनंतर शरद पवारांनी पहिल्यांदाच सुनेत्रा पवारांची भेट घेतली. अजित पवारांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासंदर्भात मोठी चर्चा सुरू आहे. अजित पवार राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासंदर्भात सकारात्मक होते, असा दावा शरद पवारांच्या गटाकडून केला जातोय. मात्र, हा असा कोणताही निर्णय झाला नव्हता, यावर अजित पवारांचे नेते ठाम आहेत. दरम्यान, राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत भाजपालाही विश्वासात घ्यावे लागेल असा सूर आवळला जात आहे. त्यामुळे शरद पवारांनीही यावर नाराजी व्यक्त केली आहे. माझा उल्लेख करण्याचा देवेंद्र फडणवीसांना कोणी अधिकार दिला अशा थेट प्रश्नच पवारांनी केला. त्यातच, बुधवारी सकाळी सेंट्रल हॉलमध्ये शरद पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्यात बैठक झाली होती.

**संपूर्ण पवार कुटुंबीय सहयोग बंगल्यावर**

अजित पवारांचे स्मारक विद्या प्रतिष्ठान येथे बनवण्यासंदर्भात ही बैठक असल्याचे समोर आले आहे. या बैठकीनंतरच शरद पवार सहयोग सोसायटी येथे येऊन अजित पवारांच्या प्रतिमेला अभिवादन केले. त्यानंतर सुनेत्रा पवारांचं सांत्वन करून आलेल्या कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. यावेळी संपूर्ण पवार कुटुंबीय आज सहयोग बंगल्यात हजर होते.

# सुप्रिया सुळेंनी सुनेत्रा पवारांचे नेतृत्व मान्य करावे

**● राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासाठी आत्राम यांनी ठेवल्या ३ अटी**

**गडचिरोली, दि.४ फेब्रुवारी-**

अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांतील विलीनीकरणाची कथित चर्चा रखडली आहे. पण आता सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी विलीनीकरणासाठी शरद पवार गटापुढे ३ अटी ठेवल्या आहेत. यात शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या भूमिकेविषयी संभ्रमावस्था निर्माण करत सुप्रिया यांनी सुनेत्रा पवारांचे नेतृत्व मान्य करण्याच्या अटीचा समावेश आहे. यामुळे विलीनीकरणाचा तिढा बिकट होण्याची शक्यता आहे. या अटींवर आता शरद राष्ट्रवादीची भूमिका काय हे पाहणे औत्सुक्याचे आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया स्थगित झाली आहे. शरद पवार गटाने ही चर्चा थेट अजित पवारांशी सुरू होती असे नमूद करत या चर्चेला हवा दिली. पण अजित पवारांच्या पश्चात त्यांच्या पक्षाच्या बड्या नेत्यांनी अशी कोणतीही चर्चा सुरू नव्हती, असे स्पष्ट करत शरद पवार गटाचा दावा फेटाळला.

**आत्रामांनी घातलेल्या ३ अटी**

१. आत्राम यांच्या मते, दोन ताईंपैकी सुनेत्रा ताई आमच्या नेत्या आहेत. आम्ही आमचा नेता निवडला आहे. आमच्या पक्षात शरद पवार यांचा पक्ष विलीन झाल्यानंतर सुप्रिया ताईंचा रोल काय राहील हे ठरवू. पण नेतृत्व सुनेत्रा ताईंकडेच असेल.

२. आम्हाला सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत राहायचे आहे. आमचे चिन्ह घड्याळ आहे. या चिन्हाखाली त्यांना एकत्र यावे लागेल. शरद पवार गटाला घड्याळ चिन्ह स्वीकारून एकत्र यावे लागेल. सुनेत्रा ताईच पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष असतील.

३. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यानंतरही एनडीएसोबत राहणे गरजेचे आहे. शरद पवार गट एनडीएसोबत येणार नसेल, तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन काही फायदा नाही, असेही आत्राम यांनी या प्रकरणी सांगितले आहे.

या पार्श्वभूमीवर अजित राष्ट्रवादीचे आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासाठी आग्रही असणाऱ्या शरद पवार गटापुढे ३ अटी ठेवल्या आहेत.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

### अजितदादा अपघात प्रकरणात

# सरपंचाने दिली खळबळजनक माहिती

**आमदार अमोल मिटकरी यांचा दावा; विमानातून कुणीतरी बाहेर पडण्याची धडपड करत होते**

**पुणे, दि.४ फेब्रुवारी-**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताप्रकरणी पुन्हा एकदा संशय व्यक्त केला आहे. विमान कोसळत असताना त्यातून कुणीतरी बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होते. त्या व्यक्तीला वाचवण्यासाठी आम्ही जात असताना त्यात मोठा स्फोट झाला, असे ते म्हणालेत. विमान अपघातात प्रथम ६ जण ठार झाल्याची माहिती देण्यात आली. पण घटनास्थळी पाचच मृतदेह सापडले. मग ६ वा व्यक्ती कोण? असा पुनरुच्चारही त्यांनी या प्रकरणी केला आहे.

अजित पवार यांचे एका विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या अकाली निधनामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळाला मोठा धक्का बसला आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते या धक्क्यातून अद्याप सावरले नाहीत. आमदार अमोल मिटकरी यांचाही यात समावेश आहे. त्यांनी बुधवारी पुन्हा एकदा अजित पवारांच्या विमान अपघातावर एक नवा दावा केला. ते म्हणाले, अजित पवारांचा मृत्यू झाला त्या दिवशी मी सायंकाळी ५ वाजता घटनास्थळी गेलो होतो. तेव्हा तेथील सरपंचाने मला धक्कादायक माहिती दिली.

(उर्वरित वृत्त पान २ वर)



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



# १५ दिवसांपासून अभिलेख कक्ष बंदच

## नागरिकांसह शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच वकिल व दस्तऐवज लेखकांची झाली मोठी गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.४ फेब्रुवारी**

सोलापूर शहरातील उत्तर तहसील कार्यालयातील अभिलेख (रेकॉर्ड) कक्ष गेल्या पंधरा दिवसांपासून बंदच आहे. त्यामुळे गावातून कामानिमित्त शहरात येणाऱ्या नागरिकांना तीव्र अडचणींचा सामना करावा लागत आहे. जमीन व्यवहार, फेरफार नोंदी, हस्तलिखित उतारे तसेच महसूल विषयक विविध कागदपत्रांसाठी दररोज सकाळपासून मोठ्या संख्येने नागरिक तहसील कार्यालयात दाखल होत आहेत. मात्र अभिलेख कक्ष बंद असल्याचे समजताच नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, जुने फेरफार, मालमत्ता व्यवहारासाठी आवश्यक कागदपत्रे, वारसा नोंदी, दुरुस्ती अर्ज अशा महत्त्वाच्या कामांसाठी अनेक नागरिक दूरवरून उत्तर तहसील कार्यालयात येत आहेत. कोणतीही पूर्वसूचना न देता अभिलेख कक्ष बंद ठेवल्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम वाया गेल्याची भावना ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली आहे.

अनेकांनी खास कामानिमित्त रजा काढून तहसील कार्यालयात हजेरी लावली होती; मात्र प्रत्यक्षात कक्ष बंद असल्याने



त्यांना निराशेने परतावे लागले. या परिस्थितीमुळे सामान्य नागरिकांसह शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच वकिल व दस्तऐवज लेखकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दिवसभर कार्यालयाच्या फेऱ्या मारूनही काम न झाल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. अभिलेख कक्ष कधी सुरू होणार, याची कोणतीही माहिती दिली जात नाही. विचारणा केली असता समाधानकारक

> अभिलेख कक्ष बंद ठेवण्यामागील कारण स्पष्ट करावे, तातडीने कक्ष सुरू करावा तसेच भविष्यात अशा परिस्थितीत नागरिकांना आधीच अधिकृत सूचना देण्याची प्रभावी व्यवस्था उभारावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. अन्यथा नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी प्रतिक्रिया देखील व्यक्त होत आहे.

उत्तरही मिळत नाही, अशी तक्रार अनेक नागरिकांनी केली. विशेष म्हणजे, उत्तर तहसील कार्यालय सोबतच दक्षिण तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षही बंद असल्याने संपूर्ण सोलापूर शहरातील नागरिकांची गैरसोय अधिकच वाढली आहे. दोन्ही तहसील कार्यालयांतील अभिलेख कक्ष बंद असल्यामुळे जमीन व्यवहार, फेरफार नोंदी, बँक कर्ज प्रकरणे तसेच न्यायालयीन कामांसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे मिळणे अशक्य झाले आहे. परिणामी महसूल विभागाशी संबंधित कामकाज जवळपास ठप्प झाले आहे. या गंभीर प्रकाराकडे महसूल प्रशासनाने तात्काळ लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कोयत्याने वार करून पत्नीचा खून

### गुन्ह्यातील आरोपी दोन तासात जेरबंद

### पंढरपूर तालुका पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ फेब्रुवारी -**

तालुक्यातील गोपाळपूर येथे पत्नीचा खून करुन पळून जाण्याच्या प्रयत्नातील आरोपीला तालुका पोलिसांनी दोन तासात जेरबंद केले. ही घटना बुधवारी (दि.४) मध्यरात्रीच्या सुमारास घडली. लक्ष्मी भानुदास वाघ असे खून झालेल्या महिलेचे नाव असून तिचा पती भानुदास वाघ याने कोयत्याने तिचा निर्घृण खून केल्याचे समोर आले आहे.

तालुका पोलिसांच्या माहितीनुसार गोपाळपूर येथे मागील दहा दिवसांपूर्वी स्वेरी कॉलेजच्या पाठीमागे ऊस तोडणीसाठी जळगाव येथील तीन ते चार टोळ्या ऊस तोडीसाठी आल्या आहेत. त्यामध्ये भानुदास आनंदा वाघ (वय-४५) हा ऊसतोड कामगार त्याची पत्नी लक्ष्मी भानुदास वाघ (वय ३५) व दोन मुलासह ऊसतोडीच्या टोळीत राहत होता. दि. ४ फेब्रुवारीला रात्री बारा वाजता आरोपी भानुदास आनंदा वाघ (वय ४५ रा. देरेगाव ता. चाळीसगाव जि.जळगाव) याने पत्नी लक्ष्मी हिला घरगुती भांडणाच्या कारणावरून ऊस तोडीच्या कोयत्याने गळ्यावर मानेवर वार करून ठार मारले. सदरची



माहिती तालुका पोलिसांना डायल ११२ या क्रमांकावर मिळाली. त्यानुसार उपविभागीय अधिकारी प्रशांत डगळे, पोलीस निरीक्षक मुजावर, पीएसआय वडने, भारत भोसले, एपीआय रेळेकर व कर्मचारी घटनास्थळी रवाना झाले. आरोपी हा अंधाराचा फायदा घेऊन उसाच्या फडाच्या मागून पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी स्वेरी कॉलेजच्या पाठीमागील परिसर शोध घेऊन दोन तासांमध्ये भानुदास आनंदा वाघ याला अटक केली. गुन्ह्यात वापरलेले हत्यार कोयता पोलिसांनी जप्त केला. आरोपी हा ऊस तोडी कामगार फिरस्ता असून आरोपीचे आसपासच्या परिसरात कोणीही नातेवाईक वगैरे नाहीत. पोलिसांनी तत्परतेने आरोपीला तात्काळ अटक केली. आरोपी विरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती विभावरी रेळेकर मॅडम, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वाढणे, भारत भोसले, पोलीस विजय गायकवाड, हवालदार सतीश चंदनशिवे, पोलीस हवालदार साळुंखे, बाजीराव काकडे, अभिमन्यू गरड, पोलीस कॉन्स्टेबल हजारे, पोलीस कॉन्स्टेबल संजय गुटाळ, सुहास देशमुख, विजय आवटी, सागर गवळी यांच्या पथकाने केली आहे.

## महत्वाचे...



### अकलूज येथे संत शिरोमणी नरहरी महाराजांची पुण्यतिथी साजरी

**अकलूज, दि. ४ फेब्रुवारी-**

अकलूज पांचाळ सोनार समाज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने संत शिरोमणी नरहरी महाराजांची ७४० वी पुण्यतिथी विविध धार्मिक कार्यक्रमाने साजरी करण्यात आली. येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने सकाळी विठ्ठल रुक्मिणीची महापूजा सुभाष पोतदार व भाग्यश्री पोतदार यांच्या झाली. सकाळी १० ते १२ संग्रामनगरच्या गुरुकुलातील भजनी मंडळाचे भजन होऊन बारा वाजता पुष्पवृष्टी झाली. यावेळी माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील, नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, लालासाहेब अडगळे उपस्थित होते. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप झाले. संस्थेचे अध्यक्ष राजीव लोहकरे, उपाध्यक्ष सुभाष पोतदार, सचिव प्रकाश कामेगांवकर, खजिनदार हर्षद लोहकरे, सदस्य संजय पोतदार,अरुण क्षिरसागर,अनिल पोतदार, निरंजन पंडित,अमित लोहकरे, नंदकुमार पोतदार, माजी अध्यक्ष बाळासाहेब वेदपाठक यांनी परिश्रम घेतले. लाड सुवर्णकार युवक संघटनेतर्फे नरहरी नगर पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी अध्यक्ष सदानंद दहिवाळ यांनी पूजन केले. यावेळी दिलीप उदावंत, सुधीर शहाणे उपस्थित होते.

# पगार थकवल्याने कंत्राटी कर्मचारी आंदोलन करणार

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ फेब्रुवारी-**

जिल्हा रुग्णालय व महिला रुग्णालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी चार महिन्यांपासून रखडलेल्या पगाराच्या मागणीसाठी कामबंद आंदोलन पुकारले. वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले असून, पगार मिळेपर्यंत कामावर रुजू होणार नाही, असा थेट इशारा कर्मचाऱ्यांनी प्रशासनाला दिला आहे.

जिल्हा परिषद गेटसमोर कंत्राटी कर्मचाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने केली. याआंदोलनाचा थेट फटका जिल्हा ग्रामीण रुग्णालय व महिला रुग्णालयातील रुग्णसेवेला बसला आहे. जिल्हा ग्रामीण रुग्णालय व महिला रुग्णालयात सुमारे २०० कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून, त्यांचे वेतन एमव्हीजी कंपनीमार्फत दिले जाते. मात्र, कंपनीकडून मागील



> **कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या**
>
> * चार महिन्यांचा थकीत पगार तात्काळ अदा करावा, * कामगार कायद्यानुसार मूळ पगार, * प्रवास भत्ता व हक्काच्या रजा द्याव्यात, * प्रत्येक कर्मचाऱ्याला पेमेंट स्लिप देण्यात यावी, * रुग्णालयाकडून थेट कंत्राटी भरती करण्यात यावी, * कामाच्या वेळा निश्चित कराव्यात तसेच भरती प्रक्रिया पारदर्शक व सुलभ असावी.

चार महिन्यांपासून पगार देण्यात आलेला नाही. याबाबत वारंवार तक्रारी करूनही कंपनी व्यवस्थापन टाळाटाळ करत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. दरम्यान, यासंदर्भात कंपनीशी संपर्क होऊ शकलेला नाही. हे आंदोलन संघर्ष कामगार संघटनेच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रश्न सोडवावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, आंदोलनादरम्यान महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

# जि.प. सदस्याएवढे तरी काम करून दाखवा : पालकमंत्री गोरे

### करकंब येथील सभेत आमदार पाटील यांना आव्हान

**तभा वृत्तसेवा.**
**करकंब, दि.४ फेब्रुवारी-**

निवडणुकीत मते मागताना मागील काळात केलेली कामे व पुढे काय करणार याबाबतची भूमिका मांडून मते मागायला पाहिजेत परंतु काही लोक येथे येतात भाषणे करतात नौटंकी करतात. आमदार साहेब येथून पुढे चार वर्षात आदिनाथ देशमुख जिल्हा परिषद गटासाठी काम करणार आहेत. किमान तेवढे तरी काम करून दाखवा असे चॅलेंज पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आमदार अभिजित पाटील यांना केले.

करकंब जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीनिमित्त आयोजित प्रचार सभेत पालकमंत्री गोरे बोलत होते. यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, सहकार शिरोमणी कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे, पांडुरंग कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास खुळे, माजी उपाध्यक्ष नरसाप्पा देशमुख, विठ्ठल चे माजी संचालक युवराज पाटील, प्रणव परिचारक, संचालक ज्ञानदेव ढोबळे, विजय जाधव, आदिनाथ देशमुख, राहुल पुरवत, बाबुराव जाधव, शरद पांढरे, सतीश देशमुख, अभिजित कवडे आदी उपस्थित होते. या भागाचा विकास करायचा असेल तर निधी देणारे ग्राम विकास खाते माझ्याकडे आहे तुम्ही आमदार होऊन दीड वर्षे झाली या काळात आमदार फंडाशिवाय नया पैशाचा निधी या भागात देऊ शकला नाही आणि कोणत्या अधिकाराने तुमच्या उमेदवारांना येथील जनतेला मते मागत आहात. येथे यायचे भाषणे करायची आणि रात्री मला पत्र देऊन निधी मागायचा. भाऊ मला माणसं फिरू देत नाही, रुपयाचे काम झाले नाही, हे अंधारात सांगण्यापेक्षा उजेडात सांगा. असे आवाहन पालकमंत्री गोरे यांनी केले. आमची लढाई विकासाची आहे चिल्लर माणसाची नाही असेही ते म्हणाले.



## पान १ वरुन

### सुनेत्रा पवारांचे नेतृत्व...

पान १ वरून

या अटी मान्य असतील तरच दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण होईल अन्यथा नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. आत्राम म्हणाले आहेत की, अजित पवारांनी विलीनीकरणाचा मुद्दा आमच्यासोबत केव्हाही काढला नाही. अजित पवार विलीनीकरणाच्या मुद्यावर आमच्याशी केव्हाही बोलले नाहीत. विलीनीकरणाची १२ फेब्रुवारीची तारीख ठरली असती, तर त्यांनी तसे आम्हाला सांगितले असते. या प्रकरणी केवळ शरद पवार गटाकडून दावा केला जात आहे, असे ते म्हणाले. दरम्यान आत्राम यांचा बोलविता धनी कोण आहे याबाबत शरद राष्ट्रवादीत चर्चा रंगली आहे.

### खळबळजनक माहिती...

पान १ वरून

विमान कोसळत असताना त्यातून कुणीतरी बाहेर पडण्याची धडपड करत होते. त्या व्यक्तीला वाचवण्यासाठी आम्ही विमानाच्या दिशेने जात असताना अचानक स्फोट झाला हे मला त्यांनी सांगितले. सदर विमान अपघातात पहिल्यांदा ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. याचा अर्थ विमानात ६ जण होते. मग पाचच जणांचे मृतदेह कसे आढळले? तो सहावा व्यक्ती कुठे गेला? याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीही अमोल मिटकरी यांनी यावेळी केली. गोजुबावीच्या सरपंचाचा दावा काय? : उल्लेखनीय बाब म्हणेज गोजुबावीचे सरपंच कल्याण आटोळे यांनी अजित पवारांच्या विमानाचा अपघात स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्याचा दावा केला आहे. त्यांच्या मते, अपघातावेळी विमानाचा दरवाजा उघडा होता. एक निळी पॅन्ट घातलेला व्यक्ती बाहेर येतोय असे आधी वाटले, पण नंतर तसे काही दिसले नाही. हे विमान अजितदादांचे होते याची कल्पना आम्हाला नव्हती. ते एखाद्या उद्योगपतीचे असेल असे आम्हाला वाटले, असे त्यांनी अपघातानंतर सांगितले होते.

शरद पवारांनाही दिली माहिती : सरपंच कल्याण आटोळे यांनी या प्रकरणी शरद पवारांची भेट घेऊन त्यांनाही ही माहिती दिली. विमानाने कोसळण्यापूर्वी आकाशात २ घिरट्या घातल्या. त्यानंतर खाली येत असताना हा अपघात झाला, असेही ते म्हणालेत. दरम्यान, अजित पवारांच्या विमान अपघातावर अनेकांनी संशय व्यक्त करत या प्रकरणी सखोल चौकशीची मागणी केली आहे.

## निधन वृत्त...

### महादेव डोंगरे



**अक्कलकोट: दि ४ फेब्रुवारी,**

अक्कलकोट शहरातील ज्येष्ठ अडत व्यापारी महादेव गोविंद डोंगरे यांचे बुधवार ४ फेब्रवारी २०२६ रोजी अकस्मात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ४ वाजता अक्कलकोट येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई असा परिवार आहे.



### दुखवट्यात वाढदिवस; नालपेंना निलंबित करा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ फेब्रुवारी-**

येथील तहसील कार्यालयात उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या दुखवटा काळात कार्यालयात मिठाई वाटून व केक कापून वाढदिवस केल्यामुळे वंचित बहुजन आघाडीच्यावतीने निलंबनाची मागणी करण्यात आली आहे. या घटनेमुळे वंचित आघाडीतर्फे तहसीलदार एफ.आर. शेख यांना निवेदन देण्यात आले. मुजोर कर्मचारी संदीप नालपे याची बदली करुन निलंबनाची मागणी करण्यात आली आहे. कारवाई न केल्यास दि.१५ फेब्रुवारीपासून बेमुदत धरणेचा इशाराही दिला आहे. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष ॲड. विवेक गजशिव, धनंजय जगदाळे, ॲड. विक्रम सावळे, बापूसाहेब चोबे, उमेश नायकुडे, वैभव जाधवर, अश्वकुमार अहिरे, आनंद चव्हाण, सूरज भालशंकर, साहिल शेख उपस्थित होते.

# कॉंग्रेस शहर अध्यक्ष बदलासाठी माजी आमदार-माजी महापौर आक्रमक

### चेतन नरोटे यांनी राजीनामा देण्याची आग्रही मागणी

सोलापूर : महापालिका निवडणुकीनंतर शहर कॉंग्रेसमध्ये पक्षांतर्गत असंतोष उफाळून आला असून, शहर अध्यक्षपद बदलासाठी आता उघडपणे मागणी जोर धरू लागली आहे. कॉंग्रेस कमिटी वाऱ्यावर सोडून निवडणूक लढविणाऱ्या चेतन नरोटे यांनी शहराध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याची आग्रही मागणी माजी आमदार विश्वनाथ चाकोते आणि माजी महापौर आरिफ शेख यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केली आहे.

शहर कॉंग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे यांना हटवण्याची थेट मागणी केली आहे. अध्यक्षपद बदलले नाही, तर आम्ही पक्षाचा राजीनामा देण्यासही मागेपुढे पाहणार नाही, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. माजी आमदार विश्वनाथ चाकोते यांनी सांगितले की, विधानसभा तसेच महापालिका निवडणुकांच्या काळात पक्षाची यंत्रणा पूर्णपणे निष्क्रिय होती. अध्यक्षपदावर असलेल्या व्यक्तीकडून निवडणूक काळात प्रभारी नेमणूक करणे आवश्यक असताना ती करण्यात आली नाही. याचा थेट फटका कॉंग्रेसला सहन करावा लागला, असा आरोप त्यांनी केला.

यावेळी माजी महापौर आरिफ शेख यांनी अधिक आक्रमक भूमिका घेतली. ''एक व्यक्ती, एक पद'' हा कॉंग्रेसचा अधिकृत निर्णय असताना प्रत्यक्षात मात्र अनेक पदे एका व्यक्तीकडेच केंद्रीत असल्याचा आरोप त्यांनी केला. खासदारांवर भाजपाच्या नेत्यांकडून टीका झाल्यानंतरही शहर कॉंग्रेस अध्यक्षांकडून कोणतीही प्रत्युत्तरात्मक भूमिका घेण्यात आली नाही. ही गप्पी भूमिका पक्षासाठी घातक असल्याचे त्यांनी नमूद केले.

महात्मा गांधी जयंतीसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी देखील अध्यक्षांकडे वेळ नव्हता, हा मुद्दा उपस्थित करत त्यांनी नेतृत्वाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच अल्पसंख्याक समाजातील नेत्यांची मनधरणी करण्यात अध्यक्ष अपयशी ठरल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. ''आम्ही वारंवार पक्षश्रेष्ठींना ही बाब कळवली आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस दखल घेतलेली नाही. जर लवकरात लवकर अध्यक्षपदात बदल झाला नाही, तर मी स्वतः कॉंग्रेस पक्षाचा राजीनामा देईन,'' असा ठाम इशारा आरिफ शेख यांनी दिला.

या घडामोडींमुळे शहर कॉंग्रेसमध्ये मोठी खळबळ उडाली असून, आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर ही अंतर्गत नाराजी पक्षासाठी डोकेदुखी ठरण्याची चिन्हे आहेत.

# दादा लाड, भारतभूषणदासजी महाराज यांना जनकल्याण समितीचा 'श्रीगुरुजी पुरस्कार'







**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ४ फेब्रुवारी-**

शेतीभूषण श्रीरंग देवबा लाड (दादा) आणि वाराणसीचे आचार्य श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांना यंदाचा 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती'तर्फे प्रतिवर्षी हा पुरस्कार प्रदान केला जातो. पुण्यात शनिवारी दि. १४ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर उपाख्य श्रीगुरुजी यांच्या जयंतीदिनानिमित्त हा पुरस्कार दिला जातो. या राष्ट्रीय पुरस्काराचे यंदा ३१ वे वर्ष आहे. 'जनकल्याण समिती'चे कार्यवाह राजन गोर्हे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत या पुरस्कारांची घोषणा केली. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अनुसंधान क्षेत्रासाठीचा पुरस्कार लाड यांना आणि समाजप्रबोधन क्षेत्रासाठीचा पुरस्कार भारतभूषणदासजी महाराज यांना प्रदान केला जाईल, असे गोर्हे यांनी सांगितले.

प्रसिद्ध उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेयजी होसबाळे कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आहेत. पुरस्कार प्रदान समारंभ शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता सिम्बायोसिस विमाननगर येथील एसव्हीसी सभागृहामध्ये होईल.

> **'जनकल्याण समिती' ची सेवाकार्ये**
>
> 'जनकल्याण समिती'तर्फे महाराष्ट्रात आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, पूर्वांचल विकास, दिव्यांग कल्याण या पाच प्रमुख क्षेत्रात सतरा मोठे सेवा प्रकल्प चालवले जात आहेत. त्यात प्रामुख्याने आठ शहरांमध्ये पूर्वांचल वसतिगृह प्रकल्प, रुग्णालय, आरोग्य सल्ला, समुपदेशन, रुग्ण सेवा, तीन रक्तकेंद्र, पुण्यातील सेवा भवन, सेरेब्रल पाल्सी विकसन केंद्र, सिकल सेल आणि थॅलेसेमिया प्रकल्प, दिव्यांगांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तसेच तीन जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र आदी सेवाकार्यांचा समावेश आहे.

दादा लाड यांनी कापूस उत्पादनाच्या वाढीसाठी केलेले संशोधन लक्षणीय असून त्यांच्या दादा लाड तंत्रज्ञान संशोधनाला भारतीय कृषी संशोधन परिषेदेनेही (आयसीएआर) मान्यता दिली आहे. ज्वारी, गहू, सोयाबीन आणि तूर लागवड तसेच उत्पादन वाढीसाठीही लाड यांनी महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे. लाल कंधारी प्रजातींच्या देशी गायींचा प्रसार हा त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. आचार्य श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांचे समाजप्रबोधनाचे कार्य गेली अनेक वर्षे सुरू असून प्रामुख्याने उत्तर प्रदेश, छत्तीसगड, मध्य प्रदेश, झारखंड, ओरिसा, राजस्थान, गुजरात, पंजाब, हरियाणा, दिल्ली आदी राज्यांमध्ये संत गुरु रविदास यांनी दिलेला संदेश जनमानसापर्यंत पोहोचवून समाज जोडण्याचे त्यांचे कार्य लक्षणीय आहे. समाजातील भेदभाव, कुरीती संपाव्यात यासाठी भारतभूषणदासजी महाराज प्रबोधनाचे कार्य सातत्याने करत आहेत. पुणेकर नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून दादा लाड आणि आचार्य श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांच्या कार्याला प्रोत्साहित करावे, असे आवाहन 'जनकल्याण समिती'तर्फे करण्यात आले आहे. संस्थेचे सहकार्यवाह मुकुल पाटगावकर यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री,संस्थेचे कार्यकारिणी सदस्य विनायक डंबीर यांची प्रमुख उपस्थिती होती.


केंद्रीय गृहमंत्री अमित शाह गुरुवारी जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर येत आहेत. या पृष्ठभूमीवर जवानांनी श्रीनगरमध्ये शोधमोहीम हाती घेतली आहे. मात्र, या दोन चिमुकल्यांना याचे काहीच घेणेदेणे नसून ते आपल्याच मस्तीत बागडत आहेत

# नीट-पीजी पात्रतेवर केंद्र सरकारला नोटीस

## कट-ऑफच्या निर्णयावर सुप्रीम कोर्टात सुनावणी

◆ **नवी दिल्ली, ४ फेब्रुवारी**

सत्र २०२५-२६ साठी नीट-पीजी अर्थात् पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणासाठी कट-ऑफ कमी करण्याला आव्हान देणाऱ्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि संबंधित मंडळ, संस्थांना बुधवारी नोटीस जारी करून एक आठवड्यात उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. याप्रकरणाची पुढील सुनावणी १६ फेब्रुवारी रोजी निश्चित केली आहे.



याचिकेत राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान मंडळाने १३ जानेवारी २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेला आव्हान देण्यात आले. यात २०२५-२६ साठीच्या शैक्षणिक सत्रासाठी पात्रता कट-ऑफ टक्केवारी असामान्यपणे कमी पातळी, शून्य आणि अगदी नकारात्मक पातळीपर्यंत कमी केली. सामाजिक कार्यकर्ते हरिशरण देवगण, डॉ. सौरव कुमार, डॉ. लक्ष्य मित्तल आणि डॉ. आकाश सोनी यांनी ही याचिका दाखल केली. पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणातील किमान पात्रता निकष कमी करणे हे मनमानी, असंवैधानिक आणि संविधानाच्या कलम १४ आणि २१ चे उल्लंघन करणारे आहे, असा युक्तिवाद याचिकेत करण्यात आला. हा प्रकार रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी, सार्वजनिक आरोग्यासाठी आणि वैद्यकीय व्यवसायाच्या अखंडतेसाठी गंभीर धोका निर्माण करते. पदव्युत्तर स्तरावर पात्रता कमी करणे हे स्थापित कायद्याच्या आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या वैधानिक आदेशाच्या विरुद्ध असल्याचा आरोपही याचिकेतून केला. याची दखल घेत न्यायालयाने संबंधित संस्थांना नोटीस बजावत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. ◀(वृत्तसंस्था)

# बीएलए बंडखोरांविरुद्ध लढण्यासाठी शस्त्रेच नाहीत

## पाकिस्तानी संरक्षण मंत्र्यांची संसदेत कबुली, बलुचिस्तानची सुरक्षा करणे सैन्यांसमोर आव्हान

◆ **इस्लामाबाद, ४ फेब्रुवारी**

बलुचिस्तान लिबरेशन आर्मी अर्थात् बीएलए बंडखोरांकडे पाकिस्तानी सैन्यापेक्षा अधिक प्रगत आणि महागडी शस्त्रे आहेत. बीएलएकडे असलेल्या २० हजार डॉलर्स किंमतीच्या अत्याधुनिक रायफल्समुळे पाकिस्तानी सैन्य त्यांच्याशी लढण्यासाठी असहाय्य असून बलुचिस्तानची सुरक्षा करणे आमच्यासाठी मोठे आव्हान असल्याची कबुली पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी संसदेत दिली.



राष्ट्रीय संसदेत बलुचिस्तानमधील सुरक्षा परिस्थितीवरील चर्चेदरम्यान बोलताना आसिफ म्हणाले, बीएलए पाकिस्तानी सैन्यापेक्षा अधिक प्रगत आणि महागडी शस्त्रे वापरत आहेत आणि पाकिस्तानी सैन्याकडे अशी शस्त्रे नाहीत. बंडखोरांकडे २० हजार डॉलर्स किंमतीची महागडी आणि अत्याधुनिक शस्त्रे आहेत. यात २० दशलक्ष रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या रायफल्सचा समावेश आहेत. आमच्याकडे अशा रायफल्स नाहीत. त्यांच्याकडे ४,००० ते ५,००० डॉलर्स किमतीचे थर्मल वेपन साईट्स आणि लेसर सिस्टीम आहेत, ज्यामुळे ते रात्रीच्या अंधारातही अचूक लक्ष्य भेदू शकते. बलुचिस्तानच्या विशाल प्रांताचे संरक्षण करणे पाकिस्तानी सैन्यासाठी मोठे आव्हान आहे. हा प्रांत पाकिस्तानच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४० टक्केपेक्षा जास्त आहे. आमचे सैनिक या भागात सक्रिय आहेत मात्र इतक्या मोठ्या क्षेत्राचे रक्षण करण्यास शारीरिकदृष्ट्या सक्षम नाही. महिला आत्मघाती बॉम्बर्स आमच्यासाठी आव्हान आहे. ◀(वृत्तसंस्था)



### हल्ल्यासाठी अमेरिकन शस्त्रांचा वापर

बीएलएकडे अमेरिकन बनावटीची शस्त्रे आहेत. अफगाणिस्तानात मागे सोडलेल्या अमेरिकन सैन्याची शस्त्रे बंडखोरांकडे असून, त्याचा वापर पाकिस्तानी लष्करावर हल्ल्यासाठी केला जातो. बलुचिस्तानातील अशांततेसाठी परकीय शक्ताचा हात आहे. तस्कर आणि गुन्हेगारीमध्ये सक्रिय असलेल्या टोळ्यांकडून त्यांना आर्थिक पुरवठा केला जातो, असे आसिफ यांनी सांगितले. ■

### १९७ बंडखोरांचा खात्मा

लष्करी कारवाईत आतापर्यंत १९७ बंडखोर मारले गेले, तर ३६ नागरिकांचा मृत्यू झाला. देशाचे रक्षण करताना २२ सुरक्षा कर्मचाऱ्यांना जीव गमवावा लागला. बंडखोरांनी बँका, तुरुंग आणि पोलिस ठाण्यांवर हल्ला केला. लष्करी प्रतिष्ठानांवर आणि नागरी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर आत्मघातकी हल्ले करण्यात आले. सशस्त्र बंडखोरांनी अनेक मार्ग अडवले आणि स्थलांतरित कामगारांना लक्ष्य केल्याची माहिती आसिफ यांनी दिली. दुसरीकडे बीएलएने तीन दिवस केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानी सैन्य, पोलिस, गुप्तचर संस्था आणि दहशतवादविरोधी युनिटमधील २०० हून अधिक जवानांना ठार मारल्याचे सांगितले. ■

# बँकिंग फसवणुकीची निष्पक्ष चौकशी करा

## अनिल अंबानी प्रकरण : सुप्रीम कोर्टाचा सीबीआय, ईडीला आदेश

◆ **नवी दिल्ली, ४ फेब्रुवारी**

अनिल अंबानी यांच्या समूहाशी संबंधित कथित बँकिंग फसवणूक प्रकरणाची निष्पक्ष आणि तटस्थ चौकशी करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय आणि ईडीला दिले.

न्या. जयमाल्य बागची आणि न्या. विपुल एम. पंचोली यांच्या न्यायासनाने अनिल अंबानी यांच्या कंपन्यांनी कथित फसवणूक करून घेतलेल्या कर्जासंदर्भातील प्रकरणावर सुनावणी घेतली. यावेळी आतापर्यंत करण्यात आलेल्या तपासाचा तपशील चार आठवड्यांत सादर करावा, अशा सूचना सीबीआय आणि ईडीला दिल्या.

याप्रकरणाच्या तपासासाठी ईडीने वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नेतृत्वात विशेष तपास पथक अर्थात् एसआयटी स्थापन करावी आणि संबंधित सर्व पक्षांची निष्पक्ष चौकशी करण्याचे निर्देश न्यायासनाने दिले. उद्योगपती अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशनची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी आणि श्याम दिवान यांना जनहित याचिकेवर चार आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले. याचिकाकर्ता ई.ए.एस. शर्मा यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत अनिल अंबानी यांच्या नेतृत्वाखालील कंपन्यांनी बँकेकडून घेतलेल्या कर्जाचा गैरवापर केला. बँकांना बनावट आर्थिक विवरणपत्रे देवून फसवणूक केली. ◀(वृत्तसंस्था)

### परवानगीशिवाय परदेश प्रवास नाही



सुनावणीदरम्यान, रोहतगी यांनी अनिल अंबानींना देश सोडून जाण्यापासून रोखण्यासाठी जारी करण्यात आलेल्या निर्देशाला विरोध केला. त्यांनी न्यायासनाला आश्वासित केले की, अनिल अंबानी भारतातच राहतील आणि न्यायालयाच्या परवानगीशिवाय परदेश प्रवास करणार नाहीत. दरम्यान, तपास यंत्रणांचे प्रतिनिधित्व करणारे तुषार मेहता यांनी सांगितले की, त्यांना परदेश प्रवास करण्यापासून रोखण्यासाठी लुक-आउट नोटीस जारी करण्यात आली. ■

# बंडखोरांना अटक; शस्त्रांसह स्फोटके जप्त

◆ **इम्फाळ, ४ फेब्रुवारी**

मंगळवारी मणिपूरच्या दोन जिल्ह्यांमध्ये दोन दहशतवाद्यांना अटक करून वेगवेगळ्या घटनांमध्ये सुरक्षा दलांनी शस्त्रे आणि स्फोटके जप्त केली, असे पोलिसांनी सांगितले.

ही युद्धसामग्री तेंगनौपाल जिल्ह्यातील बोंगमोल आणि एसएल झौगम गावांजवळ सापडली. एक मॅगझिनसह एके-४७ रायफल, दोन पिस्तूल, दोन सिंगल-बॅरल रायफल, अकरा जिवंत काडतुसे, तीन रेडिओ सेट आणि आयईडीच्या तारा जप्त करण्यात आल्या. सुरक्षा दलांनी घटनास्थळी १८ आयईडी सुरक्षितपणे निकामी केले. इम्फाळ पश्चिम जिल्ह्यात वेगवेगळ्या प्रतिबंधित संघटनांशी संबंधित दोन बंडखोरांनाही अटक करण्यात आली. प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका सदस्याला सोमवारी लंबाल अवांग लेकाई येथील त्याच्या घरातून अटक करण्यात आली. ◀(वृत्तसंस्था)

# रशियाच्या हल्ल्याने युक्रेनची दाणादाण



◆ **कीव्ह, ४ फेब्रुवारी**

रशियाचे लष्कर आणि वायुदलाने बुधवारी रात्री युक्रेनच्या सुमी, खार्किव, कीव, निप्रो, ओडेसा आणि विनित्सिया या भागांना लक्ष्य करीत जोरदार हल्ले चढविले. काही तासातच ४५० ड्रोन आणि ७० क्षेपणास्त्रांचा मारा केल्याने युक्रेनचे धाबे दणाणले. या हल्ल्यात १८ नागरिक ठार, तर ६५ जखमी झाले. अनेक निवासी संकुलासह दुसऱ्या महायुद्धातील ऐतिहासिक इमारत उद्ध्वस्त झाली.

रशिया आणि युक्रेनमधील युद्ध थांबवण्यासाठी विविध पातळ्यांवर चर्चा सुरू आहेत. मात्र असे असले तरी, उभय देशांतील तणाव कमी होण्याचे नाव नाही. रशियाने बुधवारी रात्री युक्रेनच्या ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करीत ७० हून अधिक क्षेपणास्त्रे आणि ४५० ड्रोन्सच्या सहाय्याने जोरदार हल्ले चढविल्याची माहिती युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी एक्सवर पोस्ट करू दिली. यात त्यांनी सांगितले, या हल्ल्यामुळे राजधानी कीव्हमधील दहा हजारहून अधिक निवासी इमारतींचा वीजपुरवठा पुरवठा खंडित झाला. रशियाने कडाक्याच्या थंडीचा फायदा घेत जाणूनबुजून ऊर्जा केंद्रांवर हल्ला चढवला.

सध्या बाधित भागांत दुरुस्तीचे काम सुरू आहे. याशिवाय, दुसऱ्या महायुद्धातील ऐतिहासिक मदरलँड स्मारकाचेही नुकसान झाले आहे. इमारतीच्या ढिगाऱ्यातून १८ मृतदेह बाहेर काढण्यात आले, तर ६५ जखमींन रुग्णालयात हलविले. बचाव पथकाकडून मदतकार्य सुरू आहे. रशियाने हल्ल्यासंदर्भात अद्याप अधिकृच निवेदन जारी केलेले नाही. ◀(वृत्तसंस्था)

**४५० ड्रोन्स**

**७० क्षेपणास्त्रांचा मारा**

**१८ ठार**

**६५ जखमी**

## चित्रपट वार्ता

### सोशल मीडिया आयडीमध्ये भूमीने जोडले वडिलांचे नाव



**मुंबई** : मनोरंजन जगतात अनेक कलाकार नशिबाची साथ मिळावी म्हणून आपल्या नावाचे स्पेलिंग बदलतात, कोणी टोपण नाव धारण करतात. अजय देवगण, रितेश देशमुख आणि कियारा अडवाणी यासारख्या कलाकारांनी आपल्या नावामध्ये बदल केला आहे. या यादीत आणखी एक नाव जोडले आहे. ते म्हणजे भूमी पेडणेकर. तिने आपल्या सोशल मीडिया आयडीमध्ये वडिलांचे नाव जोडले आहे. याविषयी भूमीने सांगितले की, मला माझ्या वडिलांचे नाव लावायचे होते आणि त्यासाठी मला हीच वेळ योग्य वाटली. भूमीचे वडील सतीश पेडणेकर हे महाराष्ट्राचे माजी गृह आणि कामगार राज्यमंत्री होते. २०११ मध्ये त्यांचे कर्करोगाने निधन झाले. भूमीचे मूळ गाव गोव्यातील पेडणे हे आहे. तिचे वडिलोपार्जित घर गोव्यात आहे. ■

### अखेर 'धुरंधर २'मध्ये दिसणार यामी



**मुंबई** : रणवीरसिंहच्या 'धुरंधर २'ची चाहत्यांना आतूरतेने प्रतीक्षा आहे. मात्र, पहिल्या भागाची लोकप्रियता पाहता आता दिग्दर्शक आदित्य धर दुसऱ्या भागात नवनवीन गोष्टींची भर घालत आहेत. अक्षय खन्नाची लोकप्रियता पाहता दुसऱ्या भागात त्याला प्रवेश मिळाला. विकी कौशल यात झळकणार आहे आणि आता आणखी आनंदाची बाब म्हणजे यामी गौतमही यात एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. यात तिचा छोटा पण महत्त्वाचा रोल असेल, असे सांगितले जात आहे. दिग्दर्शक आदित्य धर यामीचे पती असून 'धुरंधर'च्या पहिल्या भागात काम करण्याची तिची इच्छा अपूर्ण राहिली होती. प्रेक्षकांनाही ती या चित्रपटात असावी, असे वाटत होती. त्यामुळे आता दुसऱ्या भागात यामीची आणि तिच्या चाहत्यांची इच्छा पूर्ण होणार आहे. मात्र, याची अधिकृत घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही. ■

### मृत्यूनंतर जॅकी चॅनचे गाणे प्रदर्शित होणार



**शांघाय** : ७१ वर्षांचे प्रसिद्ध अभिनेते आणि मार्शल आर्ट आयकॉन जॅकी चॅन यांनी नुकतेच आपल्या चाहत्यांना धक्का दिला. त्यांनी एक खास गाणे रेकॉर्ड केले, जे त्यांना त्यांच्या मृत्यूनंतर एक अंतिम संदेश म्हणून प्रदर्शित करायचे आहे. मंचावर हे सांगताना त्यांचा आवाज भरून आला, तेव्हा जगाला वाटले की जॅकी आपल्या आयुष्याच्या पुस्तकाचे शेवटचे पान स्वतःच लिहित आहेत. पण प्रत्येक महान अंतापूर्वी एक वादळी कथा असते आणि जॅकीची कथा तर स्वतःच एक पूर्ण चित्रपट आहे. १९५४ मध्ये हाँगकाँगमध्ये जन्मलेल्या जॅकीचे बालपण सोपे नव्हते. १९६१ मध्ये त्यांना चायनीज ऑपेरा रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये पाठवण्यात आले, जिथे २० तासांचे कठोर प्रशिक्षण, शिस्तभंगाची शिक्षा, सततचे प्रदर्शन हे त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनले. त्यांच्या पहिल्या आत्मचरित्रात माय लाईफ इन ॲक्शन (१९९८) मध्ये त्यांनी लिहिले, तिथे अश्रूही परवानगी घेऊन पडत असत. ■

# मध्यप्रदेशात युनानी औषधीशास्त्र हिंदीमध्ये

◆ **भोपाळ, ४ फेब्रुवारी**

ॲलोपॅथीनंतर आता मध्यप्रदेशात युनानी औषधोपचार शास्त्र देखील हिंदीमध्ये शिकवले जाईल. हे साध्य करण्यासाठी, आयुष विभागाने उर्दू पुस्तकांचे हिंदीमध्ये भाषांतर केले आहे. पदवीपूर्व बीयूएमएसच्या पहिल्या वर्षात सात विषय आहेत. यापैकी पाच विषयांची पुस्तके अनुवादित करण्यात आली आहेत. दोन विषयांची पुस्तके उर्दू आणि अरबीमध्ये आहेत.

वैद्यकीय शिक्षण विभागाने शरीरशास्त्र आणि शरीरक्रियाविज्ञान या विषयावरील पुस्तकांचे भाषांतर केले.

एमबीबीएस अभ्यासक्रमाची पुस्तके, अभ्यास आणि परीक्षा हिंदीमध्ये घेण्याचा उपक्रम मध्य प्रदेशातही सुरू करण्यात आला होता. राष्ट्रीय भारतीय औषध प्रणाली आयोग (एनसीआयएसएम) देखील याला अनुकूल आहे.

आयोगाने हिंदीमध्ये अभ्यासक्रम देखील तयार केला आहे. दरम्यान, वैद्यकीय विद्यापीठ उर्दू आणि इंग्रजीसह हिंदीमध्ये प्रश्नपत्रिका तयार करत आहे. ◀(वृत्तसंस्था)



जातीच्या आधारावर भेदभाव करणे थांबवावे, या मागणीसाठी बुधवारी सवर्ण समाज समितीच्या वतीने छत्तीसगडमधील जगदलपूर येथे यूजीसी नियमांविरोधात आंदोलन करण्यात आले

### हक्कभंग समितीचा कुणाल कामराला समन्स

◆ **मुंबई, ४ फेब्रुवारी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या हक्कभंग समितीने विनोदवीर कुणाल कामरा व शिवसेना उबाठाच्या नेत्या सुषमा अंधारे यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात केलेल्या कथित अपमानजनक टिप्पणीबद्दल सुनावणीसाठी समन्स पाठविला आहे. कामरा व अंधारे यांना १५ दिवसांपूर्वी नोटीस बजावण्यात आली होती. त्यांना गुरुवारी दुपारी २ वाजता समितीसमोर सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे, असे हक्कभंग समितीचे अध्यक्ष असलेले भाजपाचे आमदार प्रसाद लाड यांनी बुधवारी सांगितले. दोन समन्सनंतरही ते हजर न झाल्यास समिती त्यांच्यावर कारवाईचा निर्णय घेईल, असे ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

### विमानात लैंगिक छेडछाडीबद्दल भारतीय नागरिक दोषी

◆ **न्यू यॉर्क, ४ फेब्रुवारी**

एका भारतीय नागरिकाला विमानात लैंगिक गैरवर्तन व हल्ल्याच्या आरोपाखाली दोषी ठरवण्यात आले आहे.

वरुण अरोरा (३८) हा अमेरिकेत कायदेशीर दर्जाशिवाय राहत आहे. मे महिन्यात शिक्षा सुनावल्यावर त्याला दोन वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. न्यायालयाच्या नोंदी व खटल्यादरम्यान सादर केलेल्या पुराव्यांनुसार, ऑगस्ट २०२४ मध्ये, रोड आयलंड आंतरराष्ट्रीय विमानतळावरून रोनाल्ड रेगन वॉशिंग्टन नॅशनल विमानतळाकडे जाणाऱ्या विमानाच्या अंतिम लॅण्डिंगच्या वेळी, एक महिला प्रवासी जागी झाली असता तिला अरोरा लैंगिक छेडछाड करत असल्याचे आढळले. ◀(वृत्तसंस्था)

# बांबूचे कोंब भविष्यातील 'सुपरफूड'

◆ **वॉशिंग्टन, ४ फेब्रुवारी**

भारतासह आशिया खंडातील अनेक देशांमध्ये बांबूचे कोंब अन्न म्हणून सेवन करतात. हे कोंब आरोग्यवर्धक असून रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. परिणामी येणाऱ्या काळात बांबूचे कोंब जगातील 'सुपरफूड'ठरू शकते, असे एका अभ्यासातून उघड झाले आहे.

ॲंगलिया रस्किन विद्यापीठातील संशोधकांनी बांबूच्या कोंबांचा अभ्यास करून यावर प्रयोगशाळेत मानवी चाचण्यात घेतल्या. या अभ्यासाच्या निष्कर्षांनुसार, बांबूच्या कोंबांचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास, आतड्यांचे आरोग्य सुधारण्यास आणि दाह कमी करण्यास मदत होऊ शकते. हे फायदे बांबू कोंबांच्या अद्वितीय पौष्टिक गुणधर्मांमुळे मिळतात. हे शतकानुशतके अनेक पारंपरिक पाककृतींमध्ये एक प्रमुख घटक आहेत. 'ॲडव्हान्सेस इन बांबू सायन्स'मध्ये प्रकाशित झालेले हे संशोधन बांबूला एक पौष्टिक आणि बहुपयोगी खाद्य घटक म्हणून असलेल्या संभाव्यतेवर प्रकाश टाकते. पृथ्वीवरील सर्वात वेगाने वाढणारी वनस्पती असलेला बांबू, दिवसाला ९० सेंटीमीटरपर्यंत वाढू शकतो. बांबूचे कोंब अनेक आशियाई देशांमध्ये, विशेषतः चीन आणि भारतात, आधीच एक सामान्य खाद्यपदार्थ असले तरी, संशोधकांच्या मते ते जगभरातील आहाराचा एक महत्त्वाचा भाग होऊ शकतात.

या अभ्यासानुसार, बांबूच्या कोंबांमध्ये प्रथिने भरपूर प्रमाणात असतात आणि चरबी कमी असते. यामध्ये मध्यम प्रमाणात तंतुमय पदार्थ असतात. ते अमिनो ॲसिड, पोटॅशियम, सेलेनियम आणि ए, बी६, ई, थायामिन व नियासिन यांसारखी जीवनसत्त्वे आणि आवश्यक पोषक तत्वे देखील प्रदान करतात. आशियाच्या काही भागांमध्ये बांबूचे कोंब आवर्जून खाल्ले जातात. जगभरातील आहारांमध्ये एक आरोग्यदायी, शाश्वत घटक म्हणून समाविष्ट होण्याची त्यात प्रचंड क्षमता आहे, परंतु तो योग्य प्रकारे तयार केला गेला पाहिजे, असे यूकेमधील ॲंगलिया रस्किन विद्यापीठातील सार्वजनिक आरोग्याचे प्राध्यापक ली स्मिथ म्हणतात. ◀(वृत्तसंस्था)

**रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत**

**पौष्टिक, बहुपयोगी घटक**



### बांबूमध्ये असतात भरपूर जीवनसत्त्वे

**बांबू कोंब खाण्याचे अनेक फायदे आहेत. यात मधुमेह आणि हृदयरोग यांसारख्या आरोग्याच्या आधुनिक आव्हानांना सामोरे जाण्याची त्याची क्षमता समाविष्ट आहे. ते बांबू आणि त्याच्या अर्कांमधील पौष्टिक घटकांमुळे असण्याची शक्यता आहे, कारण बांबूमध्ये प्रथिने, अमिनो ॲसिड, कर्बोदके, खनिजे आणि जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात.** ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# गोपनीयतेचा 'बाजार' 'मेटा'कुटीला...!

'डेटा' हे २१ व्या शतकातील तेल आहे, हे सुप्रसिद्ध वाक्य सर्वप्रथम क्लाईव्ह हंबी या ब्रिटिश गणितज्ञाने २००६ मध्ये वापरले होते. त्यानंतर एका मासिकाने २०१७ मध्ये यावर एक 'कव्हर स्टोरी' करून ही संकल्पना जगभरात नेली. पण हे 'तेल' काढताना जर देशाच्या गोपनीयतेच्या जमिनीलाच तडे जात असतील, तर तसा व्यापार आम्हाला मान्य नाही. सार्वभौमत्व हे नफ्यापेक्षा केव्हाही श्रेष्ठच आहे, हा विचार भारतीय संदर्भात प्रामुख्याने न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांच्या समितीने मांडला. भारताच्या वैयक्तिक माहिती संरक्षण कायद्याचा मसुदा तयार करताना त्यांनी 'डेटा सार्वभौमत्व' यावर विशेष भर दिला होता. त्याचप्रमाणे, सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील आणि सायबर कायदेतज्ज्ञ पवन दुग्गल यांनीही अनेकदा कंपन्यांचा नफा हा भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांपेक्षा मोठा असू शकत नाही, हे स्पष्ट केले आहे.

आता मात्र 'सर्वोच्च' आदेश आल्याने यात कुठल्याही शंकेला जागाच उरली नाही. 'डेटा शेअरिंग'च्या नावाखाली भारतीय नागरिकांच्या गोपनीयतेच्या हक्काशी अजिबातच खेळ करता येणार नाही. आम्ही एकाही शब्दाचा 'डेटा शेअर' करू देणार नाही, असा कडक इशारा सर्वोच्च न्यायालयाने अमेरिकेतील टेक-जायंट 'मेटा' आणि 'व्हॉट्सॲप'ला दिला, हे फारच चांगले झाले. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचा आदेश केवळ एका कायदेशीर प्रक्रियेचा भाग नाही, तर तो बदलत्या भारताच्या बुलंद आत्मविश्वासाचा हुंकारही आहे. ''तुम्ही नियमांचे पालन करणार नसाल, तर येथून गाशा गुंडाळा'', या शब्दांत न्यायालयाने या कंपन्यांना हासडले. भारताच्या 'डिजिटल' सीमांच्या रक्षणासाठी असे रणशिंग फुंकणे आवश्यकच होते. भारत बलशाली असून येथील नागरिकांचीच नव्हे, तर त्यांच्या गोपनीयतेच्या हक्काचीही सुरक्षा करायला हा देश सक्षम असल्याचे हे संकेत आहेत. कुणीही या देशाला केवळ बाजारपेठ समजून येथील नागरिकांच्या अगतिकतेचा फायदा घेऊ शकत नाही, त्यांच्या गोपनीयतेचा बाजार मांडू शकत नाही, अशा आशयाच्या या इशाऱ्याने 'मेटा' आणि 'व्हॉट्सॲप'च्या पायाखालची वाळू सरकली नसेल तर नवल. कारण आज भारत जगातील सर्वांत मोठी 'डेटा फॅक्टरी' आहे. 'व्हॉट्सॲप'च्या जागतिक नकाशावर नजर टाकली, तर हा देश त्यांचा सर्वांत मोठा बालेकिल्ला दिसतो. आकडेवारीनुसारच बघितले तरी, भारतात हे ॲप वापरणाऱ्यांची संख्या ५५ कोटींच्या पार गेली आहे. जगातील एकूण 'व्हॉट्सॲप'च्या वापरकर्त्यांपैकी जवळपास २५ ते ३० टक्के वाटा एकट्या भारताचा आहे. केवळ 'मेसेंजर' म्हणून नव्हे, तर 'व्हॉट्सॲप पे' आणि 'व्हॉट्सॲप बिझनेस'च्या माध्यमातून ही कंपनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या नसानसांत शिरली आहे. ज्या देशाने या कंपनीला इतका अवाढव्य नफा आणि व्यासपीठ दिले, त्याच देशाच्या कायद्यांना वाकुल्या दाखवण्याचे धाडस हे कसे करू शकतात? हा प्रश्न आज प्रत्येक स्वाभिमानी भारतीयाच्या मनात आहे. त्याचेच प्रतिबिंब सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात आले आहे.

२०२३-२४ च्या आर्थिक आकडेवारीनुसार, मेटा इंडियाच्या जाहिरात महसुलात आणि निव्वळ नफ्यात फार मोठी वाढ झाली आहे. २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात मेटा इंडियाचा एकूण महसूल २४.१ टक्क्यांनी वाढून २२ हजार ७३० कोटी रुपये झाला. या तुलनेत, २०२४-२५ मध्ये या कंपनीचा एकूण महसूल ३० हजार कोटी रुपयांचा टप्पा ओलांडल्याचा अंदाज आहे. ही वाढ ३० ते ३२ टक्के असून, ती प्रामुख्याने 'व्हॉट्सॲप बिझनेस' आणि 'इन्स्टाग्राम रिल्स'वरील जाहिरातींमुळे झाली आहे. या आर्थिक वर्षात मेटा इंडियाचा निव्वळ नफा ६०० कोटी रुपयांच्याही पार जाण्याची दाट शक्यता आहे. मागील वर्षीच्या ४५० कोटींच्या तुलनेत ही सुमारे ३५ टक्के अधिक आहे! हा नफा डोळे पांढरे करणारा आहे. एवढा महसूल गोळा करणारी ही कंपनी भारताला केवळ एक बाजारपेठ समजत आली असून, हा नफा कमावून देणाऱ्या भारतीयांच्या 'प्रायव्हसी'वरही आता मेटाचा डोळा आहे. याला कमालीची कृतघ्नता म्हणावी लागेल. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेली ही चपराक या अवाढव्य नफ्याच्या उन्मादात वागणाऱ्यांना 'मेटा'कुटीला आणण्यासाठी आवश्यक होती. भारतातून होणारी कोट्यवधी रुपयांची कमाई एका बाजूला असताना, दुसऱ्या बाजूला येथील वापरकर्त्यांचा डेटा आपल्या मर्जीनुसार परदेशातील 'सर्व्हर'वर वळवण्याची मेटाची ही खोड म्हणजे 'डिजिटल वसाहतवाद' होय. इंग्लंडच्या ईस्ट इंडिया कंपनीने एकेकाळी जे केले, तेच नव्या तंत्रज्ञानाच्या युगात मेटा करू पाहत आहे आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, जर तुम्हाला या विशाल बाजारपेठेत व्यवसाय करायचा असेल, तर येथील 'लॉ ऑफ लॅण्ड' पाळावाच लागेल. आपण आता केवळ बाजारपेठ नसून, जागतिक धोरणे ठरवणारे शक्तिस्थान आहोत. अमेरिकेलाही अनेक क्षेत्रांत मागे टाकण्याची क्षमता असलेला हा देश जेव्हा संयमीपणे पण ताकदीने निर्णय घेतो, तेव्हा अमेरिकेलाही त्याचे हादरे बसतात. आत्ताच्या 'टॅरिफ' बदलाने हे सिद्धही केले आहे. भारताने 'डेटा प्रोटेक्शन ॲक्ट'च्या माध्यमातून स्वत:ची ढाल आता अधिक मजबूत केली आहे. २०१७ च्या पुट्टास्वामी खटल्याचा निकाल यासंदर्भात महत्त्वाचा टप्पा आहे. 'निवृत्त न्यायमूर्ती के. एस. पुट्टास्वामी विरुद्ध भारत सरकार' या खटल्यात ९ न्यायाधीशांच्या खंडपीठाने एकमताने निर्णय दिला आणि गोपनीयतेचा अधिकार हा भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत एक मूलभूत अधिकार आहे, हे अधोरेखित केले. कोणतीही खाजगी कंपनी किंवा सरकार नागरिकांच्या संमतीशिवाय त्यांच्या खाजगी आयुष्यात डोकावू शकत नाही, हे स्पष्ट झाले. या आधारे, ''तुम्हाला भारतात अशा पद्धतीने व्यवसाय करता येणार नाही'', ही सर्वोच्च न्यायालयाने दिलेली तंबी केवळ 'व्हॉट्सॲप'साठी नाही, तर प्रत्येक परदेशी कंपनीसाठी आहे, जी भारतीय नागरिकांच्या गोपनीयतेचा भंग करू पाहत आहे. व्हॉट्सॲप आपल्या 'प्रायव्हसी पॉलिसी'मध्ये बदल करून वापरकर्त्यांचा डेटा, लोकेशन आणि व्यवहारांची माहिती इतर प्लॅटफॉर्मशी शेअर करण्याचा घाट घालत असेल, तर त्यावर नियंत्रण मिळवणे हे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही आवश्यक आहे. 'एंड-टू-एंड एन्क्रिप्शन'च्या नावाखाली पडद्यामागे काय चालते, याबाबत पारदर्शकता असणे आवश्यक आहे. 'व्हॉट्सॲप'ने २०२१ मध्येच आपल्या सेवा अटी बदलण्याचा प्रयत्न केला होता. त्यानुसार, वापरकर्त्यांचा काही डेटा फेसबुक (मेटा) सोबत शेअर करणे अनिवार्य केले. तेव्हाही सर्वोच्च न्यायालयाने आणि भारतीय स्पर्धा आयोगाने कडक आक्षेप घेतले होते. तुम्ही अब्जावधी डॉलर्सची कंपनी असाल तरी लोकांची गोपनीयता पैशांपेक्षा कितीतरी मोठी आहे, असे स्पष्ट केले होते. २०२३ मध्ये केंद्र सरकारने 'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन' कायदा मंजूर केला. या कायद्यानुसार, जर एखादी कंपनी भारतीय नागरिकांच्या डेटाचा गैरवापर करीत असेल, तर त्या कंपनीवर २५० ते ५०० कोटी रुपयांपर्यंत दंड लादला जाऊ शकतो. पण मेटासारख्या कंपनीने याकडे दुर्लक्ष केले आणि शेवटी ओटीटी मेसेजिंगमध्ये गैरवापर केल्याबद्दल मेटाला २१३ कोटी रुपयांचा दंड ठोठावला गेला. या दंडाविरोधात या कंपनीने न्यायालयात दाद मागितली आहे. त्यावर ९ फेब्रुवारीला अंतरिम आदेश येणार आहे.

या कंपन्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, भारत आता केवळ एक 'पॅसिव्ह कंझ्युमर' राहिला नाही. या देशाकडे आता स्वत:चे कडक कायदे आहेत. 'व्हॉट्सॲप'ला येथे टिकायचे असेल, तर त्यांना 'आयटी नियम २०२१' आणि 'डेटा संरक्षण कायदा' यांचे पालन करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांच्यावर बंदी घालण्याचा अधिकार सरकारकडे सुरक्षित आहे. मेटा कंपनी युरोपच्या कडक नियमांचे पालन करते, कारण तेथे दंड खूप मोठा आहे. सर्वोच्च न्यायालयाने याच मुद्यावर बोट ठेवले आहे. जे नियम तुम्ही युरोपमध्ये पाळता, तेच नियम येथे पाळावेसे कां वाटत नाही? हा प्रश्नही समोर आला. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेचे संपूर्ण देश स्वागत करीत आहे. आता चेंडू 'मेटा'च्या कोर्टात आहे. नियमानुसार व्यवसाय करायचा की मुजोरी करून गाशा गुंडाळायचा, हा सर्वस्वी त्यांचा निर्णय आहे. पर्यायी व्यवस्था करायला भारत देश सक्षम आहे.

## तंत्रवेध

# लघुउद्योगांसाठी 'जेम पोर्टल'

**डॉ. दीपक शिकारपूर**

आपल्या देशाचा सार्वजनिक खरेदी खर्च ३४० अब्ज रुपये आहे. हा खर्च वार्षिक ग्रॉस डोमेस्टिक प्रोडक्ट (जीडीपी) च्या १५ ते २० टक्के इतका आहे. या सरकारी व्यवसायात पुरवठादार होणे हे अनेकांचे स्वप्न असते. आता तर 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया'सारख्या योजनांमुळे आयात कमी करण्यावर सरकारचा भर आहे, पण केंद्र आणि राज्य खरेदी संस्थांमध्ये अनेकदा अकार्यक्षमतेचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण केल्याने विविध विकास योजना आणि प्रकल्पांसाठी संसाधने कमी किमतीत खरेदी करण्यात मदत होऊ शकते. अनेक लघुउद्योग सरकारी पुरवठादार होण्यासाठी प्रयत्नशील असतात. अनेकांना त्याची प्रक्रिया अवघड आणि अनेक अडथळ्यांची वाटते. त्यामुळे अनेक जण त्याचा नाद सोडतात आणि इतरत्र प्रयत्न करतात. भारतातील एकूणच व्यवसायसुलभतेला चालना देण्यासाठी सरकारने अलिकडच्या वर्षांमध्ये अनेक उपाययोजना सुरू केल्या आहेत. आजच्या स्पर्धात्मक जागतिकीकरणाच्या अर्थव्यवस्थेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी या उपाययोजनांनी लहान व्यापारी आणि उत्पादकांना मदत केली आहे. लहान व्यापारी आणि उत्पादकांना सक्षम करण्यासाठी भारत सरकारने एक पारदर्शक 'ई-मार्केटप्लेस' सुरू केले आहे. त्याला 'जेम' म्हणून ओळखले जाते. केंद्र शासनाने राष्ट्रीय खरेदी धोरणांतर्गत खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात बदल केले आहेत. शासकीय वस्तू आणि सेवा खरेदीसाठी केंद्र शासनाने हे पोर्टल विकसित केले आहे. हे पोर्टल एका 'स्पेशल पर्पज व्हेईकल'द्वारे व्यवस्थापित केले जाते.

केंद्रीय वाणिज्य विभागाअंतर्गत विभाग ८ (सेक्शन ८) कंपनी त्यासाठी स्थापन केली आहे. यासाठी पात्रतेचे निकष तसे सोपे आहेत. बोली सादर करण्याच्या शेवटच्या तारखेनुसार, बोलीदाराने संबंधित क्षेत्रातील अनुभवासह किमान गेल्या चार वर्षांपासून भारतात कार्यरत असणे आवश्यक आहे. बोली लावणाऱ्याची सरासरी वार्षिक आर्थिक उलाढाल किमान रुपये ५० लाख असावी. 'जेम पोर्टल' हा एक ऑनलाईन प्लॅटफॉर्म आहे, जिथे विविध सरकारी विभाग आणि सरकारी मालकीच्या उपक्रमांद्वारे सामान्य वापराच्या वस्तू आणि सेवांच्या ऑनलाईन खरेदीची सुविधा असते. हे २०१६ मध्ये पारदर्शक, कार्यक्षम आणि जलद सार्वजनिक खरेदीद्वारे लहान आणि स्थानिक व्यवसायांसाठी ग्राहकांना सुरक्षित करण्यासाठी सुरू करण्यात आले . हे पोर्टल ई-बिडिंग, रिव्हर्स ई-ऑक्शन आणि मागणी एकत्रीकरणासाठी साधने पुरवते, जेणेकरून खरेदीदार आणि विक्रेते या दोघांनाही वाजवी दर मिळण्यास मदत होईल. सर्व पुरवठादारांसाठी सर्वसमावेशक बाजारपेठेचा विचार करून सार्वजनिक सरकारी खरेदीमधील प्रक्रियेवर सकारात्मक परिणाम करणे हे त्याचे ध्येय आहे. तथापि, पोर्टल नोंदणी अत्यावश्यक आहे. जेम पोर्टलवरील विक्रेते मालकी /भागीदारी/प्रोप्रायटरी उद्योग, स्टार्टअप्स किंवा अगदी लिमिटेड कंपन्या असू शकतात. ते त्यांच्या मालाची सरकारी संस्थांद्वारे खरेदीसाठी पोर्टलवर सहजपणे यादी मांडू शकतात आणि सरकारी बोली आणि लिलावांमध्ये भाग घेऊ शकतात. सामान्य आर्थिक नियम, २०१७ मध्ये नवीन नियम क्रमांक १४९ जोडून सरकारी युजर्सद्वारे जेम पोर्टलद्वारे खरेदी वित्त मंत्रालयाने अधिकृत आणि अनिवार्य केली आहे. जेम पोर्टलवर व्यवहार करायचे काही फायदे आहेत.

डिजिटली सक्रिय मार्केटप्लेस म्हणून हे पोर्टल सर्व सरकारी विभाग तसेच विक्रेत्यांसाठी अगदी सहज आणि थेट उपलब्ध आहे. विक्रेत्यांसाठी विपणनाचे (मार्केटिंग) प्रयत्न बरेच कमी झाले आहेत. विक्रेत्यांना विविध शासकीय विभागांच्या निविदांचे पालन करण्याची गरज नाही. एकदा त्यांनी त्यांची उत्पादने ऑफर केली की, सरकारी विभाग स्वतः विक्रेत्यांशी संपर्क साधतात. पुरवठादाराच्या किंवा विक्रेत्याच्या हमी किंवा वॉरंटीविरुद्ध स्वीकारलेली उत्पादने नियमित माल तपासणी, चाचणी आणि मूल्यमापन प्रक्रियेपासून मुक्त असतात. विक्रेते त्यांच्या उत्पादनांची वैशिष्ट्ये स्व-परिभाषित करण्यास मोकळे आहेत. शिवाय, या उत्पादनांमध्ये कोणती वैशिष्ट्ये असावीत किंवा नसावीत यावर कोणतेही निर्बंध नाहीत. विक्रेते त्यांची उत्पादने कधीही आणि त्यांना पाहिजे तितक्या वेळा अपग्रेड करू शकतात. वर्षातील कोणत्याही वेळी बाजाराच्या परिस्थितीनुसार उत्पादनांच्या किमती वाढवता किंवा कमी केल्या जाऊ शकतात. त्यामुळे विक्रेत्यांना कच्च्या मालाच्या किमतीतील चढउतारांची किंवा विनिमय दराच्या मूल्यांची भीती बाळगण्याची गरज रहात नाही, कारण त्याचा बोजा खरेदीदारांवर सहज टाकला जाऊ शकतो.

जेम पोर्टलवर विक्री करण्यासाठी, संबंधित खरेदीदार आणि विक्रेत्यांना ऑनलाईन जीईएम पोर्टल नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावी लागेल. त्यासाठी व्यवसायाच्या अधिकृत प्रतिनिधीचे पॅनकार्ड आणि आधार कार्ड, व्यवसायाच्या अधिकृत प्रतिनिधीची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी मागील तीन वर्षांच्या प्राप्तिकर विवरणपत्रांची प्रत, व्यवसाय इन्कॉर्पोरेशन आणि कॉर्पोरेट ओळख प्रमाणपत्र किंवा संबंधित व्यवसायाचे एमएसएमई प्रमाणपत्र किंवा संबंधित व्यवसायाचा उद्योग आधार क्रमांक (उपलब्ध असल्यास), व्यवसायाचे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, संबंधित व्यवसायाच्या रद्द केलेल्या चेकच्या प्रतीसह बँक खाते तपशील, व्यवसायाच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या जागेचा पत्ता पुरावा आदी दस्तावेज/ओळखपत्रे आवश्यक आहेत. जेम पोर्टलवर खरेदीदार किंवा विक्रेता म्हणून नोंदणी पूर्णपणे विनामूल्य आहे. भारत सरकार नोंदणीसाठी कोणतेही शुल्क आकारत नाही. तथापि, सल्लागार किंवा एजंट नियुक्त केला आणि तो नोंदणी करत असल्यास त्याचे सल्लागार शुल्क भरावे लागेल.

जेम पोर्टलवर नोंदणी केल्यानंतर, विक्रेत्यांना आपली उत्पादने किंवा सेवा निर्दिष्ट श्रेणींमध्ये सूचीबद्ध कराव्या लागतात. पोर्टलवर त्याचे तपशील देऊन ऑर्डर प्राप्त झाल्यावर माल पाठवणाऱ्या व्यक्तीला वितरित करणे आवश्यक आहे. ऑर्डर वितरित केल्यानंतर प्रेषणकर्ता उत्पादनाची तपासणी करून ऑनलाईन स्वीकृती किंवा नकार जारी करतो. 'कन्साइनी' ऑर्डर स्वीकारतो तेव्हा तो/ती 'कन्साइनी'ची पावती आणि स्वीकृती प्रमाणपत्र तयार करतो. ते जारी केल्यानंतर खरेदीदार बिलावर प्रक्रिया करतो आणि ते देयक प्राधिकरणाकडे पाठवतो. ऑर्डर स्वीकारल्यापासून दहा दिवसांच्या आत देय रक्कम अदा केली जाते. जेम पोर्टलवर सर्व खरेदी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शकतेने पार पाडल्या जातात. यामुळे भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार कमी होण्यास मदत होते.

जेम पोर्टलमुळे खरेदी प्रक्रियेतील कागदपत्रे आणि इतर औपचारिकता कमी होतात. त्यामुळे वेळ आणि पैशाची बचत होते. पोर्टलवर विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवा उपलब्ध आहेत. त्यामुळे खरेदीदारांना त्यांच्या गरजेनुसार योग्य वस्तू आणि सेवा निवडण्यास मदत होते. इथे स्थानिक विक्रेत्यांना सरकारी खरेदीमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन असते. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# 'खेळ' जीवन-मृत्यूचा

घातपात, अपघात, आत्महत्या याच्या बातम्या फार ठळकपणे द्यायच्या नाहीत, असा दंडक बरीच माध्यमे पाळताना दिसतात. हा नियम प्रत्येक माध्यमाने आपल्या संवेदनशीलतेतून बनवला आहे. कारण अशा बातम्यांनी एक विचित्र नकारात्मकता येते, असे निरीक्षण नोंदविण्यात आले. पण, कधी कधी समाजहितासाठी अशा घटनांच्या वृत्ताला प्राधान्यक्रम द्यावा लागतो. गाझियाबादमध्ये तीन सख्ख्या बहिणींनी ऑनलाईन गेमच्या व्यसनापायी आत्महत्या केली. दुसरीकडे, भोपाळमध्ये एका आठवीतील मुलाने याच कारणातून स्वत:ला संपवले. काही वर्षांपूर्वी पब्जी या गेममुळे अनेक किशोरांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या होत्या. याच्या बातम्या सातत्याने समोर आल्यानंतर सरकारने त्यावर बंदी आणली. आता पुन्हा ऑनलाईन गेमचे जीवघेणे प्रकार समोर येत आहेत. गाझियाबादमध्ये १२ ते १६ वयोगटातील तीन सख्ख्या बहिणींनी एकापाठोपाठ एक वरच्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केल्याची घटना तर फारच धक्कादायक आहे. आता त्यांचे वडील म्हणताहेत की, या मुली पाच वर्षांपासून कोरियन गेम खेळत होत्या. घरातील त्यांचे प्रत्येक काम त्या खेळातील आदेशानुसार चालायचे. त्यांच्यावर या खेळाचा इतका प्रभाव होता की त्यांनी स्वत:देखील कोरियन नावे धारण केली होती.

विरंगुळा म्हणून अधूनमधून खेळले जाणारे हे खेळ आता मुलांच्या जिवाशी खेळत आहेत. या पृष्ठभूमीवर सर्वच संबंधितांनी अंतर्मुख होऊन सारासार विचार केला पाहिजे.



अलिकडच्या काळात पॉकेमॉन जगभर गाजला. मात्र, कित्येक खेळगडी अपघातात जायबंदी झाले तेव्हा आभासी जगात भरधाव वेगाने ओढत नेणाऱ्या या खेळातला धोका कळला. या मुद्यावर समस्त पालकांनी गांभीर्याने अंतर्मुख व्हायला हवे आणि अशा स्वरूपाच्या घटना टाळायच्या असतील तर पाल्याची केवळ 'फिजिकल ऑटोप्सी'च नव्हे, तर 'सायकॉलॉजिकल ऑटोप्सी'देखील करायला हवी, असे वाटते. म्हणजेच मुलांच्या भावविश्वात पालकांनी तसेच शिक्षकांनी संवेदनशीलतेने डोकावले पाहिजे.

नुकतेच दररोज १२ तास कॉम्प्युटर गेम खेळणारा किशोरवयीन मुलगा दिल्लीतील रुग्णालयात दाखल झाला. कारण काय, तर या खेळाच्या नादात त्याची सारासार विचार करण्याची शक्तीच खुंटली. झोप, कुटुंबीयांशी संवाद जणू बंदच झाले. आता त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अशा नादावलेल्या मुलांना वेळीच सावरले नाही तर घरोघरी खुनी खेळाचे डाव रंगतील हे सांगायला का हवे? विशेष म्हणजे, या जीवघेण्या खेळांपैकी अनेक खेळ असे आहेत ज्यांत अट असते की, पालकांशी बोलू नका. यावरून आपण पालकांच्या मुलांशी असलेल्या संवादाचे महत्त्व ओळखले पाहिजे. आपली मुले अर्धवट समजाच्या स्थितीत असताना त्यांची मानसिकता गोंधळलेली असते. अशा वेळी त्यांच्याशी संवाद साधण्याची कसरत पालकांनीच केली पाहिजे. त्यात जर पालक यशस्वी झाले तर मुलांसोबतचा त्यांचा संवादसेतू नेहमीसाठी सांधला जातो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या शताब्दी वर्षानिमित्त समाजाला दिलेल्या पंचसूत्रीमध्ये कुटुंब प्रबोधन हा मुद्दा प्रकर्षाने मांडण्याची गरज आता निर्माण झाली आहे. कारण माणसाची पहिली जडणघडण ही कुटुंबातच होते. आपण पाश्चिमात्यांप्रमाणे कुटुंबापासून विलग होत नाही. तेथे मुलांना फार लवकर कुटुंबापासून वेगळे काढून स्वावलंबनाच्या नावाखाली जगाशी लढण्यासाठी मोकळे सोडले जाते. तो टक्केटोणपे खात जगत असतो. कुटुंबाला त्याच्या या संघर्षाशी जणू काहीच देणेघेणे नसते. आपल्या भारतीय समाज व्यवस्थेत सुदैवाने अशी वेळ अजून आलेली नाही. आपल्याकडे आजही कुटुंबाला फार महत्त्व आहे. किंबहुना कुटुंबव्यवस्था हे आपल्या समाजाची घडी नीट ठेवण्याचे मुख्य कारण आहे. सुख-दु:खाच्या काळात सोबत उभे राहणारे कुटुंब मोठा आधार ठरते. त्यामुळे आपली कुटुंबव्यवस्था सांभाळण्यासाठी पालकांनी आपल्या मुलांशी संवाद प्रस्थापित करणे आणि त्याद्वारे त्यांना जीवन योग्य पद्धतीने जगण्यासाठी प्रोत्साहित करताना 'आम्ही आहोत' हा विश्वास निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. असे झाले तर जगातील कोणताही खेळ आपल्या नव्या पिढीच्या भावनांशी आणि जीवाशी खेळण्याची हिंमतही करणार नाही. या आणि पुढील प्रत्येक पिढीच्या पाठीशी भक्कम पाठिंबा म्हणून कुटुंब उभे राहील. ही आता काळाची गरज आहे.

७७५५९३८८२२

## दिल्ली वार्तापत्र

# देशातील महिला उपमुख्यमंत्री

**श्यामकांत जहागीरदार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे धडाडीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान अपघातातील दुर्दैवी मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रातील महायुतीच्या मंत्रिमंडळात समावेश झाला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची संपूर्ण सूत्रेही पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून लवकरच त्यांच्या हातात येतील, हे निश्चित आहे. या घटनाक्रमाने सुनेत्रा पवार याच दादांच्या राजकीय उत्तराधिकारी आहेत, हे स्पष्ट झाले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांनी पराभव केल्यामुळे सुनेत्रा पवार यांना राज्यसभेत यावे लागले. सध्या त्या राज्यसभेच्या सदस्य आहेत. उपमुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात पदार्पण केल्यामुळे पवार यांना राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागणार आहे आणि शपथ घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत त्यांना विधानसभा वा विधान परिषदेवर निवडून यावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आतापर्यंत अनेक नेत्यांचा उपमुख्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाला, यात नाशिकराव तिरपुडे, सुंदरराव सोळंकी, रामराव आदिक, गोपीनाथ मुंडे, विजयसिंह मोहिते पाटील, छगन भुजबळ, आर. आर. पाटील, अजितदादा पवार यांचा समावेश आहे. देवेंद्र फडणवीस यांनीही उपमुख्यमंत्रिपद भूषवले आणि एकनाथ शिंदे तर विद्यमान उपमुख्यमंत्री आहेत, पण या दोघांच्या उपमुख्यमंत्री होण्यात थोडा गुणात्मक फरक आहे. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे हे दोघेही आधी मुख्यमंत्री होते आणि नंतरच्या राजकीय घडामोडीत त्यांना उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावे लागले. अन्य नेत्यांची मजल मात्र उपमुख्यमंत्रिपदाच्या वर गेली नाही.

१९७८ पासून २०२६ पर्यंत महाराष्ट्रात १५ उपमुख्यमंत्री होऊन गेलेत. यात सर्वाधिक म्हणजे सहा वेळा अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद भूषवले. नाशिकरराव तिरपुडे हे महाराष्ट्रातील पहिले उपमुख्यमंत्री आहेत. वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात चार-पाच महिन्यांसाठी तिरपुडे उपमुख्यमंत्री होते. सुंदरराव सोळंकी हे राज्यातील दुसरे उपमुख्यमंत्री. शरद पवार यांच्या मंत्रिमंडळात सोळंकी उपमुख्यमंत्री होते. वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या दुसऱ्या कार्यकाळात बॅ. रामराव आदिक उपमुख्यमंत्री होते. महाराष्ट्रातील युती सरकारच्या कार्यकाळात गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री होते. मनोहर जोशी आणि नारायण राणे अशा दोन मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात मुंडे उपमुख्यमंत्री होते. छगन भुजबळ विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे आणि अशोक चव्हाण या तीन मुख्यमंत्र्याच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री होते. सुशीलकुमार शिंदे यांच्या मंत्रिमंडळात विजयसिंह मोहिते पाटील यांनाही उपमुख्यमंत्रिपद भूषवण्याची संधी मिळाली. विलासराव देशमुख यांच्या सरकारमध्ये आर. आर. पाटील उपमुख्यमंत्री होते. महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वाधिक म्हणजे सहावेळा अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद भूषवले. यातील दोनवेळा ते पृथ्वीराज चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात तर प्रत्येकी एकदा उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री होते. देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातही दादांना दोनदा उपमुख्यमंत्रिपद भूषवता आले. अजितदादा पवार ११ नोव्हेंबर २०१० ला पहिल्यांदा उपमुख्यमंत्री झाले, त्यानंतर एखाददुसरा अपवाद वगळता २०२६ पर्यंत ते सलग उपमुख्यमंत्री होते. चार मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात जवळपास बारा वर्ष दादांनी महाराष्ट्रात उपमुख्यमंत्रिपद सांभाळले. सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्रिपद सांभाळण्याचा विक्रम महाराष्ट्रातच नाहीतर देशातही जसा दादांच्या नावावर आहे, तसाच सर्वांत कमी काळ म्हणजे फक्त पाच दिवस उपमुख्यमंत्री राहण्याचा विक्रमही दादांच्याच नावावर नोंदला गेला आहे.

आता दादांनंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री झाल्या. सुनेत्रा पवार या महाराष्ट्रातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आहेत. पक्षाचा विचार केला तर सर्वाधिक उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे झाले. त्यानंतर काँग्रेसचे तीन, भाजपाचे दोन तर शिवसेनेचा एक झाला. नाशिकराव तिरपुडे, सुंदरराव सोळंकी आणि रामराव आदिक हे तीन उपमुख्यमंत्री काँग्रेसचे होते. गोपीनाथ मुंडे आणि देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री भाजपाचे होते, तर एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री शिवसेनेचे आहेत. छगन भुजबळ, विजयसिंह मोहिते पाटील, आर. आर. पाटील आणि अजितदादा पवार हे सर्व उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे होते.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला तर एकही उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री झाला नाही. सर्वच उपमुख्यमंत्र्यांना मुख्यमंत्रिपदाने हुलकावणी दिली. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांचा याला अपवाद यासाठी म्हणावा लागेल की हे दोघेही आधी मुख्यमंत्री होते, नंतर त्यांना राजकीय तडजोड म्हणून उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावे लागले.

मुळात घटनेत कुठेही उपमुख्यमंत्रिपदाची तरतूद नाही. राजकीय सोय म्हणून युती आणि आघाडीच्या राजकारणात तसेच पक्षांतर्गत संतुलन राखण्यासाठी म्हणून हे पद निर्माण करण्यात आले. उपमुख्यमंत्र्याचा दर्जा हा सर्वांत वरिष्ठ कॅबिनेट मंत्र्याचाच असतो. एका कॅबिनेट मंत्र्याला जो दर्जा आणि अधिकार असतात, तेवढेच उपमुख्यमंत्र्यालाही असतात, त्यामुळे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणाऱ्याला उपमुख्यमंत्री म्हणून नाही तर कॅबिनेट मंत्री म्हणूनच शपथ दिली जात असते. देशातील अनेक राज्यात राजकीय सोय आणि सत्तासंतुलन राखण्यासाठी उपमुख्यमंत्रिपद निर्माण केले जाते. काही राज्यांत एक तर काही राज्यांत दोन उपमुख्यमंत्री असतात. सध्या महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांत दोन उपमुख्यमंत्री आहेत. काही वर्षांपूर्वी आंध्रप्रदेशात जगनमोहन रेड्डी यांनी आपल्या मंत्रिमंडळात पाच उपमुख्यमंत्री ठेवले होते. रागलोभ आणि राजीनाराजी नको म्हणून प्रत्येक जातीच्या नेत्याला त्यांनी उपमुख्यमंत्री केले होते.

देशाच्या इतिहासात आतापर्यंत एकच उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री झाला, तो म्हणजे पंजाबच्या राजिंदर कौर भट्टल. नंतर महाराष्ट्रातीलच नाही तर देशातीलही कोणत्याही उपमुख्यमंत्र्याला मुख्यमंत्री होण्याचे भाग्य लाभले नाही. ६ ऑगस्ट १९९६ ते २१ नोव्हेंबर १९९६ या काळात भट्टल पंजाबच्या उपमुख्यमंत्री होत्या. विशेष म्हणजे मुख्यमंत्री झाल्यानंतरही त्यांनी ६ जानेवारी २००४ ते १ मार्च २००७ या काळात दुसऱ्यांदा पंजाबच्या उपमुख्यमंत्री म्हणून काम केले. देशाच्या राजकारणात आतापर्यंत आठ महिलांना उपमुख्यमंत्रिपद भूषवण्याची संधी मिळाली. यात जमुनादेवी (मध्यप्रदेश), कमला देवी (राजस्थान), पमुला पुष्पा श्रीवाणी (आंध्रप्रदेश) आणि रेणुदेवी (बिहार) यांचा समावेश आहे. मध्यप्रदेशच्या उपमुख्यमंत्री असलेल्या जमुनादेवी यांनी सर्वाधिक म्हणजे ५ वर्ष ७ दिवस उपमुख्यमंत्रिपद सांभाळले. कमला बेनीवाल सर्वांत कमी म्हणजे फक्त ३१७ दिवस राजस्थानच्या उपमुख्यमंत्री होत्या. सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री झाल्यामुळे देशातील विद्यमान महिला उपमुख्यमंत्र्यांची संख्या तीन झाली आहे. सध्या प्रभाती परिदा या ओडिशाच्या तर दियाकुमारी या राजस्थानच्या महिला उपमुख्यमंत्री आहेत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या सर्वेसर्वा आहेत. त्यामुळे त्या एकाचवेळी सरकार आणि पक्षावरही आपली पकड ठेवू शकतात. याचा त्यांना त्यांच्या दीर्घकालीन राजकीय कारकीर्दीत फायदा होऊ शकतो.

९८८१७१७८१७

## कचारगड यात्रा : आदिवासी संस्कृतीच्या अस्मितेचा वारसा

कचारगड ही मध्य भारतातील आदिवासी समाजाची अत्यंत पवित्र, ऐतिहासिक व सांस्कृतिक भूमी आहे. महाराष्ट्र, छत्तीसगड व मध्यप्रदेश यांच्या सीमेलगत घनदाट जंगलात वसलेली ही विशाल नैसर्गिक गुहा गोंड समाजाच्या श्रद्धेचे केंद्र मानली जाते. गोंड आदिवासी जमातीच्या दृष्टीने कचारगड ही केवळ धार्मिक आस्था नसून आदिवासी संस्कृती, जीवनमूल्ये आणि निसर्गपूजक जीवनदर्शन यांचे जिवंत प्रतीक आहे. येथे माता काली कंकाली आणि पहांदी पारी कुपार लिंगो यांच्याशी संबंधित लोककथा व परंपरा खोलवर रुजलेल्या आहेत. दरवर्षी माघ पौर्णिमेला होणारी कचारगड यात्रा ही उत्सवापेक्षा अधिक ती जिवंत इतिहास, सामूहिक स्मृती आणि सांस्कृतिक एकात्मतेचा महोत्सव आहे. या यात्रेच्या माध्यमातून आदिवासी संस्कृतीचे विविध पैलू लोकनृत्य, लोकगीते, पारंपरिक वेशभूषा, अनुभवकथन आणि सामाजिक संवादातून सजीवपणे प्रकट होतात.

कचारगड हे ठिकाण महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यात अतिदुर्गम व घनदाट जंगलांनी वेढलेल्या डोंगररांगांमध्ये स्थित आहे. गोंदियापासून सुमारे ५५ किलोमीटर अंतरावर डोंगराच्या कडेला वसलेल्या या लेणी म्हणजे नैसर्गिक गुहांची एक भव्य मालिका असून त्या पूर्णपणे नैसर्गिकरीत्या घडलेल्या आहेत आणि आशिया खंडातील सर्वांत मोठ्या गुहांपैकी एक मानल्या जातात. या गुहा अश्मयुगीन काळातील असून सुमारे २५ हजार वर्षे जुन्या असल्याचा अभ्यासकांचा अंदाज आहे. लोककथांनुसार आदिवासी समाजाचा उगम कचारगडाच्या या गुहेतून झाला असल्याचं मानलं जातं आणि येथे आढळलेले पाषाणयुगीन मानवी अवशेष या मान्यतेला ऐतिहासिक संदर्भ प्रदान करतात. त्यामुळे कचारगड हे केवळ धार्मिक स्थळ न राहता ऐतिहासिक व मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाचं ठिकाण ठरते. गोंड आदिवासी समाजासाठी कचारगड हे पवित्र श्रद्धास्थान असून दरवर्षी येथे पाच दिवस चालणारी कचारगड यात्रा भरते. या यात्रेमध्ये महाराष्ट्रासह देशातील सुमारे १८ राज्यांमधून लाखो आदिवासी बांधव सहभागी होतात. ऐतिहासिकदृष्ट्या या लेण्या मानवी वसाहतींच्या प्राचीन पुराव्यांचे संकेत देतात तर सांस्कृतिकदृष्ट्या कचारगड हे गोंड आदिवासी समाजाच्या धार्मिक श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक ओळखीचे अत्यंत महत्त्वपूर्ण केंद्र मानले जाते. म्हणूनच आज कचारगड ही केवळ धार्मिक घटना न राहता सामाजिक जागृती आणि सांस्कृतिक आत्मभानाचा एक महत्त्वाचा आधार ठरते.

**करुणा महादेव आडे**/७३८५७४०४५५

## वाचक पत्रे

### महाशिवरात्री : शिवाच्या प्रत्येक नामतत्त्वाची उपासना

आजच्या धावपळीच्या, तणावपूर्ण आणि स्पर्धात्मक जीवनात मनःशांती, स्थैर्य आणि सकारात्मकतेची गरज प्रत्येकालाच भासते. अशा काळात भारतीय संस्कृतीत पूज्य मानलेले भगवान शिव हे केवळ देव नसून, ते जीवन कसे जगावे याचे मार्गदर्शन करणारे तत्त्व आहेत. संयम, त्याग, करुणा आणि अंतर्मुखता ही मूल्ये शिवतत्त्वातून सहज समजतात. म्हणूनच आधुनिक युगातही शिवउपासना अधिक अर्थपूर्ण ठरते. आपल्या हिंदू धर्मात शिवनवरात्र कृष्णपक्ष पंचमी ते माघ कृष्णपक्ष चतुर्दशीपर्यंत, म्हणजे ५ ते १५ फेब्रुवारी एकूण अकरा दिवस साजरे केले जाते. या काळात शिवाच्या विविध नावांमधील आध्यात्मिक अर्थ समजून घेऊन उपासना करण्यास विशेष महत्त्व आहे. 'शिव' हा शब्द 'वश्' या शब्दापासून वर्णव्यत्यास पद्धतीने तयार झाला आहे. 'वश्' म्हणजे प्रकाश. जो स्वतः प्रकाशस्वरूप आहे आणि संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतो, तो शिव होय. शिव म्हणजे मंगलमय आणि कल्याणकारक तत्त्व. शिव म्हणजे ब्रह्म आणि परमशिव म्हणजे परब्रह्म.

शिवाच्या नावांतून जीवनमार्गदर्शन : भगवान शिवाचे प्रत्येक नाव हे केवळ नाव नसून, ते जीवनासाठी एक संदेश देतात. शंकर हे नाव सर्वांचे कल्याण करण्याची भावना शिकवते. महाकालेश्वर काळाचे भान ठेवून जगण्याचा बोध देतो. महादेव परिपूर्ण पावित्र्य, ज्ञान आणि साधना यांचा समतोल साधण्याची प्रेरणा देतो. भालचंद्र संयम व अंतर्मुखतेचे प्रतीक आहे. गंगाधर संकटे शांतपणे पेलण्याची शिकवण देतो. करपूरगौर शुद्धता व सात्त्विकतेचे दर्शन घडवतो. पिंगलाक्ष त्रिकालदर्शी दृष्टिकोन दर्शवतो. अघोर भय व चिंता यांपासून मुक्त राहण्याचा संदेश देतो, तर नीलकंठ दुसऱ्याच्या दुःखासाठी त्याग करण्याची प्रेरणा देतो. आशुतोष भक्ती, नम्रता आणि श्रद्धेचे महत्त्व अधोरेखित करतो. शिवरात्रीच्या काळात शिवतत्त्व पृथ्वीतलावर हजार पटीने अधिक प्रमाणात कार्यरत असते, असे शास्त्रात सांगितले आहे. त्यामुळे या काळात ''ॐ नमः शिवाय'' हा नामजप केल्यास उपासकाला अधिक आध्यात्मिक लाभ होतो. शिवपूजेत बिल्वपत्र अर्पण करताना १०८ वेळा नामजप करून ती अर्पण करावीत. तसेच शिवाला पांढरी फुले अर्पण करावीत. शिवाच्या नावांमधील अर्थ समजून श्रद्धेने उपासना केल्यास मानसिक शांतता व स्थैर्य प्राप्त होते. तणाव, भीती व चिंता कमी होतात. करुणा, संयम आणि सकारात्मकता वाढते. जीवनाकडे पाहण्याचा कल्याणकारी दृष्टिकोन तयार होतो. या शिवनवरात्रात शिवतत्त्व आत्मसात करून उपासना केल्यास, आधुनिक जीवनातही संतुलन, समाधान आणि मनःशांती निश्चितच प्राप्त होते.

**रमा देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...


मातोश्री जनाबाई इंगळे


सुभद्राबाई गायकवाड


अनिता तांबके

## मातोश्री जनाबाई इंगळे स्मृती प्रित्यर्थ उद्यापासून श्रीराम कथा; ९ फेब्रुवारीला पुरस्कार सोहळा

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

ह भ प मातोश्री जनाबाई इंगळे यांच्या तृतीय पुण्यतिथी निमित्त ५ ते ८ फेब्रुवारी दु. २ ते ५ पर्यंत हभप सुधाकर इंगळे महाराज यांच्या अमृतवाणीने श्रीराम कथा आयोजित केली आहे. सध्या प्रत्येक व्यक्तीला आदर्श विचार आणि चरित्र श्रावणाची खूप गरज आहे म्हणून कथा करण्याचा मानस श्री संत मुक्ताई संस्कृतीक प्रतिष्ठानने केला आहे. तसेच ९ फेब्रुवारीला स. १० ते १२ गुलालचे कीर्तन ह भ प चैतन्य महाराज देहूकर पंढरपूर यांचे होणार असून तदनंतर ह भ प अनंत इंगळे महाराज यांच्या अध्यक्षते खाली आणि ह भ प चैतन्य महाराज देहूकर व ह भ प जोतिराम चांगभले यांच्या हस्ते मुक्ताई रत्न जीवन गौरव पुरस्कार सोहळा ही आयोजित केला आहे. आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ।। या न्यायाने वारकरी संप्रदायामध्ये ज्या महिलानी व महिला भजनी मंडळानी विशेष योगदान दिले आहे. वारी, सेवा, निष्ठा यांचा समन्वय हाच आदर्श मानून जीवन जगणाऱ्या एका महिलेला व एका महिला भजनी मंडळाला सन्मानित केले जाणार आहे. ह भ प सुभद्राबाई ज्ञानदेव गायकवाड (कोयना नगर) व रुक्मिणी महिला भजनी मंडळ मित्रनगर, शेळगी (अध्यक्ष अनिता तांबके) यांना दिला जाणार आहे. वारकरी संप्रदायातील प्रमुख कीर्तनकार महाराज, गायक, वादक यांचा ही सन्मान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम श्री संत मुक्ताई मंदिर राजेश कोठे नगर, लक्ष्मी पेठ येथे केला जाणार, असे अशी माहिती संस्था अध्यक्ष शंकर भोसले यांनी दिली.

## तक्रार प्रलंबित ठेवल्याप्रकरणी महापालिकेतील २९ अधिकारी-कर्मचाऱ्यांना दंड

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अखेर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. २९ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंड ठोठावला असून ३ हजार ३०० रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश उपायुक्त लोकरे यांनी दिले आहेत. महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभाग, नगर रचना विभाग, कर आकारणी विभाग तसेच इतर संबंधित विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी व्यवसाय परवाने, नवीन परवाने, हरकती, दाखले, प्रत, प्रॉपर्टी टॅक्स उतारे आदी सेवा विहित कालावधीत न दिल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार विविध विभागातील कर्मचाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. प्रलंबित अर्जाची संख्या ४६ आहे. या कर्मचाऱ्यांना एकूण ३ हजार ३०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. हा दंड वेतनातून वसूल केला जाणार आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून कामकाजातील निष्काळजीपणामुळे लोकसेवेवर परिणाम होत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्यास कारवाई अटळ असल्याचा कडक इशारा श्री. लोकरे यांनी दिला आहे.

# सोलापूर जनता बँकेकडून १६ कोटींच्या गृहकर्जाला मंजूरी

### क्रेडाई प्रॉपर्टी एक्सपोमध्ये जागेवरच कर्जमंजुरी पत्र प्रदान

### मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविणसिंह परदेशी यांची भेट



> प्लॉट खरेदी आणि गृह कर्जासाठी जनता बँकेच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा सोलापूरकरांनी आकर्षक व्याजदराच्या प्लॉट खरेदी, गृह कर्जासाठी आणि तत्पर सेवेसाठी सोलापूर जनता बँकेच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा.
> **- सुनील पेंडसे, अध्यक्ष, सोलापूर जनता सहकारी बँक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

सोलापूर जनता सहकारी बँकेकडून तब्बल १५ कोटी ७५ लाख रुपयांच्या गृहकर्जांना प्राथमिक मंजुरी देण्यात आली. नुकत्याच झालेल्या क्रेडाई एक्सपोमध्ये मुख्य प्रयोजक असलेल्या सोलापूर जनता सहकारी बँकेने ग्राहकांना जागेवरच गृहकर्जाचे प्राथमिक मंजुरी असलेले कर्जमंजुरी पत्र प्रदान केले.

क्रेडाई एक्सपोमध्ये सोलापूर जनता सहकारी बँकेच्या स्टॉलला हजारो सोलापूरकरांनी भेट दिली. यात गृहबांधणी, प्लॉट खरेदी, सदनिका खरेदी बंगला खरेदी यांकरिता सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या आकर्षक आणि ग्राहकाभिमुख योजनांची माहिती सोलापूर शहर आणि जिल्ह्यातून आलेल्या नागरिकांनी घेतली. क्रेडाई एक्सपोला भेट देण्यासाठी आवाहन करणारा संदेश सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे बँकेच्या सर्व ग्राहकांना पाठवण्यात आला होता. त्यानुसार हजारो ग्राहकांनी क्रेडाईला भेट दिली. यावेळी गृह कर्जासाठी इच्छुक ग्राहकांना जागेवरच कर्ज मंजुरी पत्र देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविणसिंह परदेशी, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उपायुक्त आशिष लोकरे, सुधीर थोबडे, नगरसेवक सात्विक बडवे आदींनी सोलापूर जनता सहकारी बँकेच्या स्टॉलला भेट दिली.

प्रविणसिंह परदेशी म्हणाले, सोलापूर जनता सहकारी बँकेने राष्ट्रीय बँकांप्रमाणे कर्ज वितरण केले आहे. गृह कर्जासाठी आकर्षक योजना राबवत सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सोलापूर जनता सहकारी बँकेकडून होणारे प्रयत्न कौतुकास्पद आहेत, असेही श्री. परदेशी याप्रसंगी म्हणाले. यावेळी सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सरव्यवस्थापकप्रदीपबुट्टे, उपसरव्यवस्थापक मकरंद जोशी, उपसरव्यवस्थापिका अंजली कुलकर्णी, सहाय्यक सरव्यवस्थापक रमेश मामड्याल, रामदास सिद्धूल, तुळशीदास गज्जम, मुख्य कार्यालयातील अधिकारी मदन मोरे, अमोल रामनवर उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखा व्यवस्थापक विलास दीक्षित, मल्लिनाथ खूने, मंजिरी फडके, जयप्रकाश नादरगी, माधुरी कुलकर्णी, शैलेजा देशपांडे तसेच बँकेच्या सर्व शाखांचे व्यवस्थापक, कर्ज विभाग व प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट विभाग तसेच संगमेश्वर महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे सहकार्य लाभले.

# मजरेवाडी, सैफुल भागात अतिक्रमण विरोधात कारवाई

### म्हेत्रे टॉवर जवळील अतिक्रमित वॉल कंपाऊंड पाडले

### विजापूर रोडवरील भाजी विक्रेत्यास हटविले



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज मजरेवाडी विजापूर रोड सैफुल आणि विडी घरकुल परिसरात अतिक्रमण विरोधात कारवाई करण्यात आली. मजरेवाडी येथील म्हेत्रे टॉवर जवळील रस्त्याला अडथळा ठरणारे वॉल कंपाऊंड जमीनदोस्त करण्यात आले. विजापूर रोड आणि विडी घरकुल परिसरातील भाजी विक्रेत्यांना हटविण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपअभियंता तपन डंके यांच्या नियंत्रणाखाली अतिक्रमण विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज सकाळी आणि संध्याकाळी या दोन सत्रात विविध ठिकाणी कारवाई करण्यात आली. मजरेवाडी येथील म्हेत्रे टॉवर जवळील रस्त्याला अडथळा ठरणारी अतिक्रमण करून बांधण्यात आलेले वॉल कंपाऊंड जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त करण्यात आले. महापालिका नगर रचना विभाग आणि अतिक्रमण विरोधी पथक यांनी संयुक्तरित्या ही कारवाई केली. यामुळे येथील रस्त्यावरील अडथळा दूर झाला.

त्यानंतर विजापूर रोड सैफुल या भागामध्ये रस्त्याच्या कडेला, फुटपाथ वर बसलेल्या भाजी विक्रेत्यांना हटविण्यात आले. त्याचबरोबर विडी घरकुल परिसरातही रस्त्याच्या कडेला बसलेल्या भाजी विक्रेत्यांनाही हटविण्यात आले. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. भाजी विक्रेत्यांनी कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर आपला व्यवसाय करू नये. रस्त्याला अडथळा आल्याचे दिसून आल्यास तातडीने कारवाई करण्यात येणार आहे. रस्त्याला अडथळा निर्माण होईल आणि सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्यास जप्ती आणि इतर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिला आहे.

# सीम कार्डचा गैरवापर करून राजकीय व्यक्तींची बदनामी करणारा अटकेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

विश्वासाने घेतलेल्या सीम कार्डचा गैरवापर करून ''बेधडक अक्कलकोट'' नावाने इन्स्टाग्राम खाते सुरू करून अक्कलकोट तालुक्यातील राजकीय व्यक्तींची बदनामी करणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली. ३ फेब्रुवारी रोजी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे फिर्यादी आप्पा सदाषिव झिपरे (वय ४८, रा. २६१, कल्याण नगर मजरेवाडी) यांनी फिर्याद दिली की, त्यांच्या ओळखीचा अमर (रा. बाळीवेस) याने त्यांचेकडून त्याचे सिमकार्ड हरवले आहे असे सांगून त्याच्या नावे सिमकार्ड घेतले होते. याचा परस्पर गैरवापर करून अमरने इन्स्टाग्राम या सोशल मिडीयावर ''बेधडक अक्कलकोट'' नावाने खाते तयार केले आहे. अमर याने अक्कलकोट तालुक्यातील राजकीय लोकांची बदनामी होण्याच्या उद्देषाने व्हीडीओ व पोस्ट अपलोड करत आहे. अमरने ह कार्ड स्वतःसाठी वापरणे अपेक्षीत असताना त्याने फिर्यादीस न सांगता खोटे बोलून दिषाभूल करून सीम कार्डचा गैरवापर करून फसवणूक केली आहे. त्यावरून अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना मुख्य आरोपी अमर रमेष पाटील (रा. सेंट जोसेफ शाळेच्या मागे, रेल्वे लाईन्स) याचे सांगणेवरून आरोपी अमरनाथ उमेष भोगडे (रा. गवंडी गल्ली, उत्तर कसबा, बाळीवेस) याने फिर्यादी यांचे नावाने सिमकार्ड घेतले. त्यानंतर मुख्य आरोपी अमर रमेश पाटील, अमरनाथ उमेष भोगडे व महेष चंद्रकात चौगुले (रा. धोत्री) यांनी संगनमत करून महेष चौगुले याच्या मोबाईल हॅण्डसेटमध्ये फिर्यादी विष्वसाने दिलेले सीमकार्डचा गैरवापर करून इन्स्टाग्राम या सोषल मिडीयावर ''बेधडक अक्कलकोट''या नावाने खाते निर्माण केले. त्यावर राजकीय लोकांची बदनामी होण्यासाठी व्हीडीओ व पोस्ट अपलोड करून फसवणूक केले असल्याचे तांत्रीक पुराव्यावरून निष्पन्न झाले. यावरून सदर गुन्ह्यात माहिती तंत्रज्ञान कायदा हे वाढीव कलम लावण्यात आले असून आरोपी अमरनाथ उमेष भोगडे (रा. गवंडी गल्ली, उत्तर कसबा, बाळीवेस) यास ३ फेब्रुवारी रोजी अटक करून २ दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे. आरोपी महेष चंद्रकांत चौगुले (रा. धोत्री) यास अटक केली आहे. मुख्य आरोपी अमर रमेष पाटील (रा. सेंट जोसेफ शाळेच्या मागे, रेल्वे लाईन्स सोलापूर) याचा शोध सुरू आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास दिपक भिताडे, पोलीस निरीक्षक, अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे हे करत आहेत.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**बदलण्याची कामे**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, सामान्य, मध्य रेल्वे, सोलापूर, यांच्या वतीने आणि भारताच्या राष्ट्रपतींच्या नावाने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करतात. निविदा क्रमांक: SUR/L/T/2025/32, कामाचे नाव: सोलापूर विभागातील विविध स्थानकांवर स्टेशनवरील सीओपी/एफओबी खालील रिअल इन्सुलेटरवर टाकलेल्या केबल्सच्या जागी बस बार ट्रंकिंग प्रणाली बसवणे. अंदाजित किंमत: 1,95,61,423.35. बयाणा रक्कम : 2,47,800.00, कामाचा कालावधी: 24 महिने. प्रस्तावाची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 20/02/2026 रोजी 15.00 वाजता. बोली सुरक्षेची रक्कम www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावी लागेल. EXP-04

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLARE THAT MY OLD NAME IS **KEDAR GRAMOPADYA** HAS BEEN CHANGED TO **KEDAR BALAVANTARAV GRAMOPADHYE**

Resi. - Gramopadhye Wada Tilak Galli, Akkalkot, Tal. Akkalkot Dist. Solapur - 413216

**KINDLY NOTE**

**Karmayogi Sudhakarpant Paricharak andurang Sahakari Sakhar Karkhana Ltd., Shreepur**

Shreepur, Tal- Malshiras Dist - Solapur. Pin Code - 413112
Phone-02185-255233, 255344. Email ID-spssk sugar@yahoo.com

**DECLARATION OF PURCHASE NOTICE**

We are inviting Quotations / Offers for Purchasing Consumable Materials & Services against our Enquiries for crushing season 2026-2027. The purchase notice is displayed on our official web site - http://www.pandurangsugar.com

**Dr. Yashwant Kulkarni** Managing Director | **K.S.Khule** Vice Chairman | **Prashantrao Paricharak** Hon. Charirman

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi's.**
**COLLEGE OF NURSING, BARSHI**
Jagdale Mama Hospital Campus, Shivaji Nagar, Barshi, Dist-Solapur-413411, Phone-02184-295091, Mob: 9685950007
Email: conbarshi@rediffmail.com
Website: https://ssspmnursing.in/
(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)

**WALK IN INTERVIEW**

| Sr | Name of the Posts | Subject | Total Post |
|---|---|---|---|
| 1 | Vice Principal cum Professor | Any one in Nursing Speciality | 1 |
| 2 | Professor | Any one in Nursing Speciality | 1 |
| 3 | Associate Professor/Reader | Medical Surgical Nursing/ Nursing Foundation | 1 |
| 4 | Assistant Professor/Lecturer | Pediatric Nursing | 1 |
| 5 | Tutor/ Clinical Instructor | Nursing | 3 |

Qualified and experienced candidates for the above mentioned posts should attend the interview with all original certificates and complete bio-data with 2 passport size photographs on 20 February 2026 at 10.30 am at the institute.

Eligibility criteria are as per MUHS Nashik.

**Principal** | **General Secretary**

**ब्राह्मण समाज सेवा संघ**
**डफरीन चौक, सोलापूर**

**१०५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**

ब्राह्मण समाज सेवा संघाच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२५-२०२६ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २२/०२/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात डफरीन चौक, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती. दि. ०५/०२/२०२६

**सचिव**
**श्री. वामन श्रीराम कुलकर्णी**
ब्राह्मण समाज सेवा संघ

**हरवले आहे**

मी **नवनाथ मानसिंग चव्हाण**, वय ३९, व्यवसाय - शेती, राहणार - बसवेश्वर नगर, देगाव रोड सोलापूर.

माझे नाव असलेली जमिनीची कागदपत्रे ३१/०१/२०२६ रोजी बसवेश्वर नगर येथून सत्यप्रत गहाळ झाली आहेत. (इंडेक्स क्रमांक १९६४/२०१८) हिरज येथील ओरिजनल खरेदी दस्त (गट क्रमांक २४१/२/अ) खरी प्रत गहाळ झाली आहे कोणाला सापडल्यास कृपया कळवावे.

**संपर्क :- नवनाथ चव्हाण - ७०२०४७६१००**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

नियमित दिवाणी दावा क्र. २४२/२०२२
निशाणी नं. ९४

**सोलापूर येथील मे. सिव्हिल जज्ज सो यांचे कोर्टात**

**श्री. मुतण्णा धामण्णा चाबुकस्वार, व इतर १** - वादी
विरुध्द
**शिवशंकर धामण्णा चाबुकस्वार व इतर** - प्र. वादी
**प्र.वादी क्र. १४. संजय अप्पासाहेब काळजे,**
वय ५९ वर्षे, धंदा - शेती,
रा. ९९, सिध्देश्वर पेठ, सोलापूर

ज्याअर्थी वर नमूद वादी यांनी प्र.वादी यांचे विरूध्द दावा मिळकतीचे निरंतर ताकिद व सरस-निरस मानाने वाटप होऊन मिळण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. व तो प्रलंबित आहे. प्रस्तुत दाव्याकामी आपण प्र.वादी क्र. १४ यांच्या वर नमूद पत्त्यावर नोटीस / समन्सची बजावणीकामी पाठविले असता, ते न बजावता प्राप्त झालेले आहे. तरी यातील आपण प्र.वादी क्र. १४ हा मे. न्यायालयाच्या स्थळसिमेतच राहण्यास आहे.

तरी आपणास प्र.वादी १४ यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर दाव्याकामी आपले कैफियत / म्हणणे असल्यास आपण स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे अथवा मे. न्यायालयाने नेमलेली दि. २४/०२/२०२६ रोजी हजर रहावे. तसे न झाल्यास आपण प्र.वादी क्र. १४ विरूध्द एकतर्फी आदेश / निकाल देण्यात येईल याचे आपण प्र.वादी क्र. १४ यांनी नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली तारीख ता. ०४/०२/२०२६

सही/- लिपीक | कोर्टाचा शिक्का | हुकूमावरून सही/- सह. अधिक्षक मे. सिव्हिल जज्ज सि.डि. सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**

सिव्हील एम. ए. नं. १८/२०२५
नि.५

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. यांचे कोर्टात**
**(एन.ए.एल. शेख साहेब)**

१) **श्रीमती लक्ष्मीबाई दगडू मोरे (मयत)** रा. मु.पो. कुरनूर, ता. अक्कलकोट
२) **श्री. नागनाथ दगडू मोरे** रा. मु.पो. कुरनूर, ता. अक्कलकोट
३) **सौ. राधा विश्वास जाधव** रा. हसापूर रोड, अक्कलकोट
४) **श्री. यादव दगडू मोरे** रा. मु.पो. कुरनूर, ता. अक्कलकोट
५) **श्री. बाबासाहेब दगडू मोरे** रा. मु.पो. कुरनूर, ता. अक्कलकोट
— **अर्जदार**

विरुध्द
**कोणीही नाही** - **सामनेवाले**

ज्याअर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. १८/२०२५ हा दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे दाखल केला असून अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे पिता कै. दगडू यादव मोरे हे दि. ३०/०८/२०२४ रोजी कुरनूर येथे मयत झाले आहे. दगडू यादव मोरे यांचे सरकारमान्य सीलबंद बाटलीतून बिअर विक्रीचा कुरनूर, ता. अक्कलकोट येथे संजीवनी बिअर शॉपी या नावाने व्यवसाय होता. सदर फर्मचे नांवे अनुज्ञप्ती क्र. FL-Beer-II 356/2016-17 हा परवाना होता. सदर परवाना त्यांचे पश्चात त्यांचे वारस म्हणून अर्जदारांना मिळणेकरीता अर्जदाराने वारसा प्रमाणपत्र मिळावे याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत कै. दगडू यादव मोरे यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि. ०४/०३/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हे जाहीर प्रसिध्दीकरण केले ता. ०३/०२/२०२६ आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले.

कोर्टाचा शिक्का | सही/- सहाय्यक अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट

**जाहीर सूचना**

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकत श्री रामलिंग महालिंग म्हेत्रे आणि सौ. श्रीदेवी रामलिंग म्हेत्रे, यांचे मालकीची असून, त्यांनी ती मिळकत तारण (Mortgage) ठेवण्याचा प्रस्ताव जन स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा सोलापूर यांचेकडे दिला असून, आमचे अशील बँकेने सदर कर्ज मंजूर करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

सदर मिळकत निर्बंधरहित, निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी मिळकतीच्या सद्य मालकांनी दिलेला आहे. तरी, सदर मिळकतीवर, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, हक्क, हिस्सा, हितसंबंध, वाद, अगर कर्ज प्रकरणास हरकत किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी ही जाहीर सूचना प्रसिद्ध जलेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत, खालील नमूद पत्यावर कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

जिल्हा सोलापूर, तालुका - उत्तर सोलापूर, पैकी मौजे कसबे सोलापूर, येथील नवीन सर्व्हे क्र.१६८/२/२, जून सर्व्हे क्र. १७७/२/२, मधील निलकंठेश्वर नगर, मधील प्लॉट क्र. ५, यासी क्षेत्र ५५७.६२ चौ. मी., ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिद्ध केली दि. ०४/०२/२०२६

**सही/-**
**ॲड. गणेश वसंत कटारे**
**बी.कॉम. एल.एल.बी.(स्पे.)**
**ॲड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)**
**बी.ए. एल.एल.बी.**
**कार्यालय क्र. ११, पहिला मजला,**
**स्क्वेअर-वन कॉम्प्लेक्स, १३१,**
**सिध्देश्वर पेठ, सोलापूर-०३**
**मोबाइल क्र. ९८६०११००११**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** : डि ।। व सब डि ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना स.नं. ७४१, नवीन स.नं. ५/१/२/३/ब१/१ यापैकी कस्तुरबाग नगर या वसाहतीमधील प्लॉट नं. ६७ याचे क्षेत्र ११८.२५ चौ.मी. इतके असून ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ०.०१.१८ हे.आर.चौ.मी. इतके आहे. यांसी

चतुःसिमा :- पूर्वेस - प्लॉट नं.६६, पश्चिमेस - १० फुटी रस्ता, दक्षिणेस :- प्लॉट नं.६८, उत्तरेस - २० फुटी रस्ता असे आहे.

वर नमुद मिळकतीबाबतचे खरेदीखत दस्त क्र. ७६९/१९९८, दि. २०-०३-१९९८ व दस्त क्र. ४६३७/२०१९ दि.३१/०८/२०१९ हे दोन्ही मुळ खरेदीखत अनावधानाने गहाळ झाले आहे. त्यामुळे आमचे अशिल स्वाती दिपक नारायणकर यांनी सदर बझार पोलीस स्टेशन, सोलापूर शहर या पोलीस स्टेशनमध्ये रितसर तक्रार दिली असून त्याचे गहाळ ऑनलाईन रजिस्ट्रेशन गहाळ र.नं. ६२/२०२६ दि.०३-०२-२०२६ रोजी नोंदणी केलेला आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहू मिळकत आयसीआयसीआय होम फायनान्स लि., शाखा सोलापूरकडे गहाण तारण ठेवून कर्ज घेणार आहेत. तरी सदरहु मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिन, बक्षीस, बोजा, पोटगी, कब्जा वगैरे असल्यास त्यांनी ७ दिवसांच्या आत खाली नमुद आमच्या पत्यावर त्यांचे हक्काचे पृष्ठ्यर्थ कागदपत्रे आणून द्यावीत. जर कोणी मुदतीत हरकत घेतली नाही तर सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आयसीआयसीआय होम फायनान्स लि., शाखा सोलापूर या बँकेकडून सदरहू मिळकतीच्या गहाण तारण कर्ज अदा करतील, तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता.०४/०२/२०२६.

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. सलाम मोहम्मदसाब बगलुर**
**बी.ए., एलएल.बी, एम.एस.डब्ल्यु., डी.एम.सी.जे. ॲडव्होकेट**
**ऑफीस पत्ता. गाळा नं. १०, पहिला मजला,**
**दारुस्सलाम अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर**
**मो. ९८६००९४५९८**

**खरेचीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः जिल्हा सोलापूर व शहर बार्शी नगरपरिषद हद्दीतील व आसपासचे तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी नगरपरिषद हद्दीतील बिनशेती खुला प्लॉट याचे वर्णन - **अ)** गट नं. ६३४/२ यापैकी बिनशेती प्लॉट नं. ४ याचे क्षेत्र २.५०.५२ चौ.मी. याचा बिनशेती आकार ३७८.०० रू. आहे. यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - गट नं. ६३४ पैकी गटातील उर्वरीत क्षेत्र, दक्षिणेस - प्लॉट नं. ५, पश्चिमेस - रस्ता व उत्तरेस - प्लॉट नं. ३ आहे.

**ब)** गट नं. ६३४/२ यापैकी बिनशेती प्लॉट नं. ५ याचे क्षेत्र २.५५.५५ चौ.मी. याचा बिनशेती आकार ३८५.०० रू. आहे. यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - गट नं. ६३४ पैकी गटातील उर्वरीत क्षेत्र, दक्षिणेस - ओपन स्पेस. पश्चिमेस - रस्ता व उत्तरेस - प्लॉट नं. ४ आहे. येणेप्रमाणे बिनशेती एन.ए. प्लॉट मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांचे हुकूमाने / बिनशेत्ती झालेली आहे व आज रोजी सौ. वर्षा प्रफुल्ल पवार यांचे नावे ७/१२ उताऱ्यास नाव मालकी हक्की दाखल आहे व प्रत्यक्ष कब्जेवहिटीस असलेला खुला प्लॉट हा वर्षा प्रफुल्ल पवार हे नमुद प्लॉटचा शांततामय मार्गाने वापर, उपभोग घेत आहेत.

वर वर्णन केलेली जागा सौ. वर्षा प्रफुल्ल पवार यांनी त्यांचे प्रापंचीक, आर्थिक अडचणीचे निवारण करणेकरीता म्हणून विक्रीस काढली व नमुद जागा आमचे अशिलाने बाजारभावाने विकत घेण्याचे ठरवून उभयंतांचा व्यवहार झाला. सदर व्यवहाराचे इसारापोटी आमचे अशिलाने इसारा दाखल रक्कम सौ. वर्षा प्रफुल्ल पवार यांना देऊन इसाराचा करार केलेला आहे. सौ. वर्षा प्रफुल्ल पवार यांनी आमचे अशिलास नमूद मिळकत निर्वेध व निजोखीम, बिनबोजाची असल्याची ग्वाही व खात्री दिली.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकतीबाबत कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा, मृत्यूपत्र, दानपत्र, बँक बोजा, खासगी सावकारी कर्ज, नोंदणीकृत अथवा अ-नोंदणीकृत दस्त इ. प्रकारचे कसल्याही प्रकारे कायदेशीर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसाचे आत संबंधितांनी खालील पत्त्यावर स्वतः अथवा विधिज्ञामार्फत लेखी पुराव्यासह हरकती द्यावेत. वेळेत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल वरील मिळकतीबद्दलचा खरेदी खताचा दस्त लिहून नोंदवून घेतील व खरेदी व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. ०४/०२/२०२६

**सही/-**
**ॲड. एस.आय. भोरी**
**बी.कॉम. एलएल.बी.**
**रा. मनगिरे मळा, मंगळवार पेठ,**
**बार्शी, मो. नं. ९४२१०२७३९२**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### देविकाने सिंधूला दिले यशाचे श्रेय



**नवी दिल्ली :** थायलंड मास्टर्स सुपर ३०० स्पर्धेची नवविजेती देविका सिहागने आपल्या या महत्त्वपूर्ण विजयाचे श्रेय दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधूसोबत केलेल्या महिन्यांच्या प्रशिक्षणाला आणि प्रसिद्ध प्रशिक्षक इरवानस्याह आदी प्रतामा यांच्या मार्गदर्शनाला दिले आहे. हरयाणाची २० वर्षीय खेळाडू सायना नेहवाल व सिंधूनंतर सुपर ३०० महिला एकेरीचे विजेतेपद जिंकणारी तिसरी भारतीय महिला बॅडमिंटनपटू ठरली आहे. सिंधू दीदीला जवळून पाहणे व तिच्यासोबत सराव करणे माझ्यासाठी खूप उपयुक्त ठरले. ती खूप शिस्तबद्ध व मेहनती आहे, आणि त्यामुळे मलाही अधिक चांगले करण्याची प्रेरणा मिळाली. मी गत काही महिन्यांपासून तिच्यासोबत सराव करत आहे, असे देविकाने सांगितले. तिने इंडोनेशियन प्रशिक्षक इरवानस्याह यांच्या भूमिकेचीही दखल घेतली. त्यांनी यापूर्वी जोनाथन क्रिस्टी आणि अँथनी सिनिसुका गिंटिंगसारख्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंना मार्गदर्शन केले आहे. ते खूप अनुभवी प्रशिक्षक आहेत. ते मोठ्या स्पर्धांमधील त्यांचे अनुभव सांगतात आणि खेळात मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या काय बदल करणे आवश्यक आहे हे सांगतात. प्रत्येक सत्रानंतर ते या गोष्टींबद्दल बोलतात आणि मी त्या लक्षात ठेवण्याची खात्री करते, असे ती म्हणाली. मी लहानपणापासून चीन-तैपेईची ताई त्झू यिंग व सिंधू यांच्या खेळाची चाहती आहे आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेत आहे, असे देविकाने सांगितले.

# भारतीय युवा अंतिम फेरीत

### आयसीसी १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट

### अफगाणिस्तानवर ७ गड्यांनी विजय

### सामनावीर ॲरोन जॉर्जचे शानदार शतक

◆ **हरारे, ४ फेब्रुवारी**

सलामीवीर ॲरोन जॉर्जचे शानदार शतक, वैभव सूर्यवंशी व कर्णधार आयुष म्हात्रेच्या दमदार अर्धशतकी खेळीच्या बळावर भारतीय युवा संघाने आयसीसी १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील दुसऱ्या उपांत्य सामन्यात बांगलादेशचा ५३ चेंडू शिल्लक ठेवीत ७ गड्यांनी धुव्वा उडविला. या विजयाबरोबरच भारताने स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. बांगलादेशच्या फैसल शिनोझादा व उझेरूल्लाह नियाझाईची शतकी खेळी व्यर्थ ठरली.

आता भारताला विश्वचषकासाठी शुक्रवारी इंग्लंडविरुद्ध निर्णायक झुंज द्यावी लागणार आहे. थॉमस रेवच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाने मंगळवारी ऑस्ट्रेलिया संघावर २७ धावांनी विजय नोंदवून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. इंग्लंडला विजय मिळवून देण्यात ११० धावांची शतकी खेळी करणाऱ्या थॉमस रेवने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

अफगाणिस्तान संघाचा कर्णधार महबूब खानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित पहिल्या फळीतील फलंदाजांनी दमदार फलंदाजी केली आणि अफगाणिस्तानला ५० षटकांत ४ बाद ३१० धावा उभारून दिल्या. संघाच्या या धावांच्या डोंगरात फैसल शिनोझादा (११०) व उझेरूल्लाह नियाझाईने (१०१) शतकी योगदान दिले. प्रत्युत्तरात भारताने विजयासाठी आवश्यक असलेल्या ३११ धावा ४१.१ षटकांत ३ गडी गमावित काढल्या.




ॲरोन जॉर्ज

अफगाणिस्तानच्या डावाची सुरुवात करताना ओस्मान सादत (३९) व खालिद अहमदझाई (३१) यांनी ५३ धावांची सलामी भागीदारी केली. त्यानंतर ओस्मानने फैसलसोबत दुसऱ्या गड्यासाठी ६४ धावांची भागीदारी केली. फैसल व उझेरूल्लाह या जोडीने स्वैर फलंदाजी करत तिसऱ्या गड्यासाठी १४८ धावांची भागीदारी करून अफगाणिस्तानला २६५ धावांचा टप्पा गाठून दिला. दीपेशने रोखण्यापूर्वी फैसल शिनोझादाने ९३ चेंडूंत १५ चौकारांसह ११० धावांची खेळी केली. पुढे उझेरूल्लाहने अझिझुल्लाह मियाखिलल(१२) व अब्दुल अझीझच्या (नाबाद ७) साथीने अफगाणिस्तानला ५० षटकांत ४ बाद ३१० धावा उभारून दिल्या. उझेरूल्लाहने ८६ चेंडूंत १२ चौकार व २ षट्कारांसह नाबाद १०१ धावांची खेळी केली.

विजयासाठी ३११ धावांचा पाठलाग करताना भारताकडून ॲरोन जॉर्ज व वैभव सूर्यवंशीने ९० धावांची सलामी भागीदारी केली. नूरस्तानी ओमरझाईच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी वैभव सूर्यवंशीने ३३ चेंडूंत ९ चौकार व ४ षट्कारांसह ६८ धावांचे योगदान देऊन चांगली सुरुवात केली. पुढे ॲरोन जॉर्जने कर्णधार आयुष म्हात्रेसोबत दुसऱ्या गड्यासाठी ११४ धावांची भागीदारी करून भारताच्या विजयाचा पाया मजबूत केला.आयुषने ५९ चेंडूंत ५ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ६२ धावांची खेळी केली. वहिदील्लुसह झादरानच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी ॲरोन जॉर्जनने १०४ चेंडूंत १५ चौकार व २ षट्कारांसह ११५ धावांची खेळी करून भारताला विजयाच्या समीप आणले. त्यावेळी भारताला केवळ ११ धावांची गरज होती. विहान मल्होत्रा व वेदांत त्रिवेदीने नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताने ४१.१ षटकांत ३ ब ाद ३११ धावा केल्या. विहानने ४७ चेंडूंत नाबाद ३८ धावा, तर वेदांत त्रिवेदीने नाबाद ५ धावा केल्या.

◀(वृत्तसंस्था)

## भारतीय महिलांचा म्यानमारवर ५-० ने विजय

### आशिया सांघिक बॅडमिंटन | विजेतेपदाच्या बचावाची शानदार सुरुवात

◆ **किंगदाओ, ४ फेब्रुवारी**

गतविजेत्या भारतीय महिला संघाने आशिया सांघिक बॅडमिंटन स्पर्धेत आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात केली. भारतीय संघाने बुधवारी येथे झालेल्या गट वाय मधील पहिल्या सामन्यात म्यानमारचा ५-० असा धुव्वा उडवला.




प्रतिस्पर्धी विरुद्ध खेळताना तन्वी शर्मा

कोर्टवर प्रथम उतरलेल्या तन्वी शर्माने थेत हतार थुझारचा २१-१३, २१-१६ असा पराभव करण्यासाठी केवळ ३२ मिनिटे घेतली. त्यानंतर दुसऱ्या एकेरीच्या सामन्यात रक्षिता श्री संतोष रामराजने ईंट चिट फूचा २१-१२, २१-६ असा पराभव करून भारताला २-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर मालविका बनसोडने तिसऱ्या एकेरीच्या सामन्यात लिन लिन हेटचा २१-१९, २१-१२ असा पराभव करून भारतासाठी सामना निश्चित केला. भारतीय खेळाडूंनी दुहेरीच्या सामन्यांमध्येही आपले वर्चस्व कायम राखले आणि दोन्ही सामने सरळ गेममध्ये जिंकले.

प्रिया कोंजेंगबाम आणि श्रुती मिश्रा यांच्या जोडीने सु लॅट आणि थेत हतार थुझार यांचा २१-१५, २१-१६ असा पराभव केला, तर त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंदने हेट आणि फू यांच्या जोडीचा २१-८, २१-६ असा सहज पराभव केला. भारत आपला दुसरा गट सामना गुरुवारी गत वर्षीच्या उपविजेत्या थायलंड संघाविरुद्ध खेळणार आहे.

◀(वृत्तसंस्था)



### कराटे स्पर्धेतील कामगिरीवर स्नेहा हिप्परगीचा सत्कार

**सोलापूर :** पेड्डेम इनडोअर स्टेडियम मापुसा गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या १०व्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत विडी घरकूल सी ग्रुप मध्ये राहणारी स्नेहा सिध्दाराम हिप्परगी हिने एक रौप्य व एक कांस्य पदक पटकाविले. तिने फाईट प्रकारात रौप्य व काता प्रकारात कांस्य संपादिले. तिचा विजय इप्पाकायल मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संजय वाघमारे, रमेश सुंचू, राजू पानघंटी, पांडुरंग बोल्लु, विजयकुमार कोंडा व सिध्दाराम हिप्परगी परिवार उपस्थित होते.



# कुरुक्षेत्रात महाराष्ट्राचा सुवर्णइतिहास!

- **किशोरींचे सलग आठवे विजेतेपद, किशोरांना कांस्यवर समाधान**
- **३५ वी किशोर, किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**कुरुक्षेत्र (हरियाणा), दि. ४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्राच्या किशोरी संघाने ३५ व्या किशोर व किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत विजेतेपद पटकावत सलग आठव्या अजिंक्यपदाची ऐतिहासिक नोंद केली. या स्पर्धेत इला पुरस्कार महाराष्ट्रच्या अपर्णा वर्दे ने, तर भरत पुरस्कार ओडिसाच्या सत्या राजन बेहरने पटकावला. नऊ वेळा अजिंक्यपद जिंकणाऱ्या महाराष्ट्राच्या किशोर संघाला यंदा मात्र तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

**किशोरीत राजस्थानवर एकतर्फी विजय**

हरियाणातील थीम पार्क मैदानावर झालेल्या किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने राजस्थानवर एक डाव व १२ गुणांनी (२७१५) दणदणीत विजय मिळवला. पहिल्याच आक्रमणात महाराष्ट्राने १७ गुणांची (२४७) निर्णायक आघाडी घेतल्याने सामना पूर्णपणे एकतर्फी ठरला. महाराष्ट्राकडून राही पाटील (२.१० मि. संरक्षण व २ गुण), वेदिका तामखेडे (२.२० मि. संरक्षण व २ गुण), अपर्णा वर्दे (२.३५ मि. संरक्षण व २ गुण), ऋतुजा सुरवसे (१.५० मि. संरक्षण), पियुशा परमाळकर (१.४५ मि. संरक्षण) यांनी भक्कम कामगिरी करत विजेतेपदावर शिक्का मोर्तब केले. राजस्थानकडून तुलसी (१.४० मि. संरक्षण), गुंजन (१.२० मि. संरक्षण व ४ गुण), राधिका (४ गुण) यांनी प्रतिकार केला; मात्र महाराष्ट्राच्या वेगवान खेळापुढे तो अपुरा ठरला.

**किशोर गटात ओडिसाची कोल्हापूरवर निर्णायक बाजी**

किशोर गटाच्या अंतिम सामन्यात ओडिसाने कोल्हापूरचा एक डाव ७ गुणांनी (३१२४) पराभव करत अजिंक्यपद पटकावले. ओडिसाकडून सत्यरंजन (२, १ मि. संरक्षण व ८ गुण), चिन्मय अम्रिता (१.१०, १.२० मि. संरक्षण व ४ गुण), अमरज्योती (१.१०, १ मि. संरक्षण व २ गुण) यांनी उत्कृष्ट अष्टपैलू खेळ साकारला. कोल्हापूरकडून देवराज येड्राव (६ गुण), गौरव माने (८ गुण) यांनी झुंज दिली; मात्र विजय ओडिसाच्याच पारड्यात गेला.

**महाराष्ट्राच्या अपर्णा वर्देला देशातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा इला पुरस्कार**

**वैयक्तिक विजेतेपदाचे मानकरी :**
**किशोरी गट :** उत्कृष्ट संरक्षक : राही पाटील (महाराष्ट्र), उत्कृष्ट आक्रमक : गुंजन (राजस्थान), इला पुरस्कार व अष्टपैलू खेळाडू : अपर्णा वर्दे (महाराष्ट्र)

**किशोर गट :** उत्कृष्ट संरक्षक : वरद पोळ (महाराष्ट्र), उत्कृष्ट आक्रमक : गौरव माने (कोल्हापूर), भरत पुरस्कार व अष्टपैलू खेळाडू : सत्या राजन बेहर (ओडिसा)

**महाराष्ट्र संघात सोलापूर जिल्ह्याचे प्रशिक्षक व तीन खेळाडू**

विजयी महाराष्ट्राच्या किशोरी संघात सोलापूर जिल्हा संघातील भक्ती ज्योतीराम चौधरी, ऋतूजा मारुती सुरवसे व कार्तिकी मारुती यलमार या तिघींचा समावेश होता. हे तिघेही कल्याणराव काळे स्पोर्टस् क्लब वाडीकुरोलीचे (ता. पंढरपूर) खेळाडू १आहेत. तसेच प्रशिक्षक अतुल जाधव हेही महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक आहेत. त्यांचे सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले.

# आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत अनुराधा थोरात ॲकॅडमीला ३५ पदके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

पेड्डेम इंडोअर स्टेडियम मापुसा गोवा येथे झालेल्या १०व्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत अनुराधा थोरात कराटे स्पोर्ट्स अॅकॅडमीच्या २० स्पर्धकांनी आपापल्या वयोगट व वजनीगटात १४ सुवर्ण, ११ रौप्य आणि १० कांस्य अशी ३५ पदके पटकाविली. सर्व विजयी स्पर्धकांना मुख्य राष्ट्रीय कराटे प्रशिक्षिका व आंतरराष्ट्रीय पंच शिहान अनुराधा महादेव थोरात, वीर सुरा, धानेश बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले.



**पदकप्राप्त स्पर्धक (काता व कुमिते)**

**मुले:** माहीर सुनिल सिक्केरा, मयुरेश नरसय्या गुंटुक , ओंकार शाम साखरे , सच्चीदानंदा सिद्राम येलदी (सर्व दोन सुवर्ण ), समर्थ राजशेखर माळी (सुवर्ण, रौप्य), विश्वराज कृष्णदेवराय गरड ( सुवर्ण, कांस्य ), राजवीर सुशांत बामणे (सुवर्ण), योगेश गुरुपाद भैरगोंड ( २ रौप्य), रुत्विक पोनामंडा (रौप्य) ऋतुराज सुशांत बामणे (रौप्य) दिलनवाज इलाही पठाण (२ कांस्य ) मनोज प्रसन्न कांबळे (२ कांस्य)

**मुली :** अध्या सागर एकबोटे (सुवर्ण, रौप्य), प्रणाली विजयकुमार गुजर (सुवर्ण, रौप्य), शिवप्रिया सिद्राम येलदी (कांस्य, सुवर्ण) सुनाक्षी राजशेखर माळी (कांस्य, रौप्य), सर्वज्ञा व्यकटेश गुंडेली (रौप्य), अरफा अल्ताफ जम ादार (कांस्य, रौप्य), स्नेहा सिद्धाराम हिप्परगी (कांस्य, रौप्य), प्रगती भीमराव पवार (कांस्य)



सोलापूर : दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे हे मुंबई विद्यापीठाच्या सुशांत धाडी यास सामनावीर पुरस्कार देताना. यावेळी प्रा. दत्तात्रय बिराजदार, सोमनाथ सोनकांबळे, राहूल वंजारे, दिलीप हाके, प्रमोद दिवेकर, शंकर पवार.





पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य भगवान अधटराव हे मनोज कऱ्हाळे याला तर ॲड.मल्लिनाथ शाहबादे हे योगेश राऊतला सामनावीर पुरस्कार देताना. यावेळी प्रा. संतोष गवळी.

# मुंबई, नाशिक, राहुरी, परभणी, नागपूर, सोलापूर विद्यापीठाचे दमदार विजय

### विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू करंडक टी-२० क्रिकेट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त राजमाता अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आयोजित महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठ कर्मचारी यांची क्रिकेट स्पर्धा सोलापुरात सुरू झाली असून दुसऱ्या दिवशी ३ मैदानावर एकूण ६ सामने पार पडले व त्यात सकाळच्या सत्रात मुंबई, नाशिक, राहुरी विद्यापीठाने तर दुपारच्या सत्रात नागपूर, परभणी, पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठांनी विजय मिळवले.

या स्पर्धेत एकूण १७ संघांनी सहभाग नोंदविला असून त्यांची विभागणी ४ गटात केली असून प्रथम साखळी पद्धतीने २० षटकांचे हे लेदर चेंडूवर रंगीत पोशाखात अतिशय सुंदर नेटके नियोजन अंतर्गत सामने पार पडत आहेत. पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर व प्र.कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या प्रमुख मार्गदर्शनात व प्र.कुलसचिव तथा क्रीडा संचालक डॉ.अतुल लकडे यांच्या मुख्य नियोजनात सोलापुरातील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम, डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल रेल्वे मैदान, भंडारी स्पोर्ट्स क्लब व दयानंद कॉलेज या ठिकाणी रोज २ सामने होत असून दुसऱ्या दिवशी इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे व सिनेट सदस्य भगवान आधाटराव यांचे हस्ते सामनावीराचा पुरस्कार अनुक्रमे सुशांत घाडी (मुंबई विद्यापीठ) व मनोज कऱ्हाळे (परभणी), रेल्वे मैदानावर सिनेट सदस्य ॲड. मल्लिनाथ शाहबादे यांच्या हस्ते योगेश राऊत (नाशिक), शिवाजीरात्र महाविद्यालय प्राचार्य डॉ.नितीन मोटे यांचे हस्ते महेंद्र बनकर (नागपूर), दयानंद कॉलेज मैदानावर डॉ.अतुल लकडे यांच्या हस्ते बी.जी राठोड (राहुरी), व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.सुशीलकुमार शिंदे यांचे हस्ते हनुमंत लोखंडे (सोलापूर) यांना सामनावीरचे पुरस्कार देण्यात आले.

## संक्षिप्त धावफलक

**इंदिरा गांधी पार्क स्टेडियम : १) मुंबई विद्यापीठ** : १६८/५ (२०) - सिद्धेश चव्हाण नाबार्ड ७०, प्रवीण मुलम ३५, सुनील मिसाळ १८, आदेश सोनार ३१/२ बळी, अल्पेश कोरपे नितेश पाटील जितू अंधेरे प्रत्येकी १ बळी **विजयी विरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान लोणेरे** : सर्वबाद ८४ (१५.५) आदेश सोनार २३, मेहुल कोरपे २०, रोहित गामरे संतोष जांभरे प्रत्येकी १२, घाडी १३/५ बळी, संजय पवार ३ बळी, भालेराव २ बळी.

**२) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी** : १५६/८ (२०) - मनोज कऱ्हाळे नाबाद ५६, प्रवीण पंडित ३२, माणिक ढगे १९, मुजीब १३, जयराम हंबर्डे व अशोक कत्तेवार प्रत्येकी २ बळी, गोविंद सोनटके, रशीद शेख,प्रशांत मुपडे प्रत्येकी १ बळी **विजयी विरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदायापीठ, नांदेड** : सर्व बाद ११९ (१९.४) - रशीद शेख नावात ५७, प्रशांत मुपडे १४, महेंद्र डलगज १२ मारोती शेल्लाळे २३/३ बळी, मनोज कऱ्हाळे १२/२ बळी, माणिक ढगे मुजीब शेख अनिल ढगे प्रत्येकी १ बळी

**रेल्वे मैदान : १) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक** : ८९/९ (१५) - नंदकिशोर ठाकरे २१, योगेश राऊत २०, कांगणे १५, सतीश एस. १४/३ बळी, सरोष शेख २ बळी, प्रवीण पाहाणते अविनाश के. प्रत्येकी १ बळी **विजयी विरुद्ध गोंदवाना विद्यापीठ गडचिरोली** : ८१/८ (१५) -सतीश एस. २७, सचिन मून १३, मंगेश कदाते १२, अवांतर १० पुष्कर तऱ्हाळ १५/३ बळी, योगेश राऊत ९/३ बळी, महेंद्रनाथ चौधरी १ बळी.

**२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर** : १८५/६ (२०) समीर दाने नाबाद ३८, दुर्गेश बायेस ३३, ईश्वर कुठे ३१, रितेश पुरकाम २९, निलेश रोटके २३, अनिल मेश्राम, किरण नांदणे, प्रणव कोलते, सतीश लोखंडे, पंकज ठाकूर प्रत्येकी १ बळी **विजयी विरुद्ध संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ** : ११४/९ (२०) संदीप त्रिपाठी ३३, सतीश लोखंडे १९, अवांतर १५ धावा महेंद्र भाऊ २५/३ बळी, दीपक राऊत दीपक घोडमारे सोनू खरे प्रत्येकी १ बळी

**दयानंद कॉलेज मैदान : १) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी** : १४४/८ (१८) - सतपाल २८, सचिन सोनवणे २५, अक्षय सांगळे १९, जालिंदरनाथ धनवटे अनिल थोरात प्रत्येकी १७, अवांतर १५ धावा बामु खताळ ३३/३ बळी, रवी पारधी २०/२ बळी, बलभीम मार्कड एक बळी. **विजयी विरुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठ** : ११९/८ (१८) - जितेंद्र पाटील ३०, बलभीम मार्कड १६, कार्तिक चव्हाण नाबाद १५, अवांतर धावा १८ बीजी राठोड २४/३ बळी, गौरव दानवे १२/३ बळी, सचिन भिंगार्डे व सतपाल प्रत्येकी १ बळी

**२) कवीकुलगुरू कालीदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक** : ११७/४ (१८) दीपक जोंधळे ४३, विजेंद्र पांडे ३३, सुनील बावणे १६, अवांतर १८ धावा महादेव वालेकर सुनील थोरात हनुमंत लोखंडे प्रत्येकी १ बळी. **पराभूत विरुद्ध पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठ** १२२/३ (१५.४) - हनुमंत लोखंडे नाबाद ३८, अतुल लकडे नाबाद ३७, सुनील थोरात १८, अवांतर १० धावा. विजयेंद्र पांडे व रुपेश मेश्राम प्रत्येकी १ बळी.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### कर्मवीर सार्वजनिक वाचनालयात डॉ. मामासाहेब जगदाळे जयंती साजरी

**बार्शी, दि. ४ फेब्रुवारी-**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात शब्दांची ज्ञानगंगा अर्थात शिक्षणाची ज्ञानगंगा अंधार असलेल्या घराघरांपर्यंत पोचवून प्रकाशाचा ज्ञानदीप अनेकांच्या घरातील प्रत्येकांच्या मनामनात रुजविणारे, प्रज्वलित करणारे थोर शिक्षण महर्षी, ज्ञानतपस्वी, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची १२३ वी समाजदिन म्हणून साजरी करण्यात आली. प्रथमतः कर्मवीर मामासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी ग्रंथालयाचे सचिव मधुकांत ठोकळ हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भागवत बोबडे, सामाजिक कार्यकर्ते सुहासबप्पा सुतार, सतीश पाचकुडवे, गायक सुनिल फल्ले आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख मान्यवरांनी यथोचित विचार व्यक्त केले. कार्यक्रमासाठी मधुकर वाळुजकर गुरुजी, विलास नेटके, प्रेम अग्रवाल, राहुल लोंढे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी मानले.



### कै. सुभाष काळे यांचे स्मरणार्थ जागरण गोंधळ कार्यक्रम

**बार्शी, दि. ४ फेब्रुवारी-**

कै. सुभाष गणपत काळे यांचे स्मरणार्थ दि.१ फेब्रुवारी रोजी बार्शी येथे राहुल सुभाष काळे यांनी त्यांचे वडिलांचे स्मरणार्थ जागरण गोंधळ कार्यक्रम गेले १३ वर्षांपासून आयोजित करत आहेत. सदर कार्यक्रमामध्ये सोलापूर जिल्ह्यातील जातिवंत पारंपारिक एकूण ९ वाघ्यामुरळी पार्टी यांनी कार्यक्रम सदर केला. सांगोला, करमाळा, बार्शी, अनगर, माढा, पंढरपूर येथून वाघ्या मुरळी पार्टी आले होते. कार्यक्रमास महाराष्ट्राचे महानगायक साजन बेंद्रे यांनी उपस्थित राहून कार्यक्रम सादर केला व सदर कार्यक्रमास बार्शी येथील विविध क्षेत्रातील लोकांनी हजेरी लावून शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात वाघ्या मुरळी पार्टीला ढाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.



### शिवजयंतीदिनी ड्राय डे जाहीर करावा

**मंगळवेढा, दि. ४ फेब्रुवारी-**

राज्यात दिनांक १९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या स्वरूपात साजरा केला जात असतो. त्यामुळे सदर दिवशी मद्यविक्री बंद रहावी व ड्राय डे घोषित करावा, या संदर्भाचे निवेदन सोलापूर येथे उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना मंगळवेढा येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाच्या वतीने देण्यात आले आहे. यावेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाचे माजी अध्यक्ष प्रशांत गायकवाड, चंद्रकांत काकडे, नगरसेवक अनिल बोदाडे, प्रमोद सावंजी, चंद्रकांत चेळेकर, सतीश दत्तू उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### मधुकर दुरुगकर



**पंढरपूर, दि. ४ फेब्रुवारी-**

येथील दुरुगकर मंगल भांडारचे मालक मधुकर पंडितराव दुरुगकर (वय ८५) यांचे गुरुप्रतिपदा, सोमवारी (दि.२) वृद्धकाळाने निधन झाले. त्यांच्या जाण्याने पंढरपूरच्या व्यापारी क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### सोपान पवार



**माळशिरस, दि. ४ फेब्रुवारी-**

येथील प्रगतशील शेतकरी व रामदेव मारुती देव देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष सोपान पवार (वय ९० वर्षे) यांचे निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली, तीन मुले, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### रितेश कल्याणशेट्टी



**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

पुना नाका जवळील गुलमोहर टाऊनशीप येथील शिवशिंपी समाजाचे रितेश बसवराज कल्याणशेट्टी (वय ४९) यांचे सोमवार दि. २ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, भाऊ, बहीण व दोन कन्या आहेत.

# शेतीमध्ये 'ड्रॅगन फ्रूट क्लस्टर' अन् 'ए.आय.' तंत्रज्ञानावर भर

## वैराग येथे छत्रपती कृषी मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ४ फेब्रुवारी-**

शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून त्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने, नमो आत्मनिर्भर कृषी व ग्राम विकास प्रबोधिनी संचलित 'छत्रपती कृषी व ग्राम विकास मार्गदर्शन केंद्रा'चे उदघाटन वैराग येथे बार्शी तालुका ग्रामीण पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी दिलीप ढेरे यांच्या हस्ते झाले. या केंद्राच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान आणि नैसर्गिक शेतीचा संगम घडवून आणण्याचा संकल्प करण्यात आला.





यावेळी अध्यक्षस्थानी प्रबोधिनीचे संस्थापक आणि सेवानिवृत्त डी.वाय.एस.पी. नानासाहेब कदम होते. डॉ. कपिल कोरके, इर्लेचे सरपंच सतीश पाटील, ज्येष्ठ द्राक्ष उत्पादक शेतकरी शरद पवार, प्रताप डेंगळे, आनंद पवार, विजयकुमार डूरे पाटील, प्रकाश देवकते, लहू पवार, भूषण भूमकर, संकेत सुरवसे, नारायण फरतडे, रवी वायकुळे, दत्ता कापसे, प्रतीक कापसे आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थापक नानासाहेब कदम यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली. शेतकऱ्यांचा खर्च कमी करण्यासाठी थेट 'बांधावर खत निर्मिती' ही संकल्पना मांडण्यात आली. 'छत्रपती' नैसर्गिक व रासायनिक खते आणि औषधे निर्मिती युनिटच्या माध्यमातून शेतकरी स्वतः दर्जेदार निविष्ठा तयार करू शकतील, ज्यामुळे त्यांचा निर्यातक्षम शेतमाल तयार होऊन उत्पन्न वाढण्यास मदत होईल. बार्शी तालुक्यात 'ड्रॅगन फ्रूट क्लस्टर' ची महत्त्वाची घोषणा करण्यात आली. जवळगाव येथील मेकॅनिकल इंजिनिअर व संशोधक शेतकरी प्रताप डेंगळे यांनी ड्रॅगन फ्रूट शेतीमधील नवनवीन प्रयोगांबाबत शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले.

छत्रपती आत्मनिर्भर केंद्राचे प्रशिक्षक आनंद पवार यांनी समारोप केला. त्यांनी ओरीजनल रॉ मटेरियल, पिकांनुसार शेड्युल आणि नैसर्गिक खत निर्मितीच्या तांत्रिक बाबींवर सविस्तर प्रकाश टाकला. या केंद्रामुळे वैराग व परिसरातील शेतकऱ्यांना एकाच छताखाली आधुनिक शेतीचे धडे आणि साहित्य उपलब्ध होणार असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

# विकासाच्या मुद्द्यावर मत द्या : शहाजीबापू पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ४ फेब्रुवारी-**

सांगोला तालुक्यात गेल्या काही वर्षांत विकास कामांचा ठसा उमटलेला असून शेती, पाणी, रस्ते व वीज यासारख्या मूलभूत प्रश्नांवर निर्णायक काम झाले आहे. ग्रामीण भागाचा विकास केवळ आश्वासनांवर नव्हे तर ठोस कृतीतून साध्य करायचा असेल तर महायुतीला साथ देणे काळाची गरज आहे, असे ठाम मत माजी आ. शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.

ते चोपडी जि.प.गटाचे महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत आणि राजुरी पं.स.गणाचे उमेदवार



डॉ. सदाशिव दबडे यांच्या प्रचारार्थ मानेगाव येथे आयोजित सभेत बोलत होते.यावेळी सरपंच बंडू बाबर, तानाजी बाबर, विश्वनाथ बाबर, दादासाहेब बाबर उपस्थित होते. केंद्र व राज्यात महायुतीचे सरकार असल्याने निधी मिळवण्यात अडचणी येत नाहीत. हाच विकासाचा धागा जिल्हा परिषद व पंचायत समिती पर्यंत पोहोचवायचा असेल, तर तेथेही महायुतीची सत्ता येणे आवश्यक आहे. त्यामुळे चोपडी जि.प. गटाचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत आणि राजुरी पं. स. गणाचे उमेदवार डॉ.सदाशिव दबडे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन यावेळी शहाजीबापू पाटील यांनी केले.

> जिल्हा परिषदेत महायुतीची सत्ता आल्यास पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या प्रश्नांवर प्राधान्याने काम केले जाईल. विकासाचा फायदा सामान्य माणसापर्यंत पोहोचवणे हेच महायुतीचे धोरण आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा आपला निर्धार आहे.
>
> **-चेतनसिंह केदार सावंत**

# श्वास घेण्यास त्रास होत असल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर :** दम लागून श्वास घेण्यास त्रास होत असल्याने उपचारास शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

सचिन तीपन्ना गौर वय ४५ रा. व्यंकटेश नगर अक्कलकोट रोड यांना घरी असताना पिकावर फवारणीचे औषध पिल्याने त्यांना उपचारासाठी खाजगी दवाखाना सिटी हॉस्पिटल येथे उपचार करून पुढील उपचारासाठी ६ जानेवारी रोजी खाजगी दवाखाना मार्कंडेय हॉस्पिटल येथे उपचार करून २ फेब्रुवारी रोजी डिस्चार्ज होऊन घरी गेले होते. त्यांना परत राहत्या घरी दम लागून श्वास घेण्यास त्रास होत असल्याने उपचारास ३ फेब्रुवारी रोजी भाऊ संतोष यांनी दाखल केले असता ते मयत झाले.

# आता एकच ध्यास; बोरामणी मतदारसंघाचा करणार विकास

## उमेदवार नेताजी खंडागळे यांची ग्वाही; वाड्या-वस्त्या काढल्या पिंजून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

बोरामणी जिल्हा परिषद निवडणुकीत युवा नेते नेताजी गंगाधर खंडागळे हे भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार असून, त्यांनी या भागाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचारात जोरदार आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. त्यांनी चार दिवसात बोरामणी गटातील सर्व गावे, तांडे, वस्ती पिंजून काढली आहे. त्यांनी डोअर टु डोअर प्रचार यंत्रणा राबविल्याने याचा फायदा त्यांना होणार आहे. इतकेच नाही तर आता घेणार एकच ध्यास; बोरामणी मतदारसंघाचा करणार विकास! अशी ग्वाहीही युवा उमेदवार नेताजी खंडागळे यांची मतदार संघातील जनतेला दिली आहे.



उमेदवार नेताजीभाऊ स्वतः उच्चशिक्षित व अभ्यासू असल्यामुळे त्यांना कोणते विकास काम कुठं अन् कसं करायचं हे चांगलंच माहिती आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे ते समर्थक असून, खंडागळे यांनी आमदार कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली बोरामणी गटाचा सर्वांगीण विकास करण्याचे ध्येय त्याच्या उराशी बांधले आहे.

बोरामणी भागात उद्योग, रोजगारावर भर, पायाभूत सुविधेचा विकास शासनाच्या योजना राबविणे, शिक्षणात गुणवत्ता, आरोग्य आणि जनकल्याण, बोरामणी भाग सिंचनाखाली आणणार, भागातील शेतरस्ते करण्याचा त्यांनी प्रचारात जनतेला शब्द दिला आहे. आ. सचिन कल्याणशेट्टी यांनीही सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मालाला जागतिक दर्जाची बाजारपेठ मिळावी म्हणून आता बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विषयही हाती घेतला आहे. जिल्हा प्रशासनाकडून याबाबत दुबार प्रस्तावही गेल्याच महिन्यात आ. कल्याणशेट्टी यांनी शासन दरबारी पाठविला आहे.

आ. कल्याणशेट्टी आणि आ. देवेंद्र कोठे यांच्या प्रयत्नातून सोलापूर विमानतळही गतीने चालू झाले आहे. या ठिकाणी गोवा, मुंबई, इंदौर हवाई सेवा चालू झाली आहे. या निवडणुकीनंतर तिरूपती हवाईसेवाही ते चालू करणार आहेत. सध्या होटगी रोडवरील विमानतळावर नाईट लँडिंगची सुविधाही ते करणार आहेत. आता बोरामणी विमानतळाचा विषयही आ. कल्याणशेट्टी यांनी हाती घेतल्याने या भागातील अनेक बेरोजगार युवकांच्या हाताला कामही मिळणार आहे. या मतदारसंघाच्या जवळच म्हणजे होटगी रोडवर या निवडणुकीनंतर आयटी पार्क होणार असल्याने या भागातील युवा वर्गाच्या हाताला आपल्याच भागात नोकरी मिळणार आहे. यामुळे उच्चशिक्षित युवकांचे पुणे-मुंबई स्थलांतराचे लोंढेही थांबणार आहेत. या मतदारसंघातील विविध प्रश्न सोडविण्याची ग्वाही आमदार कल्याणशेट्टी यांनी जाहीर सभा, कॉर्नर सभेतून दिली आहे.

यामुळे उमेदवार नेताजी खंडागळे यांनीही निवडून आल्यावर या भागाचा कायापालट करणार असल्याचे आश्वासन जनतेला दिले आहे. यासाठी बोरामणी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार नेताजी गंगाधर खंडागळे, बोरामणी पंचायत समितीच्या उमेदवार वर्षा सोमनाथ पटणे व कासेगाव पंचायत समितीचे उमेदवार विजय उमाकांत राठोड यांच्या पाठीशी जनतेने उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# काटगाव गट, तामलवाडी गणात 'डोअर टु डोअर' प्रचारावर भर

## भाजपा उमेदवार माळी, सावंत यांची प्रचारात मुसंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद अन् पंचायत समितीचे मतदान अवघ्या २ दिवसांवर आल्याने काटगाव गट अन् तामलवाडी गणातील भाजपा महायुतीच्या उमेदवारांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतली आहे. आता प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असून, होम-टू-होम प्रचारासह जाहीर सभा व प्रत्युत्तर सभांमुळे संपूर्ण गट, गणात राजकीय हालचालींना वेग आला आहे. मतदारांचा कौल कोणत्या बाजूने झुकणार, याचा अंदाज बांधणे सध्या कठीण असले तरी भाजपा उमेदवार निवृत्ती माळी आणि मंदाकिनी सावंत यांनी प्रचारात चांगलीच मुसंडी मारल्याचे दिसून येत आहे.





तुळजापूर तालुक्यातील काटगाव जिल्हा परिषद गटाचे भाजपा महायुतीचे उमेदवार निवृत्ती माळी व तामलवाडी पंचायत समिती गणाच्या उमेदवार मंदाकिनी शिवाजी सावंत या उमेदवारांच्या प्रचारार्थ तामलवाडी, सांगवी, पिंपळा गावातून नुकतीच भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीला हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. दरम्यान, या गट अन् गणासाठी भाजपाचे युवा नेते तथा बाजार समिती सदस्य यशवंत अण्णा लोंढे यांनीही प्रचारात मोठा सहभाग दर्शविल्याने फायदा दोन्ही उमेदवारांना होणार आहे.

तामलवाडी गणात मंदाकिनी सावंत आणि भाजपाचे युवा नेते, महिला वर्ग व भाजपा कार्यकर्ते पायाला भिंगरी लावून गावे पिंजून काढत आहेत. डोअर टु डोअर प्रचारावर त्यांचा भर आहे. या भागात प्रलंबित असलेली विकासकामे करण्याचा त्या शब्द देत आहेत. यामुळे मतदारांनी भाजपा महायुतीच्या उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन गट-गणातील उमेदवार करीत आहेत. दरम्यान, कॉर्नर सभा, जाहीर सभा आणि गावोगाव काढलेल्या रॅलीस मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पहाता काटगाव जिल्हा परिषद व तामलवाडी पंचायत समिती गणात कमळ फुलणार असा अंदाज नागरीक बांधत आहेत. या मतदारसंघासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील हे अहोरात्र तुळजापूर तालुक्यातील जनतेसाठी काम करत आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी माडुन ते सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. आ. पाटील यांनी काटगाव येथील तलावात उजनीचे पाणी आणण्याचा शब्द दिला आहे. यानंतर या ठिकाणाहून ३ गावच्या पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे नियोजनही त्यांनी केले आहे. एकंदरीत, भविष्यात आ. पाटील यांच्याकडून काटगाव गट व तामलवाडी गणातील विविध प्रलंबित कामे मार्गी लागणार असल्याने तमाम जनतेने भाजपाच्या पाठीशी राहावे, असे आवाहन युवा नेते यशवंत लोंढे यांनी केले आहे. यावेळी सोपान सावंत, आदिनाथ जाधव, राहुल खलाटे, बालाजी नवगिरे, बाळासाहेब जाधव, परमेश्वर हजारे, नानासाहेब जाधव, अभिजीत जाधव, सुरेश गायकवाड, देविदास नवगिरे, ज्ञानेश्वर देवकर, एकनाथ सराटे, महादेव नवगिरे, शंकर कदम, किरण जगताप, तात्यासाहेब चुंगे, ज्ञानेश्वर गायकवाड, बाबा गुंड उपस्थित होते.


### शासनाच्या योजना घरोघरी पोहोचविणार : शिवाजी सावंत

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान निधी योजना, कामगार योजना, संगायो, मनरेगा, श्रावणबाळ यासह इतरही घटकांसाठी विविध योजनांचा धडाका राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरूच ठेवला आहे. आता महाराष्ट्र थांबणार नाही; हे तर मुख्यमंत्री फडणवीस यांचे ब्रिदवाक्यच आहे. या योजना जिल्ह्यात राबविण्यासाठी आमदार राणादादा पाटील हे सतत पाठपुरावा करतात. भविष्यातही आम्ही शासनाच्या सर्व योजना घरोघरी पोहोचविणार असल्याची ग्वाही भाजपा नेते तथा माजी सैनिक शिवाजी सावंत यांनी दिली.

# सामाजिक, राजकीय, आर्थिक पटलावरील दुर्मिळ व्यक्तिमत्व : कुमार करजगी

कुमार करजगी हे नाव गेल्या ७५ वर्षांपासून सोलापूरच्या विविध क्षेत्रातील लोकांच्या नजरेत आहे पण सत्ता, श्रीमंती आणि प्रतिष्ठा या समीकरणापलीकडे त्यांनी प्रसिद्धी पासून दूर राहत स्वतःच ओळख होती. तारुण्याच्या सुरुवातीलाच त्यांनी गिरणी कामगारांचे हाल पाहायला मिळाले. या एक वेगळंच विश्व निर्माण केलं आहे. एक मिल कामगाराचा मुलगा सुरुवातीला एवढीच त्यांची सोलापुरातील कामगारांच्या प्रति अर्पण करण्याचे ठरविले सन १९८८ साली सामान्य जनते प्रति कामगारांवर होणारा अन्याय, अत्याचार थांबला पाहिजे आपले संपूर्ण आयुष्य असलेली एक जागरूक संवेदना असणाऱ्या माणसाच्या कार्याची खरी सुरुवात झाली. त्यावेळी अनेक नामवंत लोक सोलापूरचा कारभार पाहत होती पण कोणाचेच लक्ष त्या अन्यायग्रस्त गिरणी कामगारांवर गेले नाही. हीच छोटी पण पुढे डोंगराएवढी मोठी झालेली गोष्ट दादांच्या लक्षात आली त्यांनी गिरणी कामगारांसाठी लढा उभारला. पाठीशी कोणीही नसताना, खिशात एक रुपयाही नसताना या ध्येयवेड्या माणसाने तब्बल ३५ वर्षे प्रामाणिकतेच्या जोरावर मुंबई हायकोर्टापर्यंत लढा उभारून गिरणी कामगारांना न्याय मिळवून देण्याचे काम केले.

दादांच्या हातून अनेक चांगली कामे होतं असताना देवाने त्यांच्या आयुष्यातील एक आधाराचा कोपराच कायमचा रिकामा केला. दादांचा एकुलता एक मुलगा नागेश करजगी यांचा अपघाती मृत्यू झाला. या धक्क्यातून सावरत असताना दादांनी परत एकदा देवाशी भांडायचं ठरवलं कारण दादांच्या कर्माच नाणं खणखणीत होतं. आपला एकुलता एक मुलगा देवाने नेला तर मी माझ्या मुलाला नजरेसमोर ठेवून हजारो मुलांच भवितव्य घडवून त्यांच्यात नातं मायेचं... नातं आपुलकीच निर्माण करण्यासाठी नागेश करजगी यांच्या नावे सोलापूर शहरात सीबीएसई संलग्नीत जागतिक दर्जाचे शिक्षण देणाऱ्या नागेश करजगी ऑर्किड स्कुलची स्थापना केली. सुरुवातीला या शाळेत १३६ विद्यार्थी होते आज शाळेची विद्यार्थी संख्या २००० च्या आसपास आहे. आजच्या घडीला संपूर्ण शाळा डिजिटल शाळा बनविली आहे. याच शैक्षणिक वर्षात तब्बल ५० हुन अधिक विद्यार्थ्यांनी विभागीय स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी आहे. शाळेच्या निर्मिती वेळीच दादांनी सांगितले होते माझा विदयार्थी या शाळेतून जगाशी स्पर्धा परदेशात जाऊन आपली गुणवत्ता सिद्ध करून मेडल मिळवून सोलापूरचा नावलौकिक वाढवीला एक वेगळा दबदबा निर्माण झाला आहे. असे म्हणतात की ज्या ठिकाणी शास्त्र आहे त्याठिकाणी सुविधा उपलब्ध आहेत. याच जोरावर आज सीबीएसई पॅटर्नमध्ये नागेश करजगी ऑर्किड स्कूलचा करेल आणी आज १४ वर्षात त्यादिशेने वाटचाल सुरु आहे. इथल्या मुलांना सर्व शैक्षणिक सोयी सुबा असतो. अगदी याचप्रमाणे ऑर्किडचा विदयार्थी घडविला जातो.



या वर्षीचा शिक्षण क्षेत्रातील नामांकित असा 'मिमांसा पुरस्कार 'शाळेला प्राप्त झाला ज्ञान देऊन आजचा विद्यार्थी आहे. एक चौथी शिकलेला माणूस आपल्या मुलाची स्वप्ने पूर्ण करीत असताना शिक्षण संस्थेच्या माध्यमातून नागेश करजगी ऑर्किड ज्यू. कॉलेज. नागेश करजगी ऑर्किड करिअर अकेडमी, कंदलगाव येथे नागेश करजगी ऑर्किड स्कुल, मोहिनी वॉटर पार्क उभारले आहे. दादांचे एक स्वप्न पाहिलं होत सोलापूरमध्ये भारतातील नामवंत असे इंजनिरिंग कॉलेज व नामवंत असे मेडिकल कॉलेज असावे. यासाठी दादांनी हिप्परगा येथील स्वतःच्या मालकीची १० एकर जागा मोफत देवून त्याठिकाणी नागेश करजगी यांच्या नावाने सोलापुरात नागेश करजगी ऑर्किड इंजनिरिंग कॉलेज सुरु केले. तसेच मेडिकल कॉलेज उभे करण्यासाठी ५ एकर जागा एका नामवंत डॉक्टर्स ग्रुपला देण्यात आली असून लवकरच सोलापुरात नागेश करजगी मेडिकल कॉलेज सुरु होणार आहे. या सर्व गोष्टी करीत असताना दादा कधीच गरीब मिल कामगारांना विसरले नाहीत. याच वर्षी दादांनी भारतातील नामवंत असे देसाई नेत्र हॉस्पिटल जवळपास २ कोटींची जागा मोफत दिली आहे. ही जागा देत असताना गरीब कामगारांना मोफत नेत्र तपासणी व ऑपरेशन करून मिळावे हा शब्द देसाई हॉस्पिटलकडून घेतला आहे. याचवर्षी बाळे याठिकाणी आद्ययावत असे नेत्र हॉस्पिटल उभे केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन अमेरिकेतील कैलीफोर्निया संस्थेने डॉक्टरेट ही पदवी दिली आहे. सोलापूर शहरातील अशा या प्रसिद्धीपासून दूर राहिलेला माणूस म्हणजे डॉ. कुमार दाद करजगी आज त्यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने म्हणावं वाटतं. इतकं वर्ष कमावलेलं पुण्य कधीच वाया जात नाही अन कोणत्याही सत्ताधीशाला कुमार दादा होता येत नाही.

**- संदीप बुरकुल**

# कासेगाव गटातील जि.प. निवडणूक लक्षवेधी

**निवडणूक रिंगणातील उमेदवारांपेक्षा त्यांच्या पाठीशी असणाऱ्या नेत्यांची प्रतिष्ठा लागली पणाला...**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.४ फेब्रुवारी -**

तालुक्यातील सर्वाधिक लक्षवेधी लढत कासेगाव जिल्हा परिषद गटात होत आहे. येथे विविध राजकीय पक्षांकडून निवडणूकीच्या रिंगणात उमेदवार जरी उतरवलेले असले तरी खरी प्रतिष्ठा ही ज्या त्या उमेदवाराच्या पाठीशी असलेल्या नेत्यांचीच पणाला लागल्याचे दिसून येत आहे.

**चार दशकांपासून एकत्र राहिलेले विरोधात तर विरोधातील उमेदवार एकाच व्यासपीठावर**

पंढरपूर तालुक्यात यंदा जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक वेगळ्या राजकीय वळणावर लढली जात आहे. पारंपारिक विरोधी गटातील नेते एका व्यासपीठावर तर चार दशकापासून एकत्र राहिलेल्या आघाडीतील नेते मात्र विरोधात प्रचार करीत असल्याचे चित्र दिसत आहे.

**भालके आणि आमदार पाटील युतीमुळे खळबळ**

विशेष म्हणजे उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपल्यावर तालुक्यात तिरंगी लढत होणार असे स्पष्ट






चित्र होते. मात्र आमदार अभिजीत पाटील व विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा तिर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके यांनी प्रचार सुरू झाल्यानंतर युतीचा बॉम्ब टाकल्यामुळे एकच खळबळ उडाली. मात्र हा राजकारणाचा पोरखेळ असल्याची टीका करीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख यांनी भालके आणि पाटील यांच्या आघाडीस विरोध दर्शविला आहे.

**जिल्हाध्यक्ष देशमुखांसाठी मोठा धक्का**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदपवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख यांच्या हक्काच्या कासेगाव गटात त्यांनी तुतारी चिन्हावर उमेदवार दिला आहे. उमेदवारी मागे घेण्यापूर्वी योग्य तोडगा काढणे अपेक्षित असताना प्रचार सुरू झाल्यावर अभिजीत पाटील व भालके यांनी युती केल्यामुळे देशमुख यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे. जिल्हाध्यक्ष असताना पक्षाच्या चिन्हावरील उमेदवाराच्या विरोधात प्रचार करण्याची नामुष्की देशमुख ओढवून घेणार नाहीत. यामुळे देशमुख यांनी आता आपल्या उमेदवारासाठी जोमाने प्रचार सुरू केला आहे. यासाठी त्यांनी मोहिते-पाटील यांची सभा देखील आयोजित केली आहे.

**देशमुखांना आस्मान दाखविण्यासाठी परिचारकांची प्रतिष्ठा पणाला**

या गटात माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी भाजपाकडून माजी जि.प.सदस्य हरिभाऊ गावंघरे यांना उमेदवारी दिली आहे. कासेगाव भागातील मोठे प्रस्थ असणाऱ्या वसंतराव देशमुख यांनी परिचारकांशी काडीमोड घेतल्याने परिचारक यांच्यासाठी ही निवडणूक महत्वाची आहे. कासेगाव हा देशमुखांचा बालेकिल्ला नाही हे दाखविण्यासाठी त्यांनी गावंधरे यांच्या विजयासाठी कंबर कसली आहे. देशमुख यांनी परिचारक गटात राहूनच जि.प. सदस्य, पंचायत समिती सभापती, बाजार समिती सभापती, पांडुरंग कारखान्याचे २० वर्षे संचालक व उपाध्यक्षपद अशी विविध पदे भूषविली आहेत. तरीही त्यांनी परिचारकांशी फारकत घेतल्याने परिचारकांसाठी ही लढत प्रतिष्ठेची आहे.

**भालकेंसाठी भालकेंची प्रतिष्ठा पणाला**

दुसरीकडे तिर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख, विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके यांनी आपल्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून या गटात आपले चुलत बंधू व्यंकटराव भालके यांची उमेदवारी दाखल केली आहे. २०१७ साली याच गटातून भगीरथ भालके यांचा वसंतराव देशमुख यांनी पराभव केला होता. आता परिचारक व देशमुख यांच्या उमेदवारांना धूळ चारून नऊ वर्षांपूर्वीच्या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी भगीरथ भालके जोमाने प्रचार करीत आहेत. घरातील उमेदवार निवडून आणण्यासाठी भालके यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे.

एकंदरीतच निवडणुकीची ही सर्व पार्श्वभूमी पाहता उमेदवारांपेक्षा त्यांच्या पाठीशी असणाऱ्या नेत्यांसाठी कासेगाव जिल्हा परिषदेची लढाई प्रतिष्ठेची आहे. येथे नेत्यांनी आपल्या उमेदवारासाठी दंड थोपटले असल्याचे चित्र आहे. यामध्ये कोणाला यश मिळणार हे होणारे मतदान आणि त्यानंतर लागणाऱ्या निवडणूक निकाला नंतरच स्पष्ट होणार आहे.

# आरोप-प्रत्यारोपाने तालुक्याचे राजकारण निघाले ढवळून

**साडेतीन हजार दर द्या, मग मत मागा शेतकऱ्यांची मागणी...**

- **माढा तालुका जि.प.निवडणूक : साठे, डीकोळे आघाडीतून बाहेर?**
- **आ.अभिजीत पाटलांच्या प्रतिष्ठेची तर रणजितसिंहांचे नेतृत्व सिध्द करणारी निवडणूक**
- **दीड वर्षात दमडीचाही निधी नाही पालकमंत्र्याची टीका**






**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.४ फेब्रुवारी-**

जि.प.,पं.स. निवडणूकीमध्ये ऊसदर, सिना -माढाच्या पाण्यावरून माढा तालुक्यातील राजकारण आरोप प्रत्यारोपाने ढवळून निघाले आहे. भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार खासदारांना खिंडीत पकडले आहे. भाजपाच्या प्रत्येक सभेमध्ये शेतक-यांना एकरकमी साडेतीन हजार रूपयांचा धपका अगोदर द्या मग मतदानाच्या वल्गना करा असे भाजपा नेते रणजितसिंह शिंदे ठणकावून सांगत आहेत. तर दीड वर्षात आमदार खासदारांनी माढ्यासाठी दमडीचाही निधी आणला नाही असे पालकमंत्री जयकुमार गोरे मतदारांना पटवून सांगत आहेत. तालुक्याची निवडणूक रणजितसिंह शिंदे यांच्या नेतृत्वात होत असल्याने त्यांचा चांगलाच कस लागत आहे. आगामी काळात ही निवडणूक त्यांच्यासाठी नेतृत्व सिध्द करणारी तर आ.अभिजीत पाटलांसाठी प्रतिष्ठेची असल्याची चर्चा मात्र जोमात आहे.

माढा तालुक्यात ७ जि.प. गट व १४ पं.स.गण आहेत. भोसरे व कुर्डू जि.प.गट करमाळा विधानसभा मतदारसंघाला जोडले असल्याने या दोन मतदारसंघात भाजप राष्ट्रवादी काँग्रेस युती असल्याने या दोन जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला गेल्या आहेत. तालुक्यातील बाकी उपळाई, बेबळे, मोडनिंब, टेंभूर्णी अन मानेगाव या पाच जागांवर भाजपा स्वतंत्रपणे लढत आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना शिंदे गट अशी खा.धैर्यशील मोहीते पाटील यांच्या नेतृत्वात विरोधात आघाडी झाली आहे. सुरवातीस शिवसेना उध्दव ठाकरे गट आघाडीत होता मात्र कार्यकर्त्यांचा योग्य सन्मान होत नसल्याने या आघाडीतून बाहेर पडल्याचे सोशल मीडीयातून शिवसेना जिल्हाध्यक्ष धनंजय डीकोळे यांचे व्हीडीओ व्हायरल झाले आहेत. मात्र कुठे आघाडी तर कुठे बिघाडी असे चित्र आहे.

विधानसभा निवडणूकीवेळी आ.अभिजीत पाटील यांनी ऊसाला साडेतीन हजार रूपये दर देवून धपका देणार असल्याचे जाहीर केले होते.सीना-माढा उपसा सिंचन योजना आपण समर्थपणे चालवू कोणतीही अडचण येवून देणार नसल्याचे सांगून आपली यंत्रणा त्या कामासाठी कामाला लावू असे आश्वासन दिले होते. परंतू आजपर्यंत दीड वर्षात गेल्या हंगामातील गाळप केलेल्या ऊसाचा दर पूर्णपणे दिला नाही. सीना- माढा चालू करण्यासाठी कसलेच प्रयत्न केले नाहीत. हेच मुद्दे पालकमंत्री गोरे यांनी प्रचाराचा मुद्दा केले आहेत. रणजितसिंह शिंदे यांनी विठ्ठलराव शिंदे कारखान्यामार्फत २० लाख रूपये सीना माढाचे थकीत विजबीलापोटी भरून शेतक-यांसाठी चालू केल्याचे सांगत आहेत. तर तालुक्यातील शेतकरीवर्गही आमदारांनी अगोदर मागील वर्षी जाहीर केलेला साडेतीन हजार रूपये दर पुर्ण करावा मगच मते मागावी असे सोशल मीडीयावर जाहीरपणे बोलत आहेत. शेतक-यांची मागणी रास्त असल्याचे सांगत रणजितसिंह शिंदे देखील आम्ही दर घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नसून शेतक-यांच्या पाठीशी असल्याचे सांगत आहेत. याबरोबरच करकंब व आलेगाव येथील विकलेल्या साखर कारखान्यास घेतलेले शेअर्स ची रक्कम अगोदर खासदारांनी शेतक-यांना परत करावी असेही बोलले जात आहे. आ.अभिजीत पाटील यांनीही शिंदे यांच्यावर दुध संघात भ्रष्टाचार केल्याचा आरोप करत आहेत. शिंदे व पालकमंत्री दहशतीचे राजकारण करतात पण अशी दहशत खपवून घेतली जाणार नसल्याचे ते सांगत आहेत. याला उत्तर देताना शिंदे यांनी निवडणूकीनंतर राजीनामा देतो संघाची अन विठ्ठल कारखान्याची ३५० कोटीच्या गैरव्यवहाराची चौकशी करा असे प्रतीआव्हान दिले आहे.



## सांगोल्यात ९७ टक्के टपाली मतदान पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.४ फेब्रुवारी -**

सांगोला तालुक्यात ७ जि.प.गटासाठी व १४ पं.स.गणासाठी सार्वत्रिक निवडणूक होत असून बुधवार दि.४ फेब्रुवारी रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे टपाली मतदान घेण्यात आले असून तालुक्यातील ९७ टक्के टपाली मतदान पूर्ण झाल्याची माहिती सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली.

टपाली मतदान करण्यासाठी निवडणूक कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना मतदान करण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी केले होते. टपाली मतदान केंद्रावर नोडल अधिकारी दिपाली जाधव, सहा.गटविकास अधिकारी वसंत फुले, गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, केंद्राध्यक्ष, सहा.मतदान अधिकारी, मतदान अधिकारी, मंडल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सहाय्यक उपस्थित असल्याची माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

# सर्वाधिक तक्रारी पशु चिकित्सालयांविरोधात

# ‘एआय’च्या माध्यमातून थेट जनतेतून अभिप्राय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ फेब्रुवारी-**

जिल्हा प्रशासनाने कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांशी थेट संवाद साधण्याचा अभिनव प्रयोग सुरू केला असून, या सर्वेमधून जिल्हा परिषदेच्या पशु चिकित्सालयातील जनावरांच्या डॉक्टरांविरोधात सर्वाधिक तक्रारी समोर आल्या आहेत. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाचे कामकाज प्रशासनासाठी गंभीर डोकेदुखी ठरत आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने ‘उडान२०२५’ अंतर्गत प्रशासनात ए.आय.चा वापर व प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना जिल्हाधिकाऱ्यांनी नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नागरिकांकडून थेट अभिप्राय घेण्याच्या उपक्रमाची सविस्तर माहिती दिली.ए.आय.कक्षाच्या माध्यमातून दररोज १५ ते २० हजार नागरिकांशी फोनद्वारे संपर्क साधण्यात येत असून, अवघ्या ३० सेकंदांत तीन प्रश्न विचारून विविध शासकीय सेवांबाबत माहिती घेतली जात आहे. रेशनचे धान्य मिळते का, आरोग्य केंद्रात डॉक्टर वेळेवर येतात का, शाळेत शिक्षक उपस्थित असतात का, तसेच जनावरांच्या दवाखान्यात आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत का, अशा प्रश्नांद्वारे शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण, जिल्हा पुरवठा आणि पशुसंवर्धन विभागांचा आढावा घेतला जात आहे. दरम्यान, या सर्वेमधून शिक्षण व आरोग्य विभागात सकारात्मक सुधारणा दिसून आल्या आहेत. मात्र पशु चिकित्सालयांबाबत नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर




तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. जनावरांचे डॉक्टर वेळेवर उपस्थित राहत नाहीत, खाजगी डॉक्टर व एजंटांचा हस्तक्षेप वाढला आहे, पुरेसे कर्मचारी नसल्याने सेवा प्रभावित होत आहे. शेतात राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या गोठ्यांपर्यंत शासकीय डॉक्टर पोहोचत नसल्याने आजारी जनावरांवर खाजगी उपचार करावे लागत असून, त्यामुळे जनावरांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत असल्याचेही फीडबॅकमधून समोर आले आहे. तसेच राष्ट्रीय लसीकरण मोहीम वेळेवर व पूर्णपणे राबवली जात नसल्याच्या तक्रारी आहेत. पशुसंवर्धन विभाग वर्षभरापूर्वी राज्य शासनाच्या अधिपत्याखाली गेल्यामुळे जिल्हा परिषदेचे नियंत्रण कमी झाले आहे. सध्या या विभागाची तात्पुरती जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे असून, प्रभावी नियंत्रणाचा अभाव जाणवत आहे. जनावरांच्या डॉक्टरांची संख्या अपुरी असल्याचे मान्य करत, शासनाने नव्या नियुक्त्या केल्या असून लवकरच सेवेत सुधारणा होईल, अशी अपेक्षा सीईओ जंगम यांनी व्यक्त केली आहे.




# हिंद-दी-चादरसाठी जिल्ह्यातून १९०० कार्यकर्त्यांची उपस्थिती

## ३० लक्झरी गाड्यांमधून नांदेडला रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

शिख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या हौतात्म्य वर्षानिमित्त सोलापूर शहर व जिल्ह्यामधून ११०० कार्यकर्ते व ३०० महिला ३० लक्झरी गाड्यांमधून नांदेडला रवाना झाले. यामध्ये शीख, सिकलीगर, बंजारा, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी समाज बांधवाचा मोठा सहभाग आहे. नांदेड येथील वाघाळा परिसरात मोदी मैदान या ठिकाणी सकाळी आठ ते रात्री दहा पर्यंत हिंद दि चादर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रांतातील रा.स्व.संघाचे पदाधिकारी, प्रचारक, अखिल भारतीय कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन धर्म जागरण विभाग व प्रशासनाकडून करण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यातून बंजारा समाजाचे प्रतिष्ठित मान्यवर तुकाराम राठोड, रवी पवार, पांडुरंग पवार, सुभाष पवार, विश्वनाथ चव्हाण, मोची समाजातील कार्यकर्ते तायप्पा म्हेत्रे, पांडुरंग म्हेत्रे, भास्कर फुले तसेच लोधी समाजातील सामाजिक कार्यकर्ते गुलजारसिंग शिवसिंगवाले, सुरेश दिल्लीवाले, दीपक बऱ्हाणपुरे, नरेश शिवसिंगवाले, याशिवाय मातंग, कैकाडी समाजातील अनेक कार्यकर्ते नांदेड येथील सोहळ्यास उपस्थित होते. शिकलगार समाजातील झलकसिंग बीरबलसिंग दुधाने, रूपसिंग शिकलगार, राजेश कतारी यांनीही राष्ट्रजागरण कार्यात हातभार लावला. हिंद चादर या कार्यक्रमासाठी नांदेडला रवाना होणाऱ्या गाड्यांचे पूजन निवासी जिल्हाधिकारी व रा.स्व.संघ धर्म जागरणचे जिल्हा व विभाग पदाधिकारी यांच्या हस्ते कारण्यात आले. रा.स्व. संघ धर्मजागरण मंचचे ऋषिकेश पुराणिक, अतुल माढेकर, मोहन गणपा, चंद्रकांत जकापुरे, श्रीनिवास कोडम, रवी पाटील, रवींद्र देवीदास, प्रवीण कोंडा, सुहास जाधव, प्रदीप कल्याणकर, सागर जाधव आणि जिल्हा मातृशक्ती आयाम प्रमुख अपर्णा माने यांनी धर्मजागरण विभागाचे पुणे विभाग प्रमुख प्रसाद हारकुड यांच्या मार्गदर्शनाखाली हिंद दी चादर सोहळयात राष्ट्रजागरणाची आवश्यकता, महत्व पटवून सांगितले. हिंद दि चादर सोहळ्यास अक्कलकोटमधून सर्वाधिक मोठी उपस्थिती होती, अशी माहिती विभाग प्रमुख प्रसाद हारकूड यांनी दिली. याशिवाय जिल्हा मातृशक्ती आयाम प्रमुख अपर्णा माने यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ३०० माता-भगिनी यांनीही या सोहळ्यात हजेरी लावली.

## माळशिरस तालुक्यात ३९ जणांस मनाई

**वेळापूर, दि.४ फेब्रुवारी -**

सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक आचारसंहिता चालू असून ७ फेब्रुवारीला मतदान व ९ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील समाजकंटक लोकांवर गुन्हे दाखल आहेत. पोलीस स्टेशन हद्दीतील समाजकंटक यांच्या हातून मतदान व मतमोजणी दरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्याकरिता निवडणुकीच्या काळात त्यांना तालुक्यात न राहण्यास व प्रवेश न करण्याबाबत ३९ उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलूज यांच्याकडे प्रस्ताव पाठविले होते. उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस यांनी वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील ३९ जणांना ४ ते ९ फेब्रुवारीपर्यंत माळशिरस तालुक्यात राहण्यास व प्रवेश करण्यास मनाई आदेश प्राप्त करून घेऊन संबंधित इसमांना बजवण्यात आलेला आहे. त्यांना दिनांक ७ फेब्रुवारी रोजी मतदान हक्क बजावणीसाठी सकाळी १० ते १२ असा दोन तासाचा कालावधी दिला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अकलूजचे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी तसेच वेळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार यांनी केली आहे.





# विहिंप सामाजिक समरसता यात्रेचा पंढरपुरात समारोप

**● मेहतर कॉलनी, चंद्रभागा वाळवंटात कोळी समाजातर्फे समरसता अभियानाचे स्वागत**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ फेब्रुवारी-**

विश्व हिंदू परिषदेच्या वतीने पंढरपूरमध्ये सामाजिक समरसता यात्रा अभियानातून हिंदू सारा एक हा संदेश देण्यात आला. मेहतर कॉलनी येथे यात्रेचा समारोप झाला. तत्पूर्वी चंद्रभागा वाळवंट कोळी समाजाचे वतीने नगराध्यक्षा प्रणिता भालके आणि कोळी समाजाचे नेते गणेश अंकुशराव यांनी समरसता यात्रेचे स्वागत केले.

पंढरपूर विश्व हिंदू परिषदेच्यावतीने जाती पाती छोडो और सारे हिंदू जोडो अशा घोषणा देत समरसता यात्रा रथ पंढरपुरातील मेहतर कॉलनी येथे दाखल झाला. या समरसता यात्रेचा शुभारंभ सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट तालुक्यात किणी मोड बंजारा तांडा येथे संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला होता. त्यानंतर वळसंग, कुंभारी सोलापूर शहरातील सलगर वस्ती रामवाडी विठ्ठल मंदिर, इंचगिरी मठ, मार्कंडेय मंदिर, सिंधी कॉलनीत जयशंकर आश्रम, अंत्रोळीकर नगर येथे गुरूद्वारा, लोधी समाज शीतलादेवी मंदिर, मोची समाज जांब मुनी चौक, शिवस्मारक येथे छत्रपती शिवरायांना अभिवादन करून बार्शीकडे मार्गस्थ झाली.

बार्शी, कुर्डुवाडी, अरण, मंगळवेढा मार्गे पंढरी नगरीत समरसता यात्रा दाखल झाली .मेहतर कॉलनी येथे समारोपाच्या कार्यक्रमात विश्व हिंदू परिषद महाराष्ट्र आणि गोवा क्षेत्रीय



समरसता आयाम प्रमुख नरेश पाटील (मुंबई), प्रांतअध्यक्ष प्राचार्य गजानन धरणे, प्रांत मंत्री किशोर चव्हाण (पुणे) यांनी समरसते विषयी विचार व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. हेडगेवार यांनी सामाजिक न्यायासह हिंदू समाजात परस्पर सन्मान आणि समानता निर्माण व्हावी यासाठीच कार्य केले. अस्पृश्यता आणि जातीभेद मिटवण्यासाठी विश्व हिंदू परिषदेने अनेक आंदोलने आणि सामाजिक उपक्रम राबवले. या समरसता यात्रेतून गावागावातील सर्वच मंदिरातून सर्व जातींना प्रवेश, एक गाव एक पाणवठा तसेच एक गाव एक स्मशान तसेच सनातन राष्ट्र, कन्या-भगिनी, मंदिर-संत यांचे रक्षण करणे, सामाजिक व्यवहारातून अस्पृश्यता आणि उच्चनीचता संपवणे आणि समर्थ राष्ट्राची निर्मिती करून हिंदू सारा एक हा भाव मनामध्ये प्रकट करण्याचा संदेश सर्व हिंदू बांधवांना उपस्थित मान्यवरांनी दिला.

यावेळी प्रांत समरसता प्रमुख निखिलजी कुलकर्णी(पुणे), विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे, समरसता प्रांत सदस्य रवींद्र साळे, जिल्हा सहमंत्री गोपाळ सुरवसे, बजरंग दल जिल्हा संयोजक श्रीनाथ संगीतराव, नगरसेवक सौरभ थिटे, मेहतर समाजाचे नेते अंबादास दोडिया, मातृशक्ति विभाग संयोजिका मालती गंभीर, तुकाराम खंदाडे आदी प्रमुख मंडळीसह विविध समाजातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलमध्ये स्पोर्ट डे उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ फेब्रुवारी :** लातूर शहरातील लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलमध्ये स्पोर्ट डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय मास्टर्स व्हॉलीबॉल खेळाडू महेश पाळणे, श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, श्रीकृष्ण शिंदे, त्रिवेणी शिंदे, सागर बस्तापुरे, शुभांगी बस्तापुरे, गजानन काकडे, अर्चना काकडे, पुरषोतम पाटे, रंजना पाटे, प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, क्रीडा शिक्षक सजित तांबोळी यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. सर्व प्रथम शाळेचे विद्यार्थी स्नेहल बारगजे, शिवांश सुरवसे, विराज आलमले, शौर्या चेवले, हर्षदा सर्जे, जयेश वाघमारे, समर्थ गिरी, वेदिका चव्हाण, समर्थ नागरगोजे, हर्ष गावकरे, स्वरा सोळुंके, कार्तिकी पुजारी, आरोही वाघमारे, वैष्णवी बरुरे, जागृती माळी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फीत कापून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून त्यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांना दिली. शाळेचे सर्व विद्यार्थ्यांनी क्रीडा ज्योतीसह संचलन करून उपस्थित पालकांना सलामी दिली.



# लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांची धडक मोहिम


## ■ एका महिन्यात २६५ गुन्हे दाखल ■ २५ लाख ९१ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ फेब्रुवारी :** लातूर जिल्हा पोलीस प्रशासनाने अवैध धंद्याविरूद्ध धडक मोहिम हाती घेतली आहे. एका महिन्यात तब्बल २५६ गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण २५ लाख ९१ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध धंदेवाल्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.

समाजातील शांतता, सुरक्षितता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच जिल्ह्यात लपूनछपून सुरू असलेल्या अवैध धंद्यांचा समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा पोलीस दलाकडून प्रभावी व कठोर कारवाई करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेला अवैध धंद्यांविरोधात ठोस आणि परिणामकारक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. या आदेशांच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्हा पोलीस दलाकडून दिनांक ०१ जानेवारी २०२६ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात एकाचवेळी नियोजनबद्ध पद्धतीने कारवाया करण्यात आल्या. या विशेष मोहिमेदरम्यान अवैध देशी व विदेशी दारू विक्री करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली.

लातूर पोलिसांनी २०० व्यक्तींविरुद्ध १९७ गुन्हे दाखल करून १० लाख ०३ हजार ९१० रु. किमतीचा देशी-विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्याचप्रमाणे मटका व जुगारासारख्या अवैध जुगार धंद्यांविरोधातही कडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत १५८ व्यक्तींविरुद्ध ६८ गुन्हे दाखल करण्यात आले असून, १५ लाख ८७ हजार ९८० रुपये किमतीचे जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. एकूणच या एका महिन्याच्या विशेष मोहिमेमध्ये लातूर जिल्हा पोलीस दलाने अवैध धंदे करणाऱ्या २७९ व्यक्तींविरुद्ध २६५ गुन्हे दाखल करून रु. २५,९१,८९०/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



एकंदरीत अवैध धंद्यावरील दाखल गुन्ह्यातील आरोपी पुन्हा अवैध धंद्यांमध्ये सहभागी होऊ नयेत, यासाठी त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रतिबंधक आदेशांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांविरुद्ध पुन्हा कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा लातूर पोलिसांकडून देण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी यावेळी स्पष्ट केले की, लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व समाजातील सुव्यवस्था राखण्यासाठी अशा कारवाया यापुढेही सातत्याने व अधिक तीव्रतेने सुरू राहतील. लातूर जिल्हा पोलीस दलाची ही कारवाई अवैध धंदे करणाऱ्यांसाठी कडक इशारा असून, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाणार असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट करण्यात आले आहे.

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ फेब्रुवारी :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ०४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## राजा नारायणलाल लाहोटी शाळेत मासिक स्वरपौर्णिमा उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ फेब्रुवारी :** येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या संगीतकलेला चालना देण्यासाठी 'स्वरपौर्णिमा' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत असून दर पौर्णिमेला सायंकाळी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

या कार्यक्रमासाठी लातूर शहरातील नामवंत व्यावसायिक श्री. आनंदजी बंग हे प्रमुख पाहुणे शिरीष कुलकर्णी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षपद शाळेचे चेअरमन श्री. आनंद लाहोटी यांनी भूषवले.याप्रसंगी प्रवीण शिवणगीकर, मनोहर कबाडे, अरुल सेल्वी, उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना त्यांच्या संगीतकलेच्या सादरीकरणासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आमचा मानस असून उत्कृष्ट कलावंत या विशेष उपक्रमातून घडतील हा आमचा विश्वास आहे असे प्रतिपादन शालेय समिती अध्यक्ष श्री आनंद लाहोटी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना आपल्या मनोगतातून केले. देवयानी देशपांडे यांनी कार्यक्रमाची संकल्पना मांडली. या कार्यक्रमात त्रिशा बाहेती, तीर्था कडणे, पूर्वी मुंदडा, काव्या बलदवा, काव्या चौधरी, प्रिशा भुतडा, वीरनाथ डोंगरे विद्यार्थ्यांनी गायन, तबला वादन कला सादर केली. गुणवंत विद्यार्थ्यांना संगीत विभागातील कौस्तुभ जोशी, शिरीष देशपांडे, गीता मुंडे, कृष्णा कुलकर्णी या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इशिका ढवळे या विद्यार्थिनीने केले. याप्रसंगी बी के भालेराव, आशिष बनसोडे, संदीप केंद्रे, दर्शन देशपांडे, सुनील मुनाळे, अनिल कांबळे, शाहू बिरादार व कर्मचारी वृंद, पालक उपस्थित होते.

## मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडियातर्फे दयानंद विज्ञानच्या चार विद्यार्थ्यांना पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ फेब्रुवारी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांना मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडिया तर्फे उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार जाहीर करण्यात आला व सदर पुरस्काराचे वितरण संत जनाबाई शिक्षण मंडळाचे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,गंगाखेड येथे आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये सदर पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडिया ही एक देशपातळी वरील नामांकित संस्था असून त्याचे संपूर्ण भारतातील महाविद्यालयात शाखा चालवली जाते आणि त्यातून विद्यार्थ्यांसाठी विविध योजना व कार्यक्रम राबविले जातात. तसेच या संस्थेतर्फे दयानंद विज्ञानच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांना उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार प्राप्त होणे ही मोलाची बाब आहे. निवड



झालेले चार विद्यार्थी चि.सार्थक कोराळे, कु. राजलक्ष्मी वाघमारे, (पदवी विभाग) व कु. श्रुती पवार,कु.श्रद्धा माने (पदव्युत्तर विभाग) या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार उपरोक्त राष्ट्रीय परिषदेमध्ये मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ.ए.एम. देशमुख तसेच वरिष्ठ सूक्ष्मजीवशास्त्र प्रा.डॉ. प्रशांत वक्ते,डॉ.राजेंद्र आवस्ती,डॉ.संजय शिरसागर व तसेच डॉ.दिलीप चव्हाण यांच्या हस्ते मानचिन्ह व सर्टिफिकेट देऊन प्रदान करण्यात आला.सदरील विद्यार्थ्यांचे अभिनंदन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी केले.

उत्कृष्ट सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.याप्रसंगी सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे तसेच डॉ.महेश करळे,डॉ.दीप्ती ढेरे,प्रा. शितल पाटील,प्रा.शैलजा धुतेकर,प्रा.संध्या टेकाळे, प्रा.अनुराधा इंगळे आणि शिक्षकेत्तर कर्मचारी माधवराव सूर्यवंशी व अशोक मदने हे उपस्थित होते.

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जबाबदारीचे भान ठेवावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ फेब्रुवारी :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जीवन जगत असताना जबाबदारीचे भान ठेवून स्पर्धेच्या युगामध्ये चालू घडामोडीचा अभ्यास कायम ठेवावा. काळाच्या पुढे राहून यशस्वी जीवन जगावे. आपल्या मनातील विचारांना निर्भीडपणे मांडून आपल्यातील सर्वांगिण विकासाला संधी द्यावी. आवडीच्या क्षेत्रामध्ये यशस्वीपणे वाटचाल केल्यास यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन पोलिस उपअधीक्षक समीरसिंह साळवे यांनी केले.

जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेज मध्ये आयोजित १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात बोलत होते. यावेळी प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य गोविंद शिंदे, उपप्राचार्य विठ्ठल चेवले, उपप्राचार्य संजय अंकुश, उपप्राचार्य मनोज गायकवाड, प्रा. सुरेश सुडे, प्रा. वैजनाथ जाधव, प्रा.हणमंत बद्दे, प्रा.निवृत्ती गौंडगावे, प्रा.अंजली आकुसकर, प्रा. विरेश स्वामी, प्रा. प्रशांत बेडगे, प्रा. परमेश्र्वर भंगे, प्रा. सुधाकर दर्शने, प्रा. सुचिता घाडगे, संभाजी मोटे उपस्थित होते.

यावेळी साळवे म्हणाले, जिद्द, चिकाटी व ध्येय समोर ठेवून शिक्षणाचा जागर कायम ठेवून कार्य केल्यास अपेक्षित यश मिळते. तसेच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षेचा मार्गही निवडावा. प्रास्ताविक प्राचार्य सूर्यवंशी यांनी केले. सूत्रसंचालन सुचिता घाडगे यांनी केले.

## विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांचा जन्मदिन यशवंतराव चव्हाण रुग्णालयात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ फेब्रुवारी :** थोर शिक्षणतज्ञ, विचारवंत आणि विश्वशांतीचे प्रणेते एमआयटी पुणे या शिक्षण संकुलाचे संस्थापक प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांचा जन्मदिन लातूर येथील एमआयटीच्या वैद्यकीय महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय येथे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमाद्वारे साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित रक्तदान शिबिरात ८६ जणांनी रक्तदान केले तर रुग्णालयातील विविध विभागाच्या वतीने सर्व रुग्णांसाठी मोफत तपासणी करण्यात आली.

गोरगरीब आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा ध्यास घेतलेले, शून्यातून विश्व निर्माण करणारे त्याचबरोबर अध्यात्म आणि विज्ञान यांच्या संगमातून मानवी कल्याणासाठी कार्य करणारे एमआयटी शिक्षण समूह पुणे आणि विश्वशांती केंद्र आळंदी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांचा ३ फेब्रुवारी रोजी जन्मदिन. यानिमित्ताने लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड आणि परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर येथील एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय येथे श्रीमती सरस्वती कराड रक्तपेढीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ८६ जणांनी रक्तदान केले. रुग्णालयातील सर्व प्रकारच्या रुग्णांना यावेळी फळ वाटप करण्यात आले. त्याचबरोबर विविध विभागाच्या वतीने रुग्णांची पूर्णपणे मोफत रक्तदाब व मधुमेह तपासणी शिबिर, महिलांच्या स्तन व गर्भाशय कॅन्सरबाबत रोग निदान व उपचार, नाक, कान, घसा विभागाच्या वतीने तोंडाच्या कर्करोगाची तपासणी, हाडाचा ठिसूळपणा तपासणी, थॅलेसेमिया रुग्णांची सिरम फेरेटीन तपासणी, रुग्णांची अस्थामा तपासणी, गॅस्ट्रोस्कोपी आणि एन्डोस्कोपी तपासणी करण्यात आली.

विश्वधर्मी मा. डॉ. वि. दा. कराड साहेब यांच्या जन्मदिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध विभागाच्या मोफत तपासणी शिबिराचे रुग्णालय अधीक्षक डॉ. चंद्रकला डावळे पाटील, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य एस. एस. सर्वानन, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, कार्यालय अधीक्षक भास्कर दहिफळे, रुग्णालय प्रशासकीय अधिकारी श्रीपती मुंडे यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. या शिबिराचा सर्व प्रकारच्या रुग्णांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.




विविध विभागातील तपासणी शिबिर कार्यक्रमात मेडिसिन विभाग प्रमुख डॉ. गजानन गोंधळी, स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ. क्रांती केंद्रे, अस्थिरोग विभाग प्रमुख डॉ. अरुणकुमार राव, शल्यचिकित्सा विभाग प्रमुख डॉ. एन. व्ही. कुलकर्णी, बालरोग विभाग प्रमुख डॉ. विद्यादेवी कांदे, नाक, कान, घसा विभाग प्रमुख डॉ. श्याम सोमानी, यांच्यासह त्या त्या विभागातील डॉ. विशाल भालेराव, डॉ. सचिन बाबळसुरे, डॉ. शरद सोनवणे, डॉ. स्तुती उगिले, डॉ. अमर लिंबापुरे, डॉ. नीला भट्टड, डॉ. रोशनी आकुसकर, डॉ. प्रीती, डॉ. अबेद नागुरे, डॉ. मधुरा वाघमारे, डॉ. बसवराज वारद, डॉ. रवींद्र इरपतगिरे, डॉ. अभिजीत रायते, डॉ. नंदकिशोर शिंदे, डॉ. नितीन सर्जे, डॉ. द्वारकादास तापडिया, डॉ. गीतकुमार हाजगुडे, डॉ. उद्धव शेळके, डॉ. रोहन पाटील, डॉ. शिल्पा कुदरीकर, डॉ. दीपिका माशाळकर, डॉ. शुभम डाके, डॉ. शुभम कालेढेले, डॉ. शैला बांगड, डॉ. शितल शेळके, डॉ. सुरेखा भालेराव, डॉ. शिल्पा गर्जे, डॉ. योगेश गावसाने, डॉ. अनिलकुमार जाधव यांनी मेहनत घेतली. दिवसभर विविध विभागात रूग्णांची मोठी गर्दी होती.

# विविध वृत्त...

## साई रस्त्यासाठी ग्रामस्थ आक्रमक

**लातूर :** तालुक्यातील साई ते लातूर मुख्य रस्त्याची गेल्या अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली आहे. वारंवार मागणी करूनही रस्ता दुरुस्तीचे काम होत नसल्याने ग्रामस्थ संतापले आहेत. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करीत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे. निवेदनावर शिवराज पवार, किसन पवार, पवन पवार, नितीन पवार, लालासाहेब क्षीरसागर, विक्रम शिंदे, रमाकांत सुरवसे, मुबारक पठाण, भरत रसाळ आर्दीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मोटर-म्हशी चोरणारी टोळी जेरबंद

**लातूर :** लातूर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या शेतशिवारातील पाणबुडी मोटारी, स्प्रिंकलर सेट, म्हशी तसेच बिअर बार फोडून विदेशी दारू चोरी करणाऱ्या संघटित टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार सराईत आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून तब्बल ९ लाख २६ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. दि. २४ जानेवारी रोजी मुरुड अकोला मार्गावर करकटा पाटी परिसरात संशयास्पद बोलेरो पिकअप वाहनासह चार जणांना ताब्यात घेण्यात आले. तपासात त्यांच्या ताब्यातून १० पाणबुडी मोटारी, २३ बॉक्स विदेशी दारू, १ लाख ५७ हजार रुपये रोख व बोलेरो पिकअप वाहन असा मुद्देमाल आढळून आला. चौकशीत आरोपींनी गेल्या एक वर्षापासून लातूर, धाराशिव व सोलापूर जिल्ह्यात चोरी केल्याची कबुली दिली. या टोळीचे मुरुड, शिरूर अनंतपाळ, अहमदपूर, कासार शिरसी व वैराग पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एकूण १० गुन्ह्यांशी संबंध उघड झाला आहे. फरार साथीदारांचा शोध सुरू असून पुढील तपास चालू आहे.

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी मतदार यादी कार्यक्रम जाहीर

**लातूर :** राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ग्रामपंचायत निवडणुकीसाठी पारंपरिक पद्धतीने राबविण्याचा मतदार यादी कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. दि. ३१ जानेवारी पर्यंत मुदत संपलेल्या, तसेच निधन, राजीनामा किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी हा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. यासाठी १ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार असून प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी १६ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध होणार आहे. १६ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. २४ फेब्रुवारी रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे. या यादीच्या प्रकाशनामुळे मतदारांना आपल्या नावाची पडताळणी करून आवश्यक सुधारणा करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे मतदाराने माहिती वेळेत तपासून हरकतीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

## राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे यश

**लातूर :** नांदेड येथे झालेल्या ६९ व्या राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेत लातूरच्या श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथील विद्यार्थी आयुष ओमप्रकाश तोडकर याने महाराष्ट्र संघात चांगली कामगिरी करून पहिल्या क्रमांकाचे यश मिळवले. देशातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या ६९ व्य राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटात महाराष्ट्र संघाने मध्य प्रदेश संघाला हरवत विजेतेपद मिळवले. या संघात आयुष तोडकर याने ऐतिहासिक कामगिरी करत विजयाची पताका रोवली. क्रीडाशिक्षक शिला सलगरे, दिनेश मानके, नरेंद्र स्वामी, प्रशिक्षक अप्पासाहेब स्वामी, श्रेयश मठपती यांचे त्याला मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल शाळेचे संचालक राजेंद्र कोळगे, संचालक सदस्या सुनंदा कोळगे, मुख्याध्यापिका सोनाली कुलकर्णी, मुख्याध्यापिका विनया मराठे, कार्यालयीन प्रशासक आशिष कोळगे, उपमुख्याध्यापिका सुलभा जोशी यांनी त्याचा सत्कार करून अभिनंदन केले.

## 'नीट' प्रमाणे दहावी परीक्षेतही ड्रेसकोड हवा

**लातूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये पारदर्शकता, शिस्त आणि गैरप्रकारांना आळा घालता यावा म्हणून 'नीट' परीक्षेप्रमाणे दहावी-बारावी परीक्षेतही ड्रेस कोड लागू करावा, अशी मागणी जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक संघाचे लातूर जिल्हाध्यक्ष माधव गुंडरे यांनी केली. जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक संघाने शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. दहावी-बारावी परीक्षांदरम्यान कपड्यांमध्ये लपविलेले इलेक्ट्रॉनिक उपकरणे, कॉपी यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी, तसेच परीक्षा केंद्रांवरील तपासणीतील अडथळे यांचा उल्लेख करण्यात आला. हे चित्र टाळण्यासाठी 'नीट' परीक्षेचे नियम या परीक्षांही लागू करण्याची मागणी करण्यात आली. नीट परीक्षेसाठी लागू असलेल्या ड्रेस कोडमुळे शिस्तबद्ध व पारदर्शक प्रक्रिया दिसून येते. तशीच व्यवस्था दहावी-बारावी बोर्ड परीक्षांसाठीही लागू करावी. या मागणीची शासनस्तरावर सकारात्मक दखल घेण्यात आली असून, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी पुढील परीक्षेच्या वेळी याचा विचार केला जाईल, असे पत्राद्वारे कळवले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मध्यमवर्गीय गरीब शेतकऱ्यांची लवकरच कर्जमाफी - मंत्री बावनकुळे

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ०४ फेब्रुवारी :** कर्ज व कर्जावरील व्याजाचा भरणा करता न येर्णाय़ा गरीब मध्यमवर्गीय शेतर्क़यांची कर्जमाफी लवकरच करण्यात येणार असल्याचा खुलासा भाजपाचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी करुन राज्यसरकारची भुमिका स्पष्ट केली.तसेच कर्जमाफीबाबत पसरवले जात असलेले गैरसमज दूर करत त्यांनी सरकारची भूमिका जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारसभेत लामजना येथे मंगळवार दि. ३ रोजी मांडली असून देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कर्जमाफीचा लाभ खरोखरच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनाच लवकरच मिळेल. असा ठाम विश्र्वास व्यक्त केला.

औसा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रचारार्थ लामजना येथील प्रचारसभेत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. माजी मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर भाजपाचे जिल्हाध्यक्ष, माजी मंत्री बसवराज पाटील, आमदार अभिमन्यू पवार, सभापती चंद्रशेखर सोनवणे, ड परीक्षीत पवार उपस्थित होते.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले,अभिमन्यू, तुम्ही सर्व गावांची यादी तयार करा. मी एक शासन आदेश काढून गायरानवर, बंजारा वस्तीत किंवा इतर वस्तींमध्ये राहणाऱ्या सर्व कुटुंबांचे कबाले वाटप करून देण्याची जबाबदारी घेतो, अशी घोषणा करुन बंजारा समाजाला दिलासा दिला.

घरकुलासाठी कमाल मर्यादा न मिळालेल्या कुटुंबांनाही न्याय दिला जाईल.समाजाच्या शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य सरकार विविध योजना राबवत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नव्याने मुख्यमंत्री बळीराजांचे योजना तयार करण्यात आली असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.त्यासाठी अनेक लोकप्रतिनिधींचे योगदान लाभल्याचे त्यांनी नमूद केले.लातूर जिल्ह्यातील आमदार अभिमन्यू पवार व संभाजी पाटील निलंगेकर




राज्यातील उत्कृष्ट आमदारांमध्ये असून, विकसित लातूर या संकल्पनेतून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री बावनकुळे पुढे म्हणाले, येणारी जिल्हा परिषद निवडणूक ही व्यक्तीची नसून, केंद्राच्या ५५ व राज्याच्या ४४ योजनांचा लाभ शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ओबीसी, बंजारा व वंचित घटकांसाठी विशेष योजना राबवण्यात येणार असून सात तारखेला होणारी निवडणूक विकासासाठी महत्त्वाची असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.विकसित लातूर २०४७ या दृष्टीकोनातून लातूर, निलंगा व किल्लारीचा विकास केला जाणार असून, केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीचा मोठा लाभ मराठवाड्यासह लातूर जिल्ह्याला होणार आहे.तसेच लाडकी बहीण योजना बंद होऊ दिली जाणार नाही, अशी ग्वाही दिली. ज्या ठिकाणी काँग्रेसची सत्ता आली, त्या ठिकाणी ही योजना बंद झाल्याचा आरोप मंत्री बावनकुळे यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवण्यासाठी बिना व्याज, बिना जामीन कर्ज देणारी योजना जाहीर केली आहे. महाराष्ट्राला यावर्षी केंद्र सरकारकडून एक लाख कोटी रुपयांचा निधी मिळणार असून, त्याचा मोठा लाभ मराठवाड्यासह लातूर व धाराशिव जिल्ह्याला होणार आहे.राज्यात लाडकी बहीण योजना सुरू असलेल्या ठिकाणी ती पुढेही चालू राहणार आहे.महिलांना पाच लाख रुपयांपर्यंतचे रोजगार कर्ज देऊन स्वयंपूर्ण केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेमार्फत महिला बचत गटांसाठी व्यावसायिक संकुल उभारून त्यांच्या तयार वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### पाच वर्षात प्रभावीपणे योजना राबविल्या - बसवराज पाटील

आमदार संभाजी पाटील निलंगेकर व आमदार अभिमन्यू पवार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून तळा-गाळातील घटकांना न्याय देण्याची भूमिका बजावत आहेत. जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून २५ वर्षांत २० वर्षे काँग्रेस सत्तेत होती, तर केवळ ५ वर्षे भाजप सत्त-ेत असूनही त्या काळात भाजपाने सर्व योजना प्रभावीपणे राबवून सर्वसामान्यांना न्याय दिल्याचा दावा भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी यावेळी केला.

## एससीईआरटी तर्फे आयोजित राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेत

# अनिता यलमटे राज्यात द्वितीय

### राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेत मिळवले घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०४ फेब्रुवारी :** महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग एससीईआरटी मार्फत आयोजित शिक्षक व अधिकारी/ कर्मचारी राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेत येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयाच्या उपक्रमशील शिक्षिका अनिता यलमटे यांनी महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. .

शालेय शिक्षण विभागामार्फत शिक्षक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध स्पर्धांचे आयोजन एससीआरटी तर्फे करण्यात आले होते. अनिता येलमटे यांनी कथालेखन स्पर्धेत केंद्र ,तालुका ,जिल्हा व विभागस्तरावरून यशस्वी होत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील ४० स्पर्धकांचा सहभाग होता. या अत्यंत प्रतिष्ठेच्या व चुरशीच्या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक अनिता येलमटे यांच्या 'हिरवाई हरवते तेव्हा' या कथेने प्राप्त केला. त्यांच्या या यशाने लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये चैतन्याचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



'अनिता यलमटे' यांना महाराष्ट्र शासनाच्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त असून त्या राज्यपाल नियुक्त सांस्कृतिक धोरण समितीच्या सदस्य आहेत तसेच उदगीरच्या साहित्यिक,सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळीत सक्रिय सहभाग नोंदविणाऱ्या त्या विद्यार्थीप्रिय शिक्षिका आहेत. विद्यार्थ्यांना लिहिते वाचते करण्यासाठी त्यांनी सातत्याने विविध प्रयोग केले आहेत. सातारा येथे झालेल्या ९९व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात त्यांना कवितेसाठी निमंत्रित केले होते. त्या महाराष्ट्रातील प्रथितयश कवियत्री व कथाकथनकार आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल लातूरचे शिक्षणाधिकारी दत्तात्रेय मठपती, तृप्ती अंधारे, गटशिक्षणाधिकारी शेख शफी , शिक्षण विस्ताराधिकारी नितीन लोहकरे ,केंद्रप्रमुख बालाजी धमनसुरे, विषयतज्ज्ञ ज्ञानोबा मुंडे ,भारतीय शिक्षण प्रस-ारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलुरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे,लालबहादूर शास्त्री शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष मधुकर वट्टमवार ,केंद्रीय सदस्य तथा कार्यवाह शंकराव लासुणे , शालेय समिती अध्यक्ष सतनाप्पा हूररदळे ,मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ,पर्यवेक्षक व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

**उदगीरची माती लेखणीला बळ देणारी**

या यशाविषयी प्रतिक्रिया व्यक्त करताना अनिता यलमटे म्हणाल्या, या यशाने केवळ माझ्या लेखणीचा नव्हे, तर उदगीरच्या साहित्यिक चळवळीचाही सन्मान झाला आहे. सातत्याने लेखन करत राहण्याची प्रेरणा या मातीतूनच मिळते.

# लक्ष्मण अकनगीरे यांचा सेवापुर्ती सोहळा सपन्न

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०४ फेब्रुवारी :** रेणापूर येथील लक्ष्मण पंढरीनाथ अकनगीरे यांचा सेवा पुर्ती सोहळा अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापुर पासुन जवळच असलेल्या जवळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण अकनगीरे यांच्या सेवापुर्ती सोहळा मोठ्या उत्साहात सपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सोमवंशी, प्रमुख पाहुणे म्हणून विस्ताराधिकारी श्रीराम कन्नाके, मुख्याध्यापक अशोक हारे, केंद्रप्रमुख हरिदास आगलावे, सरपंच सतीश हारे, उपसरपंच विश्रांती पवार, शालेय व्यवस्थापन समितीअध्यक्ष लिंबराज हारे, उपाध्यक्ष नम्रता माने, माजी जी.प.सदस्य संजय गिराम हे होते.

लक्ष्मण अकनगीरे हे सन २०२३ पासुन जवळगाव शाळेत कार्यरत होते बर्दापुर केंद्राचे केंद्रींय मुख्याध्यापक म्हणून त्यांनी काम पाहीले

सर्वांना समजून घेणारे मन मिळवू स्वभावाचे त्याच्या कामाची शैली हि वाखण्यजोगी असल्याचे कार्यक्रमात अकनगीरे याच्या कार्याचा ओहा पोहा शिक्षक, मित्र परिवारानी कार्यक्रमा प्रसंगी बोलताना केला.



या कार्यक्रमा वेळी लक्ष्मण अकनगीरे यांना सेलुकर सर यांनी सन्मानपत्र दिले त्याचे वाचन शैलजा सेलुकर मॅडम यांनी केले.

तसेच केंद्रातील मुख्याध्यापक,सर्व शिक्षक, पाहुणे, बंधु, इष्टमित्रपरीवार व ग्रामस्थांनी त्यांचा सपत्नीक सत्कार करून लक्ष्मण अकनगिरे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सुत्र संचलन सुर्यवंशी मॅडम यांनी केले. यशस्वीतेसाठी जवळगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळे-चे शिक्षक,शिक्षिका कर्मचारी ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले.

# नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय ज्ञान आत्मसात करणे आवश्यक: डॉ. अंजली उगिले

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०४ फेब्रुवारी :** नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी तथा वैद्यकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रत्येकाने समर्पितपने कार्य केलेच पाहिजे, रुग्णसेवेमध्ये प्रत्येकाने आपले संपूर्ण कौशल्य पणास लावत आपल्या शैक्षणिक जी-वनात वैद्यकीय सेवेचे संपूर्ण ज्ञान आत्मसात करून त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या कार्यात केला पाहिजे असे प्रतिपादन डॉक्टर अंजली उगीले यांनी अहमदपूर येथील नवजीवन चरिटेबल ट्रस्टच्या लॅम्प लाईटनिंग कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

नवजीवन चॅरिटेबल ट्रस्ट संचलित नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्सेस, अहमदपूर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक स्नेहसंमेलन आणि




प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचा 'लॅम्प लायटिंग' (शपथ विधी) सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. साई नगर, येथील संस्थेच्या परिसरात हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन अहमदपूर पोलीस स्टेशनचे उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे झाले. यावेळी सुप्रसिद्ध कवी प्रा. अनिल चवळे, राम तत्तापूरे, डॉ. चंद्रकांत उगीले, शिवाजीराव गायकवाड , नागेश गोणे, रेड्डी सर, मिसेस मार्था भूषण आणि पडिले सिस्टर, यांसह अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत उगिले, सचिव डॉ.अंजली उगिले आणि कौस्तुभ उगिले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

**शपथ विधी आणि सांस्कृतिक आविष्कार**

नर्सिंग क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रज्वलित ज्योतीच्या साक्षीने रुग्णसेवेची शपथ घेत-ली. 'लॅम्प लायटिंग' या पवित्र सोहळ्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून आपल्या कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली यामध्ये रामराव केंद्रे, गणेश मुंडे, चव्हाण अंजली, माने मंदा,उगिले शुभांगी यांच्यासह इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पूर्ण मेहनतीने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

# जिल्हा परिषद - पंचायत समिती रणसंग्राम : विकासाचा लेखाजोखा आमच्यासमोर मांडा, मतदार

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि. ०४ फेब्रुवारी :** अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राजकीय रणधुमाळीला वेग आला आहे. भाजप, काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी, प्रहार जनशक्ती पक्ष व इतर पक्षाच्या उमेदवारांनी प्रचाराची कंबर कसली असली, तरी प्रत्यक्ष लढत भाजप महायुती आणि काँग्रेस महाविकास आघाडी यांच्यातच रंगणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

तथापि, राजकीय समीकरणे अनपेक्षित वळण घेऊ शकतात आणि एख-ादा दुसराच उमेदवार बाजी मारू शकतो, अशी चर्चाही राजकीय वर्तुळात सुरू आहे. मागील निवडणुकीत भाजपला अपेक्षित मताधिक्य मिळाले होते'. परंतु किनगाव परिसरात कोणती व किती विकास कामे झाली, याचा ठोस लेखाजोखा जनतेसमोर मांडला जावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर व्हावी अशी अपे-क्षा असताना, रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यांसारखे मूलभूत प्रश्न अद्याप अनुत्तरीतच आ-हेत. प्रत्येक निवडणुकीत भावनिक मुद्द्यांचा पाऊस पाडून मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न होतो.मात्र उपदेश देऊन मते मिळविणे ही सर्वात स्वस्त राजकीय युक्ती ठरत असल्याची भावना किनगाव मध्ये प्रकर्षाने दिसून येते.

लोकप्रतिनिधी हे जन-तेचे हक्क मिळवून देण्यासाठी निवडले जातात. मात्र जिल्हा परिषद व पंचायत समितीचे प्रतिनिधी हे शहराचे प्रश्न सभागृहात किती वेळा आणि किती प्रभावीपणे मांडतात, हा खरा कस आहे. पायाभूत सुविधावर प्रत्यक्ष झालेले काम आणि अपूर्ण प्रकल्पाचा हिशोब देण्यास अनेक उमेदवार टाळाटाळ करत असल्याची चर्चा नागरिकात आहे.

### ज्योतीर्मयी सावित्री पुस्तकाचे अभिवाचन

**लातूर :** येथील नारी प्रबोधन मंचच्या वतीने कोरोना काळात बंद पडलेला अभिवाचनाचा कार्यक्रम यंदा राबविण्यात आला. शनिवारी मंचच्या वतीने अरुणा दिवेगावकर लिखित 'ज्योतर्मिय सावित्री' या पुस्तकाचे वाचन करण्यात आले. अभिवाचन सुनीता देशमुख, सुनीता बोरगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. राधाकृष्ण देशमुख यांनी केले. दरम्यान, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी माजी प्राचार्य कुसुम मोरे, हेमलता वैद्य, संगीता शहरकर, सुनंदा जगताप, मंदाकिनी शिंदे, कुसुम पाटील, डॉ. शेख समीना, उषा शिंदे, शोभा आर्य, शोभा वारद आदी उपस्थित होते. तसेच सतीश मिरखलकर, महादेवी स्वामी, सुपर्ण जगताप, अनिल जायभाये, डॉ. बी. आर. पाटील, राजश्री लोंढे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार सुमती जगताप यांनी मानले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते..

### पाइपने केली बेदम मारहाण

**लातूर :** कामावर न आल्याच्या कारणावरून एका मजुराला लोखंडी पाइपने बेदम मारहाण करून त्याचे हात-पाय फोडल्याची धक्कादायक घटना उदगीर तालुक्यातील हेर येथे घडली आहे. या प्रकरणी तानाजी गायकवाड (रा. डिग्रस) याच्याविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजकुमार उर्फ आनंद स्वरूप मोने हे २८ जानेवारी रोजी हेर गावाच्या पश्र्चिमेस असताना ह घटना घडली. आरोपी तानाजी गायकवाड याने राजकुमार यांना काल कामाला का आला नाहीस, असा जाब विचारत शिवीगाळ सुरू केली. वाद वाढल्याने आरोपीने त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

# उदगीरची लढाई : २६६ वा ऐतिहासिक संस्मरणीय दिन उत्साहात साजरा

### उदगीरच्या किल्ल्यावर इतिहासप्रेमींची मोठी उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०४ फेब्रुवारी :** उदगीर शहराच्या इतिहासातील गौरवशाली पर्व असलेल्या उदगीरच्या ऐतिहासिक लढाईचा २६६ वा संस्मरणीय दिन मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी उदयगिरी इतिहास संवर्धन समिती, उदगीर व आर्य समाज, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम सकाळी ११ वाजता उदगीरच्या ऐतिहासिक किल्ला उदागीरबाबा समाधीस्थळ परिसरात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली झी माऊंट लिटरा या शाळेच्या विद्यार्थ्यांनी गाईले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अर्जुन सोमवंशी तर प्रमुख पाहुणे मा.माणिकरावजी बावणे, (नाईक बावणे सरदार यांचे वंशज तांदूळजा)मा. प्राचार्य डॉ.





मुकुंदजी देवर्षी (अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली) डॉ.बाबासाहेब शेप (वैद्यनाथ महाविद्यालय परळी) यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात उदगीरचा किल्ला व ऐतिहासिक महत्त्व या विषयावर सुप्रसिद्ध युवा इतिहासकार मा. डॉ. रवीजी सातभाई (अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली) यांनी अभ्यासपूर्ण व प्रभावी व्याख्यान दिले. त्यांनी ३ फेब्रुवारी १७६० रोजी लढल्या गेलेल्या उदगीरच्या लढाईचे ऐतिहासिक, सामरिक व राजकीय महत्त्व सविस्तरपणे विशद केले. मराठा साम्राज्याच्या शौर्याची, रणनितीची व नेतृत्वाची ही लढाई संपूर्ण भारताच्या इतिहासात कशी निर्णायक ठरली, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

प्रमुख वक्त्यांसह मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, उदगीरची लढाई ही केवळ युद्ध नसून ती स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेल्या बलिदानांची अमर गाथा आहे. अशा ऐतिहासिक घटनांचे स्मरण जतन करून भावी पिढीपर्यंत पोहोच-वणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास उदगीर शहर व परिसरातील इतिहासप्रेमी नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक व विविध क्षेत्रा-तील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली त्यात नगरसेवक धीरज कसबे, नेमिनाथ गिड्डे, अनिल पुद-ाले, घाडगे, उद्धव महाराज, डॉ अनिल भिकाने, मुडपे गुरुजी, बाबूराव माशाळकर ,शिव-ाजी सगर, कुलकर्णी मंजुषा, उषा तोंडचिरकर, सुमित्रा कोयले, रणदिवे बालाजी, बाबुराव नवटक्के,बंडाप्पा पडसंगे प्रा.धनराज बंडे, सोनू महार-ाज, श्रीपाद करंजीकर, महादेव रोडगे,सचिन घोळवे बालाजी रोडे, पाटील बी एन, दिलीप कंधारे,दिनेश गवारे , दिगंबर बुरसपटे, त्याचबरोबर झीमाऊंट लिटरा, सरदार वल्लभाई पटेल शाळा, संग्राम माध्यमिक शाळा स्वर्णमाता शाळा, हावगीस्वामी महाविद्यालय, कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय उदगीर इत्यादी शाळा, महाविद्यालयातील शिक्षक प्राध्यापक विद्यार्थी व विद्यार्थिनी, उदगीर मधील विविध क्षेत्रा-तील नामवंत ज्येष्ठ नागरिक गुड मॉर्निंग ग्रुप, जिव्हाळा ग्रुप, पतंजली ग्रुप, १२ बलुतेदार ग्रुप, इत्यादी विविध संघटनेतील सहभागी सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते.उपस्थितांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ड . शिवाजीराव कोकणे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय डॉ अनंत शिंदे व आभार संतोष कुलकर्णी

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अरविंद शिंदे, प्रा. बी. एन. नवटके, डॉ. नरेंद्र शिंदे (आर्य समाज), महादेव घोणे, एम. टी. गायकवाड, सावन टाकसाळे, उद्धव महार-ाज हैबतपूरे, दिगंबरराव बुरसपटे मुरली फिरंगवाड यांच्यासह सर्व आयोजक व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. व्यवस्थापनाची जबाबदारी सतीश चव्हाण, बालाजी रणदिवे, श्याम कांबळे, धीरज गबारे व बालाजी गवारे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

उदगीरच्या ऐतिहासिक वैभवाला उजाळा देणारा हा कार्यक्रम इतिहासप्रेमींमध्ये नवचैतन्य निर्माण करणारा ठरला. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## सुरतगाव शिवारात शेतशेड फोडून ट्रॅक्टरची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

सुरतगाव शिवारातील शेतातील पत्र्याच्या शेडचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने ट्रॅक्टर चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी महेश शिवाजी गुंड (वय ४७), रा. चनोदा, ता. वापी, जि. वलसाड, राज्य गुजरात, सध्या रा. सुरतगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांच्या मालकीचे सुरतगाव शिवारातील शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये उभे असलेले ट्रॅक्टर (क्र. एमएच २५ एएस २७३०) लाल रंगाचे, हेडवर पांढरी पट्टी व लाल रंगाचा रोटर असलेले, अंदाजे २ लाख रुपये किमतीचे साहित्य अज्ञात व्यक्तीने शेडचे कुलूप तोडून चोरून नेले.

या घटनेबाबत फिर्यादी महेश गुंड यांनी दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तामलवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३१(१) व ३०५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# स्व. अजित पवार यांच्या अस्थिकलशाचे तेरणा नदी व सीना प्रकल्पात विसर्जन

### आ. राणाजगजितसिंह पाटील व मा.आ. राहुल मोटे यांच्याकडून भावपूर्ण श्रद्धांजली...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या अस्थिकलशाचे सीना कोळेगाव प्रकल्पात माजी आमदार राहुल मोटे यांच्या हस्ते भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. परंडा मतदारसंघासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यासाठी वैभव ठरलेल्या या प्रकल्पाशी अजित पवार यांचे अतूट नाते होते.

सीना कोळेगाव प्रकल्पामुळे सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. अजित पवार जलसंपदामंत्री असताना त्यांच्या विशेष प्रयत्नांतून सीना नदीवर या धरणाची उभारणी करण्यात आली. सन २००७ मध्ये ५.३० टीएमसी क्षमतेच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी त्यांनी निधी उपलब्ध करून दिला होता. त्यामुळेच या धरणात त्यांच्या अस्थींचे विसर्जन करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्ते भावविवश झाले होते.

याप्रसंगी माजी आमदार राहुल मोटे, दादासाहेब पाटील सोनारीकर, भाऊसाहेब खरसडे, ॲड. सुजित देवकते यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तेर येथे अस्थिकलश दर्शनासाठी आणण्यात आला होता. तेर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने अस्थिकलशाचे दर्शन घेतले. त्यानंतर तेरणा नदीत अस्थींचे विसर्जन करण्यात आले.

अजित पवार यांनी राज्याच्या राजकारणात व समाजकारणात आपली वेगळी छाप पाडली होती. तेरचे जावई, म्हणजेच सुनेत्रा आत्यांचे पती म्हणून धाराशिव जिल्ह्यात त्यांच्या विषयी विशेष आपुलकी होती.

अजितकाकांचा सहवास खूप काही शिकवून जाणारा होता. मला त्यांचा सहवास लाभला, हे मी माझं भाग्य समजतो. अस्थी विसर्जन करताना मन थिजून गेलं असून आठवणींचं काहूर माजलं आहे.

अपघातापूर्वी आलेला त्यांचा अखेरचा फोन आजही मन हेलावून टाकतो, अशा शब्दांत माजी आमदार राहुल मोटे यांनी भावना व्यक्त केल्या.





अजित पवार आज आपल्यात नसले तरी त्यांच्या आठवणी, त्यांची शिकवण आणि त्यांनी उभारलेली विकासकामे सदैव स्मरणात राहतील, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

## हिप्परगा सय्यद येथे दर्ग्यातील साहित्य चोरी; ५६ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिप्परगा सय्यद (ता. लोहारा, जि. धाराशिव) येथे सय्यद बाशा दर्ग्यासाठी साहित्य ठेवण्यात आलेल्या खोलीत अज्ञात व्यक्तीने घरफोडी करून चांदीचे साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शुकुर महताबसाब कारभारी (वय ४५, रा. हिप्परगा सय्यद) यांनी दर्ग्यातील साहित्य साठवण्यासाठी तयार केलेल्या खोलीच्या दरवाज्याची कडी अज्ञात व्यक्तीने दि.२२ जानेवारी रोजी सायंकाळी ६ ते दि.२३ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास तोडून आत प्रवेश केला.

यानंतर खोलीतील सव्वा किलो वजनाचा चांदीचा घोडा व पाऊण किलो वजनाचा चांदीचा घोडा, असे एकूण ५६ हजार रुपये किमतीचे चांदीचे साहित्य चोरून नेण्यात आले. या घटनेबाबत फिर्यादी शुकुर कारभारी यांनी दि.२ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास लोहारा पोलीस करत असून, अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी व स्थानिक नागरिकांकडून माहिती घेतली जात आहे. दर्गा परिसरात चोरीची घटना घडल्याने भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वाशीमध्ये मटका जुगारावर छापा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

जुगारविरोधी कारवाई दरम्यान वाशी पोलीस ठाण्याच्या पथकाने दि.२ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास शेंडी येथील दत्त मंदिराच्या उजव्या बाजूला छापा टाकून मटका जुगार करताना एका आरोपीस ताब्यात घेतले.

याप्रकरणी आरोपी भुजंग बालाजी काळे (वय २८), रा. भूम ता. भूम, सध्या रा. लोणखस पारधी पिढी, ता. वाशी, जि. धाराशिव याच्याकडून 'पप्पू प्लेइंग पिक्चर' मटका जुगाराचे साहित्य व ५२० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## पोदार प्रेप, धाराशिव येथे 'लिटल एक्सप्लोरर्स टर्न सायंटिस्ट्स' सायन्स म्युझियम उपक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

धाराशिव येथील पोदार प्रेप शाळेमध्ये सिनिअर केजी वर्गातील चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी 'लिटल एक्सप्लोरर्स टर्न सायंटिस्ट्स' या अनोख्या सायन्स म्युझियम उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञानाची ओळख प्रत्यक्ष अनुभवातून करून देण्यात आली.

या सायन्स म्युझियममध्ये प्रवेशासाठी तिकीट काउंटरची रचना करण्यात आली होती, त्यामुळे मुलांना खऱ्या संग्रहालयाला भेट दिल्याचा अनुभव मिळाला. टेलिफोनचा शोध या विषयावर विशेष दालन उभारण्यात आले होते. या दालनात टेलिफोनच्या शोधाची माहिती साध्या, सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली.

तसेच इन्व्हेन्शन अँड डिस्कव्हरी लॅबमध्ये



विविध शोध आणि शास्त्रज्ञांबद्दल माहिती देण्यात आली. टेबल टॉप प्रयोगांच्या माध्यमातून मुलांनी छोटे-छोटे विज्ञान प्रयोग स्वतः करून पाहिले, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास



वाढला.

याशिवाय फॉसिल स्टडी अंतर्गत जीवाश्मांची ओळख करून देण्यात आली. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे डायनासोर डिग साईट. येथे मुलांनी छोटे शास्त्रज्ञ बनून डायनासोरचे जीवाश्म शोधण्याचा थरारक अनुभव घेतला.

या संपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, निरीक्षणशक्ती आणि विज्ञानाविषयीची गोडी निर्माण झाली. या अभिनव उपक्रमाचे पालक व शिक्षकांनी विशेष कौतुक केले. लहान वयातच अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना' ग्रामीण राजकारणात चर्चेचा केंद्रबिंदु



**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.४ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून ग्रामीण राजकारणात शेतकरी पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे. 'राज्याचे मिनी मंत्रालय' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत विकासाचे मुद्दे, विशेषतः शेत-पाणंद रस्ते, यांना सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. त्याच अनुषंगाने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विभागामार्फत राबविण्यात येणारी मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना ग्रामीण भागात चर्चेचा केंद्रबिंदू बनली आहे. धाराशिव जिल्ह्यात, विशेषतः उमरगा तालुक्यात, शरण पाटील फाउंडेशनच्या पुढाकाराने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बारमाही रस्त्यांचा अभाव, अतिक्रमणामुळे अरुंद झालेले पाणंद रस्ते आणि पावसाळ्यात वाहतूक ठप्प होणे या समस्या भेडसावत आहेत. या पार्श्वभूमीवर शरण पाटील फाउंडेशनने महसूल विभागाच्या सहकार्याने पाणंद रस्त्यांच्या सुधारणा व बांधकामावर ठोस पावले उचलली आहेत.

योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष गावपातळीवर राबविण्यावर भर देत आहे. अतिक्रमणमुक्त पाणंद रस्ते, दर्जेदार बांधकाम, थेट शेतकऱ्यांना लाभ ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत.

शासनाने या योजनेत शेतकऱ्यांचा आर्थिक सहभाग अपेक्षित धरला होता, परंतु अनेक अल्पभूधारक व कष्टकरी शेतकरी यामध्ये सहभागी होऊ शकत नव्हते. यामुळे शरण पाटील फाउंडेशनने शेतकरी हिस्सा स्वतः भरून देण्याची योजना राबविली आहे. यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामीण मतदारांमध्ये समाधान दिसून येत आहे.

### शेतीपूरक व्यवसायांना चालना...

पाणंद रस्त्यांचा लाभ केवळ शेतीपुरता मर्यादित नाही, तर दुग्धव्यवसाय, भाजीपाला, फळबागा, कुक्कुटपालन, शेळीपालन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांनाही मिळत आहे. ट्रॅक्टर, हार्वेस्टर, थ्रेशर यांसारखी आधुनिक यंत्रे शेतापर्यंत सहज पोहोचल्याने शेतीतील यांत्रिकीकरणाला गती मिळाली आहे.

### शासन निर्णय व कडक अंमलबजावणी...

योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, तहसीलदार, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत आणि पोलीस यंत्रणा यांची जबाबदारी ठरवली आहे. अतिक्रमण हटवताना कोणतेही शुल्क न घेण्याचे तसेच आवश्यक असल्यास विनामूल्य पोलीस बंदोबस्त देण्याचे स्पष्ट आदेश शासनाने दिले आहेत.

### निवडणुकीत परिणाम ठरणार...

ज्या भागात प्रत्यक्ष पाणंद रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत, त्या ठिकाणी योजना राबविणाऱ्या नेतृत्वाला जनतेचा अधिक पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. ग्रामीण मतदार आता केवळ आश्वासनांवर नव्हे, तर प्रत्यक्ष कामावर विश्वास ठेवू लागले आहेत. त्यामुळे शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणारी पाणंद रस्ते योजना निवडणुकांमध्ये ग्रामीण मतदारांचा कल ठरविणारी ठरणार असल्याचे दिसून येत आहे.

युवा नेते शरण बसवराज पाटील यांच्या संकल्पनेतून साकार झालेली ही योजना केवळ पायाभूत सुविधा नाही, तर ग्रामीण समृद्धीचा आराखडा आहे. शेतकरी सक्षम झाला तर गाव सक्षम होईल, गाव सक्षम झाले तर जिल्हा व राज्य प्रगती करेल, या विचारातून योजना आखण्यात आली आहे. पाणंद रस्त्यांना टिकाऊ व दर्जेदार स्वरूप देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अणदूरच्या पल्लवीची गगनभरारी

### जिद्द, मेहनत आणि चिकाटीचा प्रेरणादायी प्रवास... पतीच्या स्मृतींना यशाची मानवंदना देत पल्लवीची यशाला गवसणी...

सोलापूर तरुण भारत विशेष...

**श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर**

खेळ कुणाला दैवाचा कळला असे म्हटले जाते. आयुष्य कधी कोणत्या वळणावर काय समोर आणेल, हे सांगता येत नाही. पण काही जण असे असतात की नियतीने कितीही मोठी परीक्षा घेतली तरी ते हार मानत नाहीत. अशाच एका धैर्यशील, जिद्दी आणि संघर्षातून यश गाठलेल्या तरुणीची ही कहाणी अणदूर (ता. तुळजापूर) येथील रहिवासी जवाहर विद्यालयाची विद्यार्थिनी असलेल्या पल्लवी मुकेश आवटे हिने आय.बी.पी.एस. रँक मधून बँकिंगची परीक्षा देत कृषी क्षेत्र अधिकारी ए.एफ.ओ. या उच्च पदस्थ जागेवर नियुक्त झाली आहे. केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या आयबीपीएसच्या रँक मधून गतवर्षी तिने फॉर्म भरत प्रीलियम मेन्स मुलाखत या तिन्ही पातळीवर मात करत देशभरातील ३१० जागेतून आपले स्थान निश्चित केले.

कराड (जि. सातारा) येथील कै. अभिषेक पुजारी या युवकासोबत विवाह झालेल्या पल्लवीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे शिवधनुष्य पेलले. कराडच्या महावितरण कार्यालयात कर्मचारी असलेल्या अभिषेक पुजारी यांना २०२२ मध्ये कॅन्सरचे निदान झाले. पतीच्या या दुर्धर आजारावर मात करण्यासाठी तिने जंगजंग पछाडत विविध ठिकाणी उपचार केले. काही काळ या आजारात दिलासा मिळाला; परंतु दुर्दैवाने मार्च २०२५ मध्ये पतीचे निधन झाले. मृत्यू समयी पल्लवीने अभिषेकला वचन दिले आणि मी एफओ होईल आणि तुमची इच्छा निश्चित पूर्ण करेन, असा शब्द दिला होता. यानंतर तिने झपाटून अभ्यास करत पतीच्या निधनाला एक वर्ष पूर्ण होण्याच्या आतच या पदाला गवसणी घातली. समस्या, संघर्ष, संकट, आव्हाने समोर असतानाही जिद्द आणि चिकाटी ठेवत मिळविलेल्या यशामुळे समाजात एक आदर्श निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

पतीच्या निधनानंतर आधार तुटलेल्या पल्लवीच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहत तिचा आधार असलेल्या प्रणव या लहान भावाला ही बीएससी ॲग्री करून त्याचे भविष्य उज्वल केले.

अणदूरची कन्या पल्लवी मुकेश औटे हिची.

अणदूर येथील मूळ रहिवासी असलेली आणि सध्या तुळजापूर येथे वास्तव्यास असलेली पल्लवी हिचा विवाह सन २०२० मध्ये कराड येथील अभिषेक पुजारी या तरुणासोबत झाला होता. अभिषेक हा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये (एमएसईबी) टेस्ट डिपार्टमेंटमध्ये कार्यरत होता, तर पल्लवी हिने बीएस्सी ॲग्री (B.Sc. griculture) पर्यंत शिक्षण पूर्ण केले होते. लग्नानंतर दोघांचे संसाररूपी जीवन सुखाने सुरू होते. मात्र, आयुष्याच्या आनंदी प्रवासात अचानक २०२२ मध्ये मोठा धक्का बसला. अभिषेकला कॅन्सरसारख्या भीषण आजाराने ग्रासले. कॅन्सर म्हटले की माणूस मानसिक आणि शारीरिकरित्या पूर्णपणे खचून जातो, पण अभिषेक



आणि पल्लवी दोघांनीही हार मानली नाही. सुख के सब साथी, दुःख मे ना कोई ही म्हण येथे खोटी ठरली. कारण या कठीण काळात पल्लवीच्या पाठीशी माहेर व सासरची माणसे खंबीरपणे उभी राहिली. डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य उपचार, पत्नी पल्लवीचे अथक प्रयत्न, तिची सेवा, माया आणि अभिषेकची सकारात्मक मानसिकता यामुळे तो कॅन्सरवर मात करून बरा झाला. त्या काळात पल्लवीने केवळ पत्नी म्हणून नव्हे तर धीर देणारी सखी, आधार देणारी शक्ती म्हणून स्वतःला सिद्ध केले. काही काळाने जीवनाचा गाडा पुन्हा पूर्वपदावर येत असतानाच २०२३ मध्ये अभिषेकच्या वडिलांचे दुःखद निधन झाले. या दुःखातून कुटुंब सावरत नाही तोच नियतीने पुन्हा एकदा कठोर परीक्षा घेतली. फेब्रुवारी २०२५ मध्ये अभिषेकचा कॅन्सर पुन्हा बळावला. यावेळी मात्र नियती अधिक क्रूर ठरली. सर्व उपचार करूनही अभिषेक कॅन्सरवर मात करू शकला नाही आणि दिनांक २९ मार्च २०२५ रोजी अभिषेकची प्राणज्योत मावळली.

अभिषेकच्या शेवटच्या क्षणापर्यंत पत्नी पल्लवी त्याच्या सोबत होती. पल्लवीसाठी हा क्षण अत्यंत वेदनादायक, आयुष्य उद्ध्वस्त करणारा होता. मात्र या कठीण प्रसंगी तिची सासू, नणंद आणि भाऊ यांनी तिला मोठा मानसिक आधार दिला. अश्रूंनी भरलेले डोळे, मनात दुःखाचा डोंगर असतानाही पल्लवीने स्वतःला कोलमडू दिले नाही.

अभिषेकच्या निधनानंतर अवघे दोन महिने झाले असतानाच पल्लवीने स्वतःला सावरण्याचा निर्णय घेतला. आयुष्य संपले नाही, हे तिने स्वतःला पटवून दिले. याच काळात बँकेच्या भरतीची जाहिरात आली. पती अभिषेकचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी पल्लवीने पुन्हा एकदा संघर्षाची वाट निवडली. मनात दुःख, डोळ्यांत अश्रू आणि हातात पुस्तके घेऊन तिने अभ्यासाला सुरुवात केली. जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनतीच्या जोरावर तिने बँकेच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले. आज ती बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये कृषी क्षेत्र



पल्लवी आवटे

अधिकारी (griculture Field Officer) - क्लास १ अधिकारी म्हणून रुजू झाली आहे. विशेष म्हणजे, पती अभिषेकच्या पहिल्या वर्षश्राद्धाच्या आधीच हे यश मिळवून तिने जणू आपल्या नवऱ्याला खऱ्या अर्थाने आदरांजली वाहिली आहे. राखेतून उडणाऱ्या फिनिक्स पक्ष्यासारखी तिची झेप आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

पल्लवी मुकेश औटे हिच्या या यशाबद्दल अणदूर गावासह संपूर्ण परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या जिद्दीच्या प्रवासाने अनेक तरुणींना नवी दिशा आणि बळ मिळाले आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तुळजापूरमध्ये ५७,७२० रुपयांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ फेब्रुवारी -**
तुळजापूर (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तत्सम पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगल्याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई करून ५७,७२० रूपये किमतीचा माल जप्त केला असून एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी आरोपी किरण अनिल जाधव (वय २१), रा. शुक्रवार पेठ, खडकाळ गल्ली, तुळजापूर, जि. धाराशिव यास दि.२ फेब्रुवारी रोजी नविन बसस्थानक, तुळजापूर येथील कारखान्याजवळ अटक करण्यात आली. आरोपीकडे महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेले विमल पान मसाला, डायरेक्टर गुटखा, आर.एम.डी., बादशाहा, गोवा आदी गुटखा व तत्सम पदार्थ विक्रीसाठी साठवलेले आढळून आले.

तुळजापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने गुटखा साहित्य जप्त करून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३, २७४, २७५, १२३ सह अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत कलम ५९ अन्वये तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### एअरटेल टॉवरवरील साडेतीन लाखांची चोरी; उत्तर प्रदेशातील आरोपी अटकेत

**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील एअरटेल कंपनीच्या मोबाईल टॉवरवरून नेटवर्कसाठी वापरण्यात येणाऱ्या एसएफ/डीएलए कार्ड व प्लेटची सुमारे साडेतीन लाख रुपयांची चोरी केल्याप्रकरणी तामलवाडी पोलिसांनी उत्तर प्रदेशातील एका आरोपीला तांत्रिक पद्धतीचा वापर करून बेंबळी पोलीस ठाणे हद्दीतून अटक केली आहे. दि.७ जानेवारी रोजी तामलवाडी येथील एअरटेल मोबाईल टॉवरवरील डीएलए-एसएफ प्लेटची चोरी अज्ञात चोरट्यांनी केली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर सपोनि गोकुळ ठाकुर यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू करण्यात आला. आरोपी ध्रुव त्रिभुवन प्रसाद (वय २५), रा. भागदिवा, तहसील बारा, जि. प्रयागराज (उ.प्र.) याने मराठवाड्यातील पाच ठिकाणी अशाच प्रकारचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. तपासादरम्यान गुन्ह्यात वापरलेली चारचाकी गाडी व चोरीसाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले. गोपनीय माहितीच्या आधारे वैराग-गौडगाव मार्गे देवळाली (बेंबळी पो.ठा. हद्द) येथे सापळा रचून आरोपीस रात्री रंगेहाथ अटक करण्यात आली. ही कारवाई सपोनि. गोकुळ ठाकुर, पीएसआय प्रदीप टेकाळे, हवालदार संजय कलमदाने, सुरज नरवडे, नितीन भोसले व पोलीस मित्र अमोल पाटील यांनी केली.

# जाहीरनाम्यांत विकास, प्रत्यक्षात दुर्लक्षच

## धाराशिव जिल्ह्यातील मूलभूत प्रश्न कायम : विकासाचा विस्कळीत चेहरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**
निवडणुका जवळ आल्या की सर्वच राजकीय पक्ष विकासाची मोठी स्वप्ने दाखवणारे जाहीरनामे आणि वचननामे जाहीर करतात. मात्र प्रत्यक्षात धाराशिव जिल्ह्यातील वास्तव पाहिले असता, विकासाचे दावे कागदावरच मर्यादित राहिल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येते. जिल्ह्यातील शिक्षण, रोजगार आणि पायाभूत सुविधा या मूलभूत प्रश्नांकडे वर्षानुवर्षे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.



जिल्हा परिषद शाळांची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक होत चालली आहे. शेकडो शाळांच्या इमारती व वर्गखोल्या जीर्ण झालेल्या असून वर्गखोल्यांची कमतरता, अपुरी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची समस्या आणि आवश्यक शैक्षणिक साहित्याचा अभाव आजही कायम आहे. काही शाळांमध्ये शिक्षकसंख्या अपुरी असल्याने एकाच शिक्षकावर अनेक वर्गांची जबाबदारी येते. परिणामी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर मोठा परिणाम होत आहे.

धाराशिव जिल्ह्यातील तरुणांसमोर रोजगाराचा गंभीर प्रश्न उभा आहे. औद्योगिक विकासाचा अभाव, नवीन उद्योगांची कमतरता आणि कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या अपुऱ्या संधी यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. शिक्षण पूर्ण करूनही नोकरीच्या संधी न मिळाल्याने मोठ्या प्रमाणावर तरुणांना पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शहरांकडे स्थलांतर करावे लागत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भाग अधिकच मागे पडत असल्याचे चित्र आहे. सर्वच राजकीय पक्षांकडून प्रत्येक निवडणुकीत शिक्षण सुधारणा, रोजगारनिर्मिती आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची आश्वासने दिली जातात. मात्र निवडणुका संपल्यानंतर ही आश्वासने विसरली जातात. जिल्ह्याच्या गरजा ओळखून दीर्घकालीन नियोजन करण्याऐवजी तात्पुरत्या उपाययोजनांवर भर दिला जात असल्याचा आरोपही केला जात आहे.

शिक्षण ही विकासाची पहिली पायरी आहे. शाळांची अवस्था अशीच राहिली तर भविष्यातील पिढी कशी घडणार? असा सवाल नागरिक विचारत आहेत. तसेच जिल्ह्यात उद्योगधंदे उभारण्यासाठी ठोस धोरण आखावे, स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही जोर धरत आहे.

एकीकडे जाहीरनाम्यांत विकासाचे मोठे दावे केले जात असताना, दुसरीकडे धाराशिव जिल्ह्यातील वास्तव वेगळेच चित्र दाखवत आहे. येणाऱ्या काळात तरी या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष दिले जाईल का, की विकासाची भाषा फक्त निवडणुकांपुरतीच मर्यादित राहणार, हा प्रश्न आज जिल्ह्यातील जनतेसमोर उभा आहे.

### गाव जोडणारे ग्रामीण रस्ते खड्ड्यांतच!...

धाराशिव जिल्ह्यात एकीकडे राष्ट्रीय महामार्गांचे जाळे विस्तारत असून दळणवळणाच्या सुविधा आधुनिक होत असल्याचे चित्र दिसते. मात्र याच जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून गावोगावी प्रवास करणे नागरिकांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. विकासाचे दावे आणि प्रत्यक्षातील वास्तव यामधील दरी ग्रामीण भागात ठळकपणे जाणवत आहे. जिल्ह्यातील शेकडो गावांना जोडणारे अंतर्गत रस्ते खड्ड्यांनी भरलेले, उखडलेले आणि पावसाळ्यात चिखलमय होणारे आहेत. काही ठिकाणी डांबरीकरण पूर्णपणे उखडून फक्त खडी आणि मुरूम उरलेला आहे. पावसाळ्यात या रस्त्यांवरून दुचाकी, रिक्षा किंवा चारचाकी वाहन चालवणे धोकादायक ठरत असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. शाळकरी मुले, रुग्ण, गर्भवती महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. महामार्गावरून वेगाने जाणे सोपे झाले, पण गावातून बाहेर पडणेच कठीण झाले आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. खराब रस्त्यांचा थेट परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही होत आहे. शेतकऱ्यांना आपला माल बाजारपेठेत नेण्यासाठी अधिक वेळ व खर्च करावा लागत असून वाहतूक खर्च वाढत आहे. काही वेळा रस्त्यांची अवस्था इतकी खराब असते की वाहने गावात येण्यास टाळाटाळ करतात. परिणामी, ग्रामीण भाग विकासाच्या मुख्य प्रवाहापासून अधिकच दूर जात असल्याचे चित्र आहे.

## तुळजापूर बसस्थानक परिसरात रहदारीस अडथळा; दोन वाहनचालकांविरुद्ध गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**
तुळजापूर बसस्थानक परिसरात सार्वजनिक रस्त्यावर वाहने धोकादायकरीत्या उभी करून रहदारीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी तुळजापूर पोलीसात दोन वाहनचालकांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याप्रकरणी आरोपी नामे पांडुरंग तुकाराम शेंडगे, रा. ढेकरी, ता. तुळजापूर, (वाहन क्र. एमएच २५ एम ५८६) तसेच तुषार बापु मुंढे, रा. ढेकरी, ता. तुळजापूर (वाहन क्र. एमएच २४ ए ८९२१) यांनी दि.२ फेब्रुवारी रोजी आपआपल्या ताब्यातील वाहने तुळजापूर बसस्थानकाजवळील सार्वजनिक रस्त्यावर धोकादायक पद्धतीने उभी केली होती. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

# तुळजाई नगरीच्या प्रभारी नगराध्यक्षपदी रामचंद्र रोचकरी

## पदभार स्वीकारला : पहिल्याच प्रयत्नात नगरसेवक, सन्मानपुर्वक उपनगराध्यक्ष पदानंतर प्रभारी नगराध्यक्ष पदाची लॉटरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ फेब्रुवारी -**
कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या पुण्यपावन तुळजाई नगरीच्या नगराध्यक्षपदाचा प्रभारी पदभार उपनगराध्यक्ष रामचंद्र आबा रोचकरी यांनी स्वीकारला.

नगराध्यक्ष विनोद गंगणे हे वैयक्तिक कारणास्तव रजेवर गेल्यामुळे, आज बुधवार दि.४ फेब्रुवारी रोजी नगराध्यक्षपदाचा पदभार अधिकृतरीत्या रामचंद्र रोचकरी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

नगरपालिकेच्या कार्यालयात झालेल्या या पदभार स्वीकृती कार्यक्रमात नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या उपस्थितीत उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी यांच्याकडे नगराध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. यावेळी नगरपरिषदेच्या दैनंदिन काम काजासह विकासकामे, प्रलंबित प्रस्ताव, नागरी सुविधांबाबतची माहिती देण्यात आली.

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना प्रभारी नगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी यांनी सांगितले की, नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेली सर्व विकासकामे अखंडपणे पुढे नेली जातील. नागरिकांच्या मूलभूत समस्या, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, वीज, आरोग्य व इतर नागरी सुविधा यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच नगरपालिकेचे काम काज पारदर्शक व लोकाभिमुख पद्धतीने राबविण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही बोलताना म्हणाले. या प्रसंगी प्रभारी नगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास नगराध्यक्ष विनोद गंगणे, भाजपाचे जेष्ठ नेते नारायण नन्नवरे, प्रा. संभाजी भोसले, शिवाजी बोदले, राजेश



शिंदे यांच्यासह नगरपरिषदेचे पदाधिकारी, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.

नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी यावेळी विश्वास व्यक्त करताना सांगितले की, रामचंद्र रोचकरी हे कार्यतत्पर नेतृत्व असून त्यांच्या कार्यकाळात नगरपालिकेचे काम काज सुकरपणे चालेल, असा विश्वास आहे. प्रभारी कालावधीत नगरहिताचे निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

तुळजाई नगरीच्या प्रशासनात हा बदल तात्पुरता असला तरी नगरविकासाची गती कायम राहील, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## आरोग्य सेवक पदासाठी बनावट नियुक्ती आदेश

### आरोग्य विभागाची फसवणुकीविरोधात तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**
आरोग्य सेवक (पुरुष) या पदासाठी बनावट नियुक्ती आदेश देऊन उमेदवारांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. यासंदर्भात दि.४ फेब्रुवारी २०२६ रोजी एका वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाली असून, या प्रकरणामुळे जिल्हा आरोग्य विभागाची नाहक बदनामी झाली आहे.

या प्रकरणात अज्ञात व्यक्तीने आरोग्य विभागाच्या खोट्या लेटरपॅडचा वापर करून संगणकाच्या सहाय्याने जिल्हा आरोग्य अधिकारी यांची बनावट स्वाक्षरी एडिट केली आहे. तसेच जिल्हा परिषद, धाराशिव अंतर्गत जिल्हा रुग्णालय, धाराशिव येथे रिक्त पदावर रुपये २९,२०० ते ९२,३०० या वेतनश्रेणीत नियुक्ती आदेश दिल्याचे भासवण्यात आले आहे. या बनावट आदेशांबाबत प्रसारमाध्यमांत वृत्त प्रसारित झाले आहे.

जिल्हा परिषद, धाराशिव अंतर्गत सरळसेवा पदभरती सन २०२३ साठी जाहिरात क्र.१/२०२३ दि.५ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिरातीच्या अनुषंगाने विविध संवर्गातील एकूण ४५३ पदे भरण्याचे प्रस्तावित होते. यामध्ये आरोग्य सेवक (पुरुष) संवर्गातील ४० टक्के व ५० टक्के आरक्षणातील रिक्त पदांसाठी IBPS, मुंबई यांच्यामार्फत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. गुणवत्ता यादी व कागदपत्र पडताळणीनंतर अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांची माहिती जि.प. व एनआयसीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने अशा बनावट कागदपत्रांच्या आधारे देण्यात येणाऱ्या आदेशांवर विश्वास ठेवू नये. अधिकृत माहिती केवळ जिल्हा परिषद व एनआयसीच्या अधिकृत संकेतस्थळावरच उपलब्ध असून त्याचेच अवलोकन करावे. अधिक माहितीसाठी आरोग्य विभाग, जि.प., धाराशिव या कार्यालयाशी थेट संपर्क साधावा. या फसवणुकीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असण्याची शक्यता असून, संबंधित व्यक्तींविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# सीटीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक कामातून सूट

### निवडणूक आयोगाचा दिलासादायक निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**
राज्यातील बारा जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १२५ पंचायत समिती निवडणुकांच्या मतदानाच्या तारखेमध्ये बदल झाल्यानंतर सीटीईटी परीक्षा देणाऱ्या हजारो शिक्षकांची मोठी कोंडी झाली होती. मतदानाचा दिवस आणि परीक्षा एकाच दिवशी म्हणजे ७ फेब्रुवारी रोजी आल्याने राज्यभर गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती.

या गंभीर बाबीची दखल घेत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष वेनुनाथ कडू यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह राज्य निवडणूक आयोगाकडे तातडीने निवेदन सादर करून सीटीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक कामातून सूट देण्याची मागणी केली होती. तसेच यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

या मागणीची दखल घेत राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी (ता. ३) सीटीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक कामातून सूट देण्याचा निर्णय घेत मोठा दिलासा दिला. याबाबत संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने निर्देश देऊन पर्यायी व्यवस्था करण्याबाबतही योग्य सूचना देण्यात आल्या आहेत. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे धाराशिव जिल्ह्यासह अन्य अकरा जिल्ह्यांतील हजारो शिक्षकांची निवडणूक कामातून मुक्तता होणार असून, शिक्षकांना बंधनकारक असलेली सीटीईटी परीक्षा आता शांत आणि स्थिर मनाने देता येणार आहे.




या निर्णयाचे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष वेनुनाथ कडू, माजी आमदार नागोराव गाणार, माजी आमदार भगवानराव साळुंखे, राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, सुनिल काळे, कुमार निकम, सुरज येवले, अभिमान पेठे, अमोल गायकवाड, आप्पासाहेब गाडेकर, आण्णासाहेब धावारे, एस.जी. भोगील आदींनी स्वागत केले आहे.

## तेरखेडा जि. प. गटात राजकीय उलथापालथ

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.४ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसरात राजकीय वातावरण तापले असून, सर्वच पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. गावोगावी जोरदार प्रचार, सभा आणि नेत्यांचे दौरे सुरू असल्याने निवडणुकीचा धुरळा उडाल्याचे चित्र दिसून येत आहे.

धाराशिव जिल्ह्यातील तेरखेडा जिल्हा परिषद गट सध्या जिल्हाभर चर्चेचा विषय ठरत आहे. जरी या गटातील निवडणूक चौरंगी असली, तरी प्रत्यक्षात लढत शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातच होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून अर्ज दाखल होईपर्यंत विविध नेत्यांचे पक्षांतर सुरू होते. दरम्यान, शिवसेना ठाकरे गटातील काही नेते नाराज असल्याची चर्चा परिसरात होती. याबाबत दैनंदिन तरुण भारतने २५ जानेवारी रोजी वृत्त प्रसिद्ध केले होते.

या पक्षप्रवेशामुळे तेरखेडा जिल्हा परिषद गटातील राजकीय समीकरणे बदलली असून, याचा नेमका परिणाम निवडणूक निकालावर किती होतो, हे ९ फेब्रुवारी रोजी स्पष्ट होणार आहे.

**जाहीर प्रगटनद्वारे समन्स**
**उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**
वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स (नियमकम ५. नियम १.५)
**नियमित दिवाणी दावा क्र. १५९/२०२५** **वाल्मीक वि. फुलचंद्र व इतर**
**नि.क्र.२५**
**प्रति, प्रतिवादी क्र. ४/१/२, श्रीकांत रावण कावाले, रा. रामलिंग मुदगड वाडी, ता. निलंगा, जि. लातुर.**
ज्याअर्थी वादी वाल्मीक दादाराव कावाले, रा. रामलिंग मुदगड वाडी ता. निलंगा, जि. लातूर, यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी ह्या वादासंबधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी दिवसा १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तर देवू शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमध्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे, व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट बाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर फ्रेम) ज्या दस्त आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंया नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावे आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर फ्रेम) पुष्ठयर्थ पुरावा म्हणुन तुमच्या ताब्यात किंया नियंत्रणाखाली असलेल्या किंया नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबुन असाल तर अशा दस्तऐवजाचे एक सुची करून ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावे.
तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल.
आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पुर्वी बजावणीकरीता तुमचा पत्ता दाखल करण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.
**आज दिनांक २७/०१/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (एस. एन. यमगर) | (अ.ज. सय्यद) |
| कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक |

**दिवाणी न्यायाधीश, व स्तर, उमरगा**

# कळंब : महसुलासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळ?




**परवेज मुल्ला**
**कळंब, दि.४ फेब्रुवारी -**
कळंब शहरातील मुख्य रस्त्यांच्या दुभाजकांमध्ये विद्युत पोलवर उभारण्यात आलेल्या भव्य होल्डिंग्स नागरिकांच्या जीवावर बेतत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. वाहतुकीला थेट अडथळा ठरणाऱ्या या होल्डिंग्समुळे अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत असून, प्रशासनाची मात्र अद्यापही ढिम्म भूमिका असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी या होल्डिंग्समुळे समोरून येणारी वाहने स्पष्टपणे दिसत नाहीत. त्यामुळे रस्ता ओलांडताना नागरिकांचा अंदाज चुकत असून, क्षणात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण होत आहे. काही ठिकाणी दुभाजकाची जागा अत्यंत अरुंद असताना त्यावर उभारलेल्या मोठ्या होल्डिंग्समुळे वाहनचालकांना वळण घेताना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांसाठी हे रस्ते अक्षरशः धोक्याचा सापळा ठरत आहेत. मात्र, नगर परिषदेला या होल्डिंग्समधून मिळणाऱ्या महसुलासाठी नागरिकांच्या सुरक्षेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे. महसुलासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे का? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, एखादा मोठा अपघात घडून निरपराध जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी दुभाजकातील सर्व धोकादायक होल्डिंग्स तात्काळ हटवाव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांकडून देण्यात आला आहे.

प्रशासनाने तातडीने कारवाई करून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, अशी जोरदार मागणी होत आहे. अनधिकृतपणे उभारण्यात आलेली, बॅनर परवानगीची मुदत संपलेली तसेच तारीख व वैधता न दर्शवता बसविण्यात आलेल्या सर्व होल्डिंग्सवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



**दुभाजकांवरील होल्डिंग्समुळे अपघातांचा धोका वाढला**